CMYK


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | मंगळवार, १३ जानेवारी २०२६ । वर्ष ३ रे अंक ३१४ । पाने १२ । किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




# कफनचोरांना जेलमध्ये टाकून मुंबईत सत्ता स्थापन करणार : देवेंद्र फडणवीस

## एकनाथ शिंदे : वादापेक्षा मराठी माणूस मोठा, मग वेगळे का झालात?

**मुंबई,दि.१२ जानेवारी-**

आज मुंबईतील शिवाजी पार्कवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा पार पडली. या सभेत ठाकरे बंधूंच्या कालच्या सभेवर जोरदार पलटवार केल्याचे पाहायला मिळाले. देवेंद्र फडणवीस यांनी अदानीच्या मुद्द्यावरून गौतम अदानी यांची जिथे भाजपचे सरकार नाही या राज्यांमध्ये किती गुंतवणूक आहे, याची देखील आकडेवारी दाखवली. तसेच ठाकरेंवर टीका करताना फडणवीस म्हणाले, या कफन चोरांना जेलमध्ये टाकून मुंबईत सत्ता स्थापन करणार, असा इशारा देखील दिला.



**मराठी माणसाच्या नाही, स्वतःच्या अस्तित्वाची लढाई-फडणवीस**

मराठी माणसाच्या अस्तित्वाची नाही तर त्यांच्या अस्तित्वाची लढाई. आणि तुम्हीच म्हणजे मराठी, तुम्ही म्हणजे मराठी आणि तुम्ही म्हणजे महाराष्ट्र नाही. समोर बसलेली ही जनता म्हणजे मराठी आणि महाराष्ट्र आहे. काल काही लोकांनी माझीच नक्कल केली. पण त्यांना समजायला पाहिजे की नक्कल करता करता काकांची काय परिस्थिती झाली. पण काकांना किमान नक्कल तरी करता येते. पण तुमची काय अवस्था होईल.

आधी म्हणायचे की हिंदी सक्तीसाठी आम्ही एकत्र आलो अनब आता काय तर आम्ही मराठीसाठी आणि मराठी माणसासाठी एकत्र आलो. या राज्यात हिंदी सक्ती करणारे कोण? २१ सप्टेंबरला उद्धव ठाकरे यांनी त्रिभाषा सूत्रावर माशेलकर समिती तयार झाली. या समितीत उबाठाचे नेते, विजय कदम देखील होते. या समितीत १८ लोक मराठी होते. आता या समितीचा अहवाल सर्वांनी पाहिला. पान नंबर ५६ वर भाषेकरिता उपगट केला. त्यात उबाठाचे नेते विजय कदम होते. त्यात 'इंग्रजी आणि हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिल्या वर्गापासून लागू करण्यात यावी' असे नमूद केले होते. हा अहवाल उद्धव ठाकरे यांच्या काळातील आहे.



**वेगळे का झालात?, शिंदेंचा ठाकरे बंधूंना सवाल**

एकनाथ शिंदे म्हणाले- आज जे मराठी माणसांच्या नावाने आवाज काढत आहेत. ते सुट्टीवर कुठे जातात हे तुम्हाला माहिती आहे. वादापेक्षा मराठी आमच्यासाठी मोठा आहे. मग वेगळे का झालात. त्यावेळी तुम्हाला बाळासाहेबांची स्वप्न पूर्ण करावीशी नाही वाटली का? तुम्ही स्वार्थासाठी वेगळे झालात अनब स्वार्थासाठीच एकत्र आलात हे मराठी माणसांना माहिती आहे. हे पुतणा-मावशीचं प्रेम आहे. त्यामुळे यांच्यापासून सावध होण्याची गरज आहे.

# लाडकी बहीण योजनेचा लाभ आगावू देण्यास निवडणूक आयोगाचा मज्जाव

## राज्याचे मुख्य सचिवांना निर्देश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १२ जानेवारी :**

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असताना 'लाडकी बहीण' योजनेचा नियमित किंवा प्रलंबित लाभ देता येईल; परंतु जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरुपात देण्यास राज्य निवडणूक आयोगाने मज्जाव केला आहे. या योजनेबाबत राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्पष्टीकरण द्यावे, असे निर्देश राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना आयोगाने सोमवारी दिले.

राज्याच्या २९ महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारीला होत असून "लाडक्या बहिणींना मकर संक्रांतीची मोठी भेट! १४ जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींच्या खात्यात डिसेंबर व जानेवारी महिन्याचे तीन हजार जमा होणार," असे वृत्त प्रसार माध्यमात प्रसिद्ध झाल्या. त्याच्या आधारे काँग्रेस व अन्य काही पक्षाकडून राज्य निवडणूक आयोगाकडे अनेक



तक्रारी प्राप्त केल्या आहेत. त्याबाबत आयोगाने वस्तुस्थिती कळविण्याची सूचना केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने गेल्यावर्षी ४ नोव्हेंबरला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आदर्श आचार संहितेबाबत एकत्रित आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशातील तरतुदींनुसार निवडणूक जाहीर होण्यापूर्वी प्रत्यक्ष सुरू झालेली विकासकामे व योजना आचारसंहिता काळात सुरू ठेवण्यास परवानगी आहे," असे मुख्य सचिवांनी आपल्या अहवालात कळविले होते. ही पार्श्वभूमी लक्षात घेता, या योजनेचा नियमित लाभ देता येईल; परंतु अग्रिम स्वरुपात लाभ देता येणार नाही, तसेच नवीन लाभार्थीदेखील निवडता यणार नाहीत, असे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी दिले आहेत.

## महत्वाचे...

### आरक्षण असलेली जागा विक्री करुन फसवणूक

**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

बगिचा आरक्षण असलेली जागा प्लॉट म्हणून विक्री करून खरेदीदार व कुलमुखत्यारधारकाची फसवणूक केल्याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी रियाज इब्राहिम हुंडेकरी रा. रेल्वे लाईन, तिन्हेगाव फॉरेस्ट, सोलापूर याने जुना सर्व्हे नं. २५२/ब, नवीन सर्व्हे नं. ५९/ब येथील बगिचा आरक्षण असलेली जागा विकत घेऊन त्याचा कच्चा नकाशा तयार केला.हा नकाशा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, उत्तर सोलापूर येथे दाखल करून प्लॉट नं. ३०१, क्षेत्रफळ १५८.१५ चौ.मी. (१७०१.७५ चौ.फुट) ही मिळकत दस्त क. ५५०६/२०१३ दि. ०३ जुलै २०१३ अन्वये आसमा सुलतान शेख रा. ठाणे यांना विक्री केली. सदर प्लॉट संदर्भात आसमा शेख यांनी फिर्यादी इस्माईल अल्लीसाब नाईकवाडी रा. शुक्रवार पेठ, सोलापूर यांना कुलमुखत्यारपत्र दिले असताना, आरोपीने धारक म्हणून फिर्यादी व आसमा शेख यांची नावे वापरून दोघांचीही फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी फिर्यादी इस्माईल नाईकवाडी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याची नोंद१० जानेवारी रोजी झाली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक बंडगर हे करीत आहेत.






### शेटफळ येथे जिजाऊ जयंती साजरी

**जेऊर, दि. १२ जानेवारी-**

शेटफळ तालुका करमाळा येथे शिवस्मारक समिती व ग्रामस्थांच्या वतीने जिजाऊ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी यावेळी गावातील जेष्ठ नागरिक प्रल्हाद पोळ यांच्या हस्ते जिजाऊंच्या प्रतिमेचे व छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन करण्यात आले. यानंतर इरा पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांनी व उपस्थितांकडून जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी कार्यक्रमाला हनुमंत घोगरे, अमोल घोगरे, सुहास पोळ, ज्ञानेश्वर लगड, संजय पोळ, नागनाथ पोळ, सुरज पोळ, सुदर्शन पवार, शंकर पोळ, श्रीकृष्ण लबडे, सिताराम मोरे, बापूराव पोळ, लहू पोळ नाना पोळ, विशाल पोळ, ज्ञानेश्वर पोळ, ऋषिकेश पोळ, निलेश गायकवाड उपस्थित होते.



### जिजाऊ जयंतीनिमित्त ऊसतोड कामगारांना कपडे व स्वेटरचे वाटप

**पंढरपूर, दि. १२ जानेवारी-**

तालुक्यातील भंडीशेगाव येथे स्वामी विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती निमित्त वेळापूर (ता.माळशिरस) येथील महिलांनी ऊसतोड कामगारांसाठी कपडे त्याचबरोबर थंडीपासून बचाव होण्यासाठी स्वेटरचे वाटप डॉ. शुभांगी उमेश नाईक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह प्रतापसिंह टकले यांच्या हस्ते करण्यात आले. वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर साप्ताहिक मिलन व गीता परिवार तसेच सेवा भारती आणि श्री गुरुजी प्रतिष्ठान पंढरपूर या सर्वांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. शुभांगी नाईक, पुष्पांजली प्रतापसिह टकले, प्रतापसिंह टकले, प्रदीप टकले, अनिल विभुते, स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.श्रीधर येलमार उपस्थित होते.



### सांगोला विद्यामंदिर येथे पालक-शिक्षक सभा संपन्न

**सांगोला,दि.१२ जानेवारी -**

सांगोला विद्यामंदिर ज्यु.कॉलेज येथे इ.१२ वी कला, वाणिज्य, शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांची द्वितीय सत्र पालक- शिक्षक सभा उत्साहात पार पडली. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, प्रा.जालिंदर मिसाळ उपस्थित होते. प्रास्ताविकातून प्रा.धनाजी चव्हाण यांनी सभेचा हेतू स्पष्ट केला. मनोगतातून प्रा.नवनाथ बंडगर यांनी कला शाखेतील विद्यार्थ्यांना भविष्यात नोकरीच्या व रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. वाणिज्य शाखेच्या प्रा.प्रसाद खडतरे यांनी विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे असे सांगितले. शास्त्र शाखेच्या प्रा.मिलिंद देशमुख यांनी लॉगटेबल, डेरिवेशन, फॉर्मुले व डायग्राम यांच्या सरावासोबत शास्त्रीय भाषेत उत्तर लिहिणे गरजेचे आहे असे सांगितले. प्रकाश म्हमाणे यांनी बोर्ड परीक्षेचे स्वरूप, नियम व अटी याबाबतचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. पालक विनोद उबाळे यांनी शाळेतील उपक्रमांचे कौतुक करत शाळेबरोबर पालकांच्याही जबाबदारीची जाणीव करून दिली. या सभेचे सूत्रसंचालन प्रा.आरती वेदपाठक यांनी केले. आभार प्रा.विजयकुमार सासणे यांनी मानले.

# आठ काडतुसे, दोन पिस्टलसह तिघांना अटक

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी धडाकेबाज कामगिरी बजावत आठ काडतुसे, देशी बनावटीचे दोन पिस्टलसह तिघांना अटक केली. या कारवाईत काडतुसे, पिस्टल यांसह मोटरसायकल असा २ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला, अशी माहिती पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी पत्रपरिषदेत दिली.

रेल्वेच्या डीआरएम ऑफिसच्या बाजूस असलेल्या रेल्वे कॉलनीचे वॉल कंपाऊंड लगत मोकळ्या जागेत तीन इसम हे त्यांचेकडील काळया रंगाचे युनिकॉर्न मोटार सायकलवर थांबले असुन त्यांचेकडे देशी बनावटीचे पिस्टल आहेत, अशी गोपनीय माहिती गुन्हे शाखेकडील पोह संताजी रोकडे व पोकॉ भारत पाटील यांना गोपनिय बातमीदारामार्फत मिळाली होती.

गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि दत्तात्रय काळे व त्यांचे तपास पथक सदर ठिकाणी गेले असता त्यांना तेथे एक काळया रंगाची युनीकॉर्न मोटार सायकलवर ३ इसम संशयास्पद स्थितीत थांबल्याचे दिसून आले. त्यांना जागीच ताब्यात घेण्यात आले.

महंमदरफिक लालसाब जातगर ऊर्फ मनगोळी (वय-२६, रा.जातगर वस्ती, अलमेल, ता.सिंदगी, जि.विजापूर, राज्य कर्नाटक) राजा नुरजानसाब सौदागर, (वय-२६, रा.वॉर्ड नंबर ०९, भारत नगर, अलमेल, ता.सिंदगी, जि.विजापूर, राज्य कर्नाटक) प्रदीप सुर्यकांत काळभोर, (वय-३५, रा.लोणी स्टेशन जवळ, इंदिरा नगर, कदम वस्ती, लोणी काळभोर, जि.पुणे) अशी त्यांची नावे आहेत.

त्यांच्या विरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करणेत आला आहे. सपोनि दत्तात्रय काळे, पोलिस अंमलदार संताजी रोकडे, अनिल जाधव, महेश शिंदे, भारत पाटील, कुमार शेळके, राजु मुदगल, महेश पाटील, महेश रोकडे, अंकुश भोसले, सुभाष मुंडे, सिध्दाराम देशमुख, राजेश मोरे, अजय गुंड, प्रकाश गायकाड, मच्छिंद्र राठोड, सतिश काटे, बाळु काळे यांनी ही कामगिरी बजावली.

# अक्षता सोहळ्यानंतर जयोस्तुते फाऊंडेशनतर्फे स्वच्छता अभियानाचे आवाहन

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज यांच्या पावन अक्षता सोहळ्यानंतर शहर व परिसर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्याच्या उद्देशाने जयोस्तुते फाऊंडेशनच्या वतीने व्यापक स्वच्छता अभियान सिद्धेश्वर मंदिर परिसरात मंगळवारी १३ जानेवारी रोजी दुपारी एक वाजता राबविण्यात येणार आहे. या अभियानात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच स्वयंसेवी संघटनांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जयोस्तुते फाऊंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. आधिक माहितीसाठी शैलेश स्वामी



(मो. ९८८१९०३६०३) यांच्याशी संपर्क साधावा. या स्वच्छता अभियानामध्ये मंदिर परिसर, सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, चौक, शाळा परिसर तसेच रहिवासी भाग स्वच्छ करण्यावर विशेष भर देण्यात येणार आहे. स्वच्छतेबाबत जनजागृती करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. युवा मंडळे, महिला बचत गट, भारत स्काऊट-गाईड, एनसीसी, विविध शाळा-महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या अभियानाला यशस्वी करावे, असे आवाहन जयोस्तुते फाऊंडेशनने केले आहे. सामूहिक सहभागातून स्वच्छता ही केवळ जबाबदारी नसून सामाजिक संस्कार आहे, हा संदेश देत हे अभियान राबविण्यात येणार आहे.



# कुलकर्णी विद्यालयात आठवडा बाजार उत्साहात

**माळशिरस, दि. १२ जानेवारी-**

पुस्तकी ज्ञाना बरोबर विद्यार्थाना व्यवहारिक ज्ञान अतिशय महत्वाचे आहे आनंदी बाजारच्या माध्यमातून विद्यार्थांना ज्ञान मिळेल, असे प्रतिपादन संचालक संतोष कुलकर्णी यांनी उद्घाटन प्रसंगी केले यावेळी संचालक धनंजय मस्के,प्रा देविदास गेजगे, मुख्याध्यापिका कांबळे ,माजी मुख्याध्यापक सुरवसे,अमित दोशी उपस्थित होते

मारुतीनाना कुलकर्णी प्राथमिक विद्यालयात आनंदी बाजार भरवण्यात आला होता. आनंदी बाजाराचा आनंद घेण्यासाठी सकाळपासूनच विद्यार्थी विविध पोशाखात साहित्य विकण्यास घेऊन आले होते.यामध्ये भाजी, फळे, फुले पासून खारेमुरे, शेव - चिवडा, भेळ, वडापाव - भजी, पाणीपुरी, इडली, गुलाब जामुन, चहा यासारखे खाण्याचे पदार्थ होते.कापडी पिशवी विक्रेता, फुगेवाला, पुस्तके यांनी गर्दी खेचली.सक्रात सनापूर्वी भरलेल्या या बाजारास चांगला प्रतिसाद मिळाला पालक पाहण्यात - खाण्यात दंग तर काहीजण बाजारचा मनसोक्त आनंद घेत होते. विद्यार्थ्यांना खरेदी - विक्री अनुभव मिळावा व दैनंदिन व्यवहारात याचा वापर व्हावा हा हेतू असल्याचे संचालक संतोष कुलकर्णी त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास पालक सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, परिसरातील बहुसंख्य पालक उपस्थित होते.

## जवळा येथे जयंती निमित्त उद्या समाधी दर्शन सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१२ जानेवारी -**

सांगोला तालुक्याचे स्व.आ.काकासाहेब साळुंखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त बुधवार दि.१४ जानेवारी रोजी जवळा (ता.सांगोला) येथे स.१० ते दु. ४ पर्यंत त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी समाधी दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

सांगोला तालुक्यातील शेतीच्या पाणी प्रश्नाचा पाठपुरावा करतानाच त्यांनी जगाचा निरोप घेतला. सर्वसामान्य जनतेसाठी त्यांनी केलेल्या कार्याचे स्मरण तालुक्यातील तरुण पिढीला व्हावी आणि त्यांच्या कार्यापासून तरुणांनी प्रेरणा घेऊन राजकारण आणि समाजकारणात सक्रीय व्हावे यासाठी व त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी हा समाधी दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. तरी नागरिकांनी अभिवादन करण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन साळुंखे-पाटील परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# मतदान हा अधिकारच नव्हे तर कर्तव्य... मतदान करुया, लोकशाही बळकट करुया...




## सोलापूर विद्यापीठाच्या वतीने स्वदेशी संकल्प रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

स्वामी विवेकानंद जयंती, राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व हुतात्मा दिनानिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने 'स्वदेशी संकल्प रॅली' काढण्यात आली. "स्वदेशीचा स्वीकार, देशाच्या विकासाचा आधार... भारतीय वस्तू वापरा, देश मजबूत करा... मतदान हा अधिकारच नव्हे तर कर्तव्य आहे... मतदान करुया, लोकशाही बळकट करुया..." अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडण्यात आले होते.


विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, क्रीडा विभाग, स्त्री शक्ती स्वयंसिध्दा केंद्र, प्रधानमंत्री उच्च शिक्षा अभियान आणि स्वदेशी जागरण मंच यांच्या संयुक्त विद्यमाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रंगभवन, डफरीन चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, हुतात्मा चौक या मार्गावरुन ही रॅली काढण्यात आली. यात शहरातील विविध महाविद्यालयांतील एनएसएस अर्थात राष्ट्रीय सेवा योजनाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या रॅलीचे उद्घाटन प्र-कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.राजेंद्र वडजे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.केदारनाथ काळवणे, वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ.श्रीकांत अंधारे, डॉ.अंजना लावंड, स्वदेशी जागरण मंचचे चन्नवीर बंकुर आदी उपस्थित होते.

# 'दक्षिण'मधील वाळू ठेकेदारांकडून नियमांचे उल्लंघन

## महसूल विभागाची बघ्याची भूमिका; घरकुल लाभार्थ्यांना आर्थिक भुर्दंड

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील लवंगी व भंडारकवठे येथील भीमा नदीपात्रातील वाळू लिलाव झाल्याने शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून ठेकेदारांकडून वाळू उपसा व वाळू वाहतूक होत आहे. यामुळे पर्यावरणप्रेमी व सामाजिक कार्यकर्त्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. शासनाच्या नियमापेक्षा अधिक पटीने रॉयल्टी घेण्यात



येत असल्याने बांधकाम करणार्या घरकुल लाभार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावे लागत आहे. याबाबत मंद्रूप तहसीलदार विष्णु बुटे यांच्याकडे विचारणा केल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत आहे.

आठ दिवसापासून ठेकेदाराकडून लवंगी येथील भीमा नदीमधून वाळू उपसा सुरू आहे. याठिकाणी सीसीटीव्हीच्या निगराणीत वाळू उपसा करणे बंधनकारक आहे. तसेच वाहनांसाठी जीपीआरस सिस्टीम लागू करण्यात आली आहे. मात्र आठ दिवसात या नियमांचे उल्लंघन झाली आहे. वाळूसाठी एका ब्रासला पाच हजार रूपये रॉयल्टी घेण्यात येत असल्याचे वाहनचालकांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे शासनाकडून मंजूर घरकुल लाभार्थी व इतरांना घराच्या बांधकामासाठी चढ्या दराने वाळू विकत घ्यावे लागत आहे. मंद्रूप परीसरात चार ते पाच ब्रास वाळू पंचवीस हजार रूपयापर्यंत देण्यात येत आहे. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांना वाळू वापरणे खर्चिक ठरत आहे. तसेच अनेक वाहनामधील वाळूवर कापड न टाकल्याने वाहनधारकांना त्रास सहन करावे लागत आहे. शिवाय अनेक वाहनांमधून रस्त्यावर पाणी पडत असल्याने गाड्या घसरत आहेत. त्यामुळे महसूल विभागाकडून कारवाई होणे अपेक्षित असताना महसूल विभाग बघ्याची भूमिका घेत आहे. त्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मंद्रूप व परीसरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी तक्रार केल्यानंतर सोमवारी मंद्रूपचे तहसीलदार व तलाठी यांनी वाळू ठेक्याला भेट देऊन पाहणी केली. यावेळी वाळू ठेकाजवळ अनेक त्रुटी असल्याने त्या त्रुटींची पूर्तता करा अन्यथा कारवाई करण्याचा इशारा तहसीलदार विष्णु बुटे यांनी दिल्याचे सांगण्यात येत आहे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर मंगळवार, १३ जानेवारी २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



संस्कार प्रदान करून मनुष्याला सभ्य बनविण्यात संगीत, साहित्य, कला यांचे योगदान खूप महत्त्वाचे आहे. एका प्राचीन कवीने म्हटले आहे, ''जो मनुष्य साहित्य, संगीत व कलेपासून दूर राहिला तो साक्षात् पशू होय, ज्याला शिंगे व शेपटी नाही आणि ज्याचे खाद्य गवत नाही.''
**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

# जि. प. निवडणुकीला मुदतवाढ

## • निवडणूक आयोगाला दिलासा • १५ फेब्रुवारीपर्यंत निवडणुका पूर्ण करण्याचा निर्देश

**नवी दिल्ली, १२ जानेवारी**

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी राज्य निवडणूक आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिली तसेच १५ फेब्रुवारीपर्यंत निवडणुका पूर्ण करण्याचा निर्देश दिला आहे. त्यामुळे राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका पुन्हा एकदा लांबवणीवर पडल्या. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयाकडे मुदतवाढ मागितली होती.



राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घेण्यात याव्यात, अशी मुदत न्यायालयाने घालून दिली होती. मात्र, सध्या महानगरपालिकांच्या निवडणुकीचा धुमधडाका सुरू आहे. प्रशासकीय कारणास्तव १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी करणारा अर्ज राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयात दाखल केला होता.

यावर आज सुनावणी झाली. यावेळी १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी मुदतवाढ मिळाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील कुर्डूवाडी येथील जिल्हा परिषद, पंचायत समिती मेंबर्स असोसिएशनचे पदाधिकारी कैलास गोरे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. नगरपालिका, महापालिकांप्रमाणेच ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्याही निवडणुका न्यायालयीन निर्णयास अधीन राहून घ्याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचा आदेश राज्य निवडणूक आयोगास दिला होता. ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण देण्याचा वाद न्यायालयात पोहोचल्यानंतर सुरुवातीस सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ५० टक्के आरक्षण मर्यादित घेण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. (वृत्तसंस्था)

### २० जिल्हा परिषदांनी ओलांडली ५० टक्क्यांची मर्यादा

पश्चिम महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांतील जिल्हा परिषदांच्या निवडणुका होत असताना ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्यामुळे इतर २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यास आयोगाने असमर्थता दाखविली होती. या २० मधील बहुतांश जिल्हा परिषदा विदर्भ आणि मराठवाड्यातील असल्याने तेथील आरक्षणाचा गुंता सुटल्याशिवाय निवडणुका घेता येणार नाहीत, अशी भूमिका आयोगाने घेतली होती.

### मातृतीर्थ सिंदखेडराजात जिजाऊ जन्मोत्सव



राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या ४२८ व्या जन्मोत्सवानिमित्त सिंदखेडराजातील राजवाडा येथे आलेले हजारो जिजाऊभक्त

## महत्त्वाचे

### निर्देशांक, निफ्टीची पुन्हा भरारी

**मुंबई :** मागील आठवडाभरापासून गुंतवणूकदारांना घाम फोडणाऱ्या शेअर बाजारातील घसरणीचे सत्र सोमवारी अखेर थांबले. सुरुवातीच्या सत्रात मोठी पडझड होऊनही दुपारनंतर बाजार सावरला आणि सलग पाच दिवसांच्या पडझडीनंतर दोन्ही निर्देशांक वधारले. मुंबई बाजारातील निर्देशांक ३०१ अंकांनी वाढून ८३,८७८ वर तसेच निफ्टी १०७ अंकांच्या मजबुतीसह २५,७९० वर स्थिरावला. टाटा समूहातील टाटा स्टीलच्या शेअरमधील तेजी हे सोमवारच्या व्यवहाराचे मुख्य वैशिष्ट्य राहिले. हा शेअर तब्बल तीन टक्क्यांनी वाढला आणि त्याद्वारे निर्देशांकातील सर्वाधिक नफा देणारा शेअर ठरला.

# भारतीय पासपोर्टधारकांसाठी व्हिसामुक्त प्रवास

**जर्मनीची घोषणा**



**नवी दिल्ली, १२ जानेवारी**

जर्मनीने आपल्या विमानतळांवरून प्रवास करणाऱ्या भारतीय पासपोर्ट धारकांसाठी व्हिसा-मुक्त ट्रान्झिट सुविधेची घोषणा केली. या निर्णयामुळे भारतीय नागरिकांचा आंतरराष्ट्रीय प्रवास लक्षणीयरीत्या सुलभ होईल आणि दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील, अशी अपेक्षा आहे.

जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्या १२-१३ जानेवारी रोजीच्या भारत भेटीनंतर सोमवारी जारी करण्यात आलेल्या भारत-जर्मनी संयुक्त निवेदनात या निर्णयाची घोषणा करण्यात आली. चान्सलर म्हणून मर्झ यांचा हा पहिला भारत दौरा होता. आशिया खंडालाही त्यांनी पहिल्यांदाच भेट दिली आहे.

सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, व्हिसा-मुक्त ट्रान्झिट सुविधेचा अर्थ असा आहे, दुसऱ्या देशात जाताना जर्मन विमानतळांवरून प्रवास करणाऱ्या भारतीय प्रवाशांना आता स्वतंत्र ट्रान्झिट व्हिसासाठी अर्ज करण्याची आवश्यकता भासणार नाही. यामुळे प्रवास अधिक सुलभ, वेगवान आणि कमी दस्तावेजांवर होईल.

या पावलामुळे भारतीय नागरिकांचा प्रवास सुलभ होईलच, शिवाय लोकांमधील संबंध अधिक दृढ होतील, असे संयुक्त निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मजबूत लोक-ते-लोक संबंध हे सामरिक भागीदारीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहेत, असे संयुक्त निवेदनात नमूद केले. (वृत्तसंस्था)

### उच्च शिक्षणावर सर्वसमावेशक आराखडा

दोन्ही बाजूंनी उच्च शिक्षणावर एक भारत-जर्मन सर्वसमावेशक आराखडा तयार करण्यास सहमती दर्शवली आणि नरेंद्र मोदी यांनी नवीन शिक्षण धोरणाच्या अंतर्गत भारतातील आघाडीच्या जर्मन विद्यापीठांना भारतात कॅम्पस उघडण्यासाठी आमंत्रित केले.

### शिक्षण-कौशल्य चर्चेच्या केंद्रस्थानी

शिक्षण आणि कौशल्याचा मुद्दा दोन्ही नेत्यांच्या चर्चेच्या केंद्रस्थानी होता. नेत्यांनी जर्मनीमधील भारतीय विद्यार्थ्यांची वाढती संख्या, संयुक्त आणि दुहेरी पदवी कार्यक्रमांचा विस्तार आणि उच्चशिक्षण संस्थांमधील वाढत्या सहकार्याची नोंद घेतली.

# पीएसएलव्ही-सी ६२ भरकटले

### निर्धारित कक्षेत पोहोचण्यात अपयशी

**श्रीहरिकोटा, १२ जानेवारी**

विदेशी पृथ्वी निरीक्षण उपग्रहासह १६ उपग्रह घेऊन जाणारे इस्रोचे पीएसएलव्ही-सी १२ रॉकेट एका तांत्रिक बिघाडाला सामोरे गेले, असे भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात् इस्रोने सोमवार सांगितले. यामुळे ही मोहीम अपयशी ठरल्याचे संकेत मिळत आहेत.

उड्डाणाच्या तिसऱ्या टप्प्यात यान नियोजित उंचीवर पोहोचवण्यासाठी स्ट्रॅप-ऑन मोटर्स बळ देत असताना रॉकेटमध्ये गडबड झाली आणि नंतर ते उड्डाण मार्गापासून भरकटल्याचे दिसून आले, असे अंतराळ संस्थेचे अध्यक्ष व्ही. नारायणन् यांनी सांगितले. याचे कारण शोधण्यासाठी सखोल विश्लेषण सुरू करण्यात आले आहे, असेही ते म्हणाले.



उपग्रहांना नियोजित कक्षेत स्थापित करण्याचे अभियान यशस्वी होऊ शकले नाही आणि सर्व १६ उपग्रह नष्ट झाले. पीएसएलव्हीसाठी ही दुसरी मोहीम अपयशी ठरली आहे. कारण, मे २०२५ मध्ये केलेला असाच एक आधीचा प्रयत्नही यशस्वी झाला नव्हता.

२२.५ तासांची उलटगणना संपताच ४४.४ मीटर उंच असलेले चार टप्प्यांचे हे रॉकेट नियोजित वेळेनुसार सकाळी १०.१८ वाजता येथील अंतराळ केंद्रावरून प्रक्षेपित झाले. जवळपास १७ मिनिटांनंतर एक प्राथमिक पृथ्वी निरीक्षण उपग्रह आणि इतर उपग्रह ५१२ किमीच्या सूर्य-समकालिक कक्षेत स्थापित करणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट होते.

मोहीम संचालकांच्या मंजुरीनंतर स्वयंचलित प्रक्षेपण प्रक्रिया सुरू झाली. यान वरच्या दिशेने जात असताना इस्रोच्या शास्त्रज्ञांनी प्रत्यक्ष वेळेनुसार नवीन माहिती दिली. उड्डाणाचे सुरुवातीचे दोन टप्पे योजनेनुसार पार पडले. मात्र, तिसऱ्या टप्पा प्रज्वलित झाल्याच्या घोषणेनंतर मिशन कंट्रोल सेंटरमध्ये अस्वस्थ शांतता पसरली. (वृत्तसंस्था)

**तिसऱ्या टप्प्यात तांत्रिक बिघाड**
(शेवटच्या पानावर)




## अग्रलेख...

# आले किती, गेले किती...

आपल्या कर्तबगारीच्या रेषेची लांबी अधिक राखण्यासाठी इतरांच्या कर्तबगारीची रेघ पुसायची नसते, तर आपल्या रेषेची लांबी पुसली जाणार नाही याची काळजी घेत तिची लांबी अधिक वाढवायची असते, असा सल्ला देणारी एक म्हण मराठीत प्रचलित आहे. पण मराठी माणसाच्या मानसिकतेची जी काही मोजकी वैशिष्ट्ये सांगितली जातात, त्यासोबत ही म्हण काहीशी विसंगतदेखील असल्याचे मानले जाते. आज जग जवळ येत आहे, देशोदेशीच्या भौगोलिक सीमांच्या पलीकडे जाऊन माणसामाणसांतील जवळीक वाढत आहे, माणसांतील सहकार्याची भावना वाढीस लागून एकमेकांस साहाय्य करून अवघ्यांची प्रगती साधावी हा विचार स्वीकारला जात आहे. एका बाजूला, वसुधैव कुटुम्बकम या भारतीय संस्कृतीचा प्रसार जगभर सुरू आहे, तो विचार स्वीकारला जात असून, ज्यांच्याकडे देण्यासारखे भरपूर काही आहे ते त्यांनी अभावग्रस्तांस द्यावे आणि आपल्या प्रगतीसोबत त्यांच्याही प्रगतीस हातभार लावावा अशी भावना बळावत आहे, तर दुसरीकडे माणसामाणसांतील भेदभावही वाढत असून वेगवेगळ्या कारणांमुळे मानसिक अंतरही दुणावत चालले आहे. अनेक कारणांमुळे सामाजिक जवळीक पुसली जात आहे आणि कुटुंबव्यवस्थेची अवस्थाही चिंताजनक होत चालली आहे. अशा परिस्थितीत, आपल्या रेघेची लांबी मोठी राहावी यासाठी फारसे प्रयत्न करण्याऐवजी इतरांच्या रेषा पुसणेच सोपे असल्याचे ओळखून तसे प्रयत्नही होताना दिसत आहेत. मराठी माणसांच्या मानसिकतेबाबत तर तसेच बोलले जात असल्याने, त्या मानसिकतेसाठी ही म्हण अतिशय चपखल असल्याचे बोलले जाते. एवढेच नव्हे, तर असे करणे हीच मराठी मानसिकता, असा कुचेष्टेचा सूरही याबाबत लावला जातो. आपली प्रगती होत नसेल तर दुसऱ्याचे पाय खेचावेत आणि त्याच्या प्रगतीचा मार्ग रोखावा ही मराठी मनाची बुरसट मानसिकता असल्याच्या टीकेची टोचणी मराठी संस्कृतीस केव्हापासून लागून राहिलेली असल्याने, बदलत्या जगात आणि वैश्विक मानसिकतेच्या कक्षा विशाल होत असताना अशी संकुचित मानसिकता पुसली पाहिजे या जाणिवा रुजविण्याची आता खरी गरज आहे. मराठी माणसाची प्रवृत्ती खेकड्यासारखी असते, अशा कुत्सित उपमादेखील कधी कोणाकडून दिल्या जातात, तेव्हा मराठीपणाच्या वास्तवाकडे तटस्थतेने पाहून भल्याबुऱ्याचा हिशेब मांडण्याचा व गरजेनुसार बदल अथवा दुरुस्त करण्याचा शहाणपणा अंगी आला पाहिजे असा सध्याचा काळ आहे. मराठी मानसिकतेस संकुचितपणाचे लेबल चिकटविले जात असेल, त्या मानसिकतेस खेकड्याच्या स्वभावाची उपमा दिली जात असेल किंवा इतरांच्या कर्तृत्वाच्या रेषा पुसून आपल्या रेषेची लांबी वाढविण्याचा त्याचा स्वभाव असल्याचे सांगितले जात असेल, तर ते बदलणे आणि प्रगतीच्या व उत्कर्षाच्या वाटेवर चालताना इतरांचे बोट धरण्याची गरज मराठी मानसिकतेने ओळखली पाहिजे. कारण, बदलत्या जगाची ती गरज आहे आणि त्यासोबत चालण्यातच खरे हित आहे. हा बदल स्वीकारणे आणि अंगीकारणे सोपे नाही, कारण, या मानसिकतेचा पगडा जुनाच असल्याने एकदम तो काढून फेकून देणे काहीसे अवघडही होऊ शकते. त्यामुळेच, त्यासाठी प्रखर निर्धार हवा आणि त्या मानसिकतेच्या खाणाखुणादेखील जवळपास फिरकणार नाहीत याची जाणीवपूर्वक काळजीदेखील घ्यावयास हवी.

मुळात, संकुचित मानसिकता निर्माण होण्याची कारणे शोधताना, मराठी माणसाच्या स्वाभाविक वाटचालीचा मागोवा घेणे योग्य ठरेल. मराठी माणूस मुळात कर्तबगार आहे, पराक्रमी आहे आणि मराठीपणाच्या कर्तबगारीने इतिहासाची असंख्य पाने सोनेरी होऊन सजलेली आहेत. त्यामुळे मराठी माणसाच्या कर्तबगारीच्या रेषा अगोदरच एवढ्या लांब आहेत, की ती लांबी गाठण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्तबगारीच्या असंख्य पायऱ्या पार करतानाही एखाद्याची दमछाक होऊ शकते. असे असतानाही, आपल्या कर्तबगारीवर विश्वास ठेवण्याऐवजी किंवा कर्तबगारीच्या इतिहासात भर घालण्याऐवजी आपल्या कर्तबगारीच्या रेषा पुसण्याचे प्रयत्न सुरू असल्याच्या अवास्तव भयाखाली सतत वावरत राहणे हेच गैर असतानाही, आसपास सातत्याने याच भीतीच्या घंटा बडविल्या जात असून, आपल्या अस्तित्वावर संकट असल्याचे भय दाखवून त्याचे काही लाभ उपटण्याची कारस्थाने हेच या भीतीचे कारण ठरणार असे दिसू लागले आहे. अशी भीती दाखविण्याची जी काही कारणे आहेत, त्यामध्ये राजकारण हे महत्त्वाचे कारण आहे, हे आता लपून राहिलेले नाही. अस्तित्व पुसण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा बागुलबुवा माणसासमोर उभा केला की त्या भयाच्या सावटाखाली असुरक्षितपणाची भावना बळावते, ते वास्तव आहे किंवा नाही याची खात्री करण्याच्याही फंदात फारसे कोणी पडत नाही आणि भयग्रस्तांच्या कंपूत सहभागी होऊन मुळातच नसलेल्या भीतीपासून स्वतःचे संरक्षण करण्याकरिता धडपड सुरू होते. अलिकडच्या काहींच्या संकुचित राजकारणाने नेमके हेच ओळखले असून अस्तित्व पुसण्याच्या कटाचा बागुलबुवा दाखवून मराठी मनावर कब्जा मिळविण्याचे नेमके हत्यार त्या हातात आले आहे. मुंबईवरील मराठी ठसा पुसण्याचा प्रयत्न होत असल्याचा कांगावा करून अगोदरच अस्तित्वाच्या भयखुणा उमटलेल्या मनामनात आणखी असुरक्षितता पेरण्याचा हा प्रयत्न दीर्घकालानंतर मराठी मने कमकुवत करून सोडणारा आणि हतबलतेच्या भावनांना खतपाणी घालणारा ठरू शकतो, याची पर्वादेखील अशा राजकारणात केली जात नसेल, तर मराठी मानसिकतेच्या पराक्रमी इतिहासाची परंपरा पुढे चालविण्याची उमेदही संपून जाण्याची भीती अधिक आहे.

मुंबईतील मराठी माणूस हद्दपार करण्याचा, मुंबईचे मराठीपण पुसण्याचा आणि मुंबईतील मराठी माणसाचा हक्क हिरावून घेण्याचा कट सुरू असल्याचा कांगावा करून राजकारण करण्याचा हा प्रयत्न म्हणजे, हतबलतेच्या भावना रुजविण्याचा व त्याचे तात्कालिक लाभ उठविण्याचा एक प्रयत्न ठरू शकतो. ते टाळण्याची गरज असताना उलट आता त्यापुढचे पाऊल टाकले जात असल्याचे दिसू लागले असून केवळ भावनिक राजकारण करून मराठी मने कमकुवत करण्याचा व त्याचा लाभ उठविण्याचा प्रयत्न सुरू झाल्याची शंका यावी असा खेळ सुरू झाला आहे. मराठीपण पुसण्याचा प्रयत्न होत असल्याचा कांगावा करून भय पेरण्याच्या राजकारणाचा प्रभाव पुरेसा ठरत नसल्याची जाणीव कदाचित या कांगाव्याच्या लाभार्थींना आता झाली असावी. त्यामुळेच त्यापुढे जाऊन आता नावे पुसण्याचा प्रयत्न होत असल्याचा कांगावा सुरू झाला आहे. मुळात, वर्तमानावर उमटलेल्या नावामागेही इतिहासाचीच पुण्याई आहे हे न ओळखता किंवा आजच्या काळावर आपली नावे उमटली यामध्ये आपले कर्तृत्व नेमके काय याचा विचारही न करता हा नवा कांगावा सुरू करणे म्हणजे नावामागे असलेल्या कर्तबगारीच्या रेषेची लांबी वाढविण्यात येणाऱ्या अपयशाची कबुली ठरते. इतिहासावर आपली नावे उमटविणाऱ्यांच्या पुण्याईवरच आपल्या कर्तृत्वाच्या रेषांची लांबी वाढली आहे याची जाणीवही न ठेवता, नावे पुसण्याच्या भयाचा बागुलबुवा उभा करून भावनिक भयाचे नवे हत्यार आता उपसले जाऊ लागले आहे. आपल्या नावापुढे जन्मदात्याचे नाव नसते, तर आपण शून्य आहोत याची जाणीव बोलून दाखविणाऱ्यांना अगोदरच आपल्या कर्तृत्वाच्या रेषेची लांबी नेमकी किती आहे हे माहीत आहे. ती लांबी वाढविण्यासाठी आपण कोणते कर्तृत्व दाखविले, याचा हिशेबदेखील मांडता येत नसेल, तर अगोदरच्या पिढ्यांच्या कर्तृत्वाची रेषा जपण्याची तरी उमेद जिवंत ठेवावयास हवी. केवळ इतिहासाची जपणूक केली नाही म्हणून भूतकाळातील अनेक कर्तबगार नावेदेखील इतिहासातून पुसली गेली, हादेखील एक इतिहासच आहे. एखाद्या नावाची प्रतिष्ठा वाढविण्याएवढी कर्तबगारी दाखवून इतिहासताने लिहिलेल्या नावावर सोनेरी मुलामा चढविण्याची कर्तबगारी गाजवायची, की नावे पुसली जाणार या भीतीचा बागुलबुवा समोर उभा राहिल्याचे भासवत हातपाय गाळून इतरांकडे आधाराची अपेक्षा करायची, हे ज्याचे त्याने ठरवायला हवे. अन्यथा, कोणत्याही मानसिकतेला लागलेल्या गैरसमजाची कीड पुसणे अवघडच होत जाईल.

## आंतरराष्ट्रीय

# इराणमधील जनता रस्त्यावर का?

**प्रा. जयसिंग यादव**

श्रीलंका, नेपाळ, बांगलादेशनंतर अलिकडे इराणमध्येही लोक रस्त्यावर उतरले. नेपाळ किंवा फ्रान्सप्रमाणे जेन झी रस्त्यावर उतरून आपल्याच सरकारला आव्हान द्यायला लागली आहे. राजधानीच्या मुख्य ग्रॅण्ड बाजाराभोवतीही निदर्शने झालीत. निदर्शकांनी सरकारविरोधी घोषणाबाजी केली. व्यापारी आणि दुकानदारांनी तेहरानच्या मध्यभागी सादी स्ट्रीटवर आणि राजधानीच्या मुख्य ग्रॅण्ड बाजाराजवळील शुश परिसरात मोर्चा काढला. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत इराणच्या चलनाच्या आतापर्यंतच्या नीचांकी घसरणीनंतर आणि देशाच्या मध्यवर्ती बँकेचे प्रमुख मोहम्मद रेझा फरझान यांनी राजीनामा दिल्याच्या वृत्तानंतर ही निदर्शने झालीत. निदर्शकांना शांत करण्याचा प्रयत्न करताना, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी हा लोकांच्या जीवनमानाचा हा रोजचा प्रश्न आहे आणि निदर्शकांच्या मागण्यांना वैध म्हटले आहे. त्यांनी इराणच्या गृहमंत्र्यांना निदर्शकांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या न्याय्य मागण्या ऐकण्याचे निर्देश दिले आहेत; जेणेकरून सरकार समस्या सोडवण्यासाठी आणि जबाबदारीने प्रतिसाद देण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करू शकेल. पाश्चात्त्य निर्बंधांमुळे इराणी अर्थव्यवस्थेला बसलेल्या धक्क्यामुळे निदर्शने सुरू झालीत. खुल्या बाजारातील दरांवर लक्ष ठेवणाऱ्या वेबसाईटनुसार, देशाचे चलन, रियाल अमेरिकन डॉलरच्या तुलनेत सुमारे १३ लाख नव्वद हजाराच्या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचले. त्यामुळे व्यापक संताप निर्माण झाला. 'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार, सुमारे नव्वद दशलक्ष लोकसंख्येच्या इराणमध्ये रियालच्या घसरत्या मूल्यामुळे अन्नधान्याच्या किमती गगनाला भिडल्या.

इराणच्या भयानक आर्थिक परिस्थितीत लोक रस्त्यावर उतरले असताना, निदर्शक आणि सुरक्षा दलांमधील संघर्षांचे फुटेज ऑनलाईन समोर आले. इराण तीव्र महागाई आणि राष्ट्रीय चलनाच्या घसरणीशी झुंजत असताना ही निदर्शने समोर आली आहेत. अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांनी लादलेल्या निर्बंधांचा बराच काळ परिणाम होत आहे; परंतु आता परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. 'स्टेट स्टॅटिस्टिकल सेंटर'च्या मते डिसेंबरमध्ये महागाई ४२.२ टक्क्यांवर पोहोचली. ती नोव्हेंबरपेक्षा १.८ टक्क्यांनी जास्त आहे. अन्नधान्याच्या किमती ७२ टक्क्यांनी वाढल्या आणि आरोग्य आणि वैद्यकीय पुरवठ्याच्या किमती गेल्या वर्षीच्या डिसेंबरच्या तुलनेत पन्नास टक्क्यांनी वाढल्या. गेल्या आठवड्याच्या शेवटी इराणचे चलन अमेरिकन डॉलरच्या तुलनेत विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचले, तेव्हा त्याच्या आर्थिक अडचणी आणखी वाढल्या. 'इर्ना' या इराणच्या मुख्य सरकारी वृत्तसंस्थेनुसार, रियालच्या तीव्र अवमूल्यनामुळे व्यवसायाला धोका निर्माण झाल्यामुळे मोबाईल फोन विक्रेते संतप्त झाले होते.



इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये लिहिले की, लोकांचे जीवनमान ही माझी दैनंदिन चिंता आहे. सरकारने चलनविषयक आणि बँकिंग प्रणालींमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि लोकांची क्रयशक्ती राखण्यासाठी पावले उचलली आहेत. महागाई सुमारे पन्नास टक्के असताना वीस टक्के पगारवाढ प्रस्तावित करणाऱ्या त्यांच्या सरकारच्या वादग्रस्त अर्थसंकल्पीय विधेयकाचे समर्थन करताना इराणच्या राष्ट्रपतींनी महागाई आणि महागाई वाढीशी लढण्याचे वचन दिले. तथापि, ही महागाई आणि घसरत्या चलनावर नियंत्रण मिळवण्याची शक्यता कमीच दिसते. इराणच्या आर्थिक संकटाविरुद्ध आणि चलन घसरणीविरोधात चौथ्या दिवशीही निदर्शने सुरूच राहिली. दक्षिण फार्स प्रांतातील फासा शहरातील स्थानिक सरकारी इमारतीवर निदर्शकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली. इराणी सरकारी माध्यमांच्या मते निदर्शकांच्या एका गटाने फासा गव्हर्नरेट कार्यालयाचे गेट तोडण्याचा प्रयत्न केला. चार दिवसांच्या निदर्शनांमध्ये जमाव पहिल्यांदाच हिंसक झाला आहे. या वेळी सुरक्षा दलांनी हस्तक्षेप करून हल्ल्याचा प्रयत्न हाणून पाडला. गटाचे नेतृत्व करणाऱ्या २८ वर्षीय महिलेला अटक करण्यात आली. सध्याची परिस्थिती निषेधापासून बंडाकडे वाटचाल करत असल्याचे दिसून येते. सरकार कधी चर्चेची ऑफर देत आहे तर कधी इशारे देत आहे; परंतु समस्येवर कोणताही उपाय निघत नाही. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत इराणी रियाल विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचल्यामुळे महागाई आणि राहणीमान बिघडल्यानंतर ही निदर्शने इतर अनेक शहरांमध्ये पसरली. इस्फहान, याझद आणि झांजनसारख्या शहरांमधील विद्यापीठे आणि संस्थांमध्येही निदर्शने झाल्याचे वृत्त आहे. शांततापूर्ण निदर्शने कायदेशीर आहेत; परंतु हिंसाचार किंवा अराजकता सहन केली जाणार नाही, असे सरकार सांगत आहे.

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या सत्तेला खरोखर धोका आहे का किंवा ही तात्पुरती अशांतता आहे का असे प्रश्न यावेळी उपस्थित केले जात आहेत. इराणमध्ये अस्तित्वात असलेली व्यवस्था आणि सरकारच्या कार्यपद्धतीवरून असे सूचित होत नाही की खामेनी यांचा लवकरच पाडाव होणार आहे. इराणमधील सत्ता केवळ सरकारच्या हातात नाही, तर त्यावर 'रिव्होल्यूशनरी गार्ड' (आयआरजीसी), सुरक्षा संस्था आणि धार्मिक संस्थांचेही नियंत्रण आहे. इतिहास दाखवतो की इराणी राजवटीने यापूर्वी मोठी निदर्शने बळजबरीने दडपली आहेत. इराणच्या अणुकार्यक्रमावरून अमेरिका-इराण संबंध अनेकदा ताणले गेले आहेत. अमेरिका इराणला अस्थिर करण्याचा प्रयत्न करत असल्याचे आरोप वारंवार केले जातात. सत्य हे आहे की अमेरिकेच्या निर्बंधांमुळे इराणच्या अर्थव्यवस्थेचे मोठे नुकसान झाले आहे. तेल निर्यातीवरील बंदी आणि बँकिंग व्यवस्थेच्या ऱ्हासामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. सध्याच्या निदर्शनांमागे अमेरिकेचा थेट हात असल्याचा कोणताही ठोस पुरावा नसला, तरी इराणमधील निदर्शनांशी अनेकदा अमेरिकेचा संबंध जोडला जातो. कारण डोनाल्ड ट्रम्प सध्या त्या देशाचे अध्यक्ष आहेत. ट्रम्प आणि जॉन बोल्टनसारख्या अमेरिकन नेत्यांनी इराणमध्ये सत्ताबदलाची सातत्याने वकिली केली. अर्थात ट्रम्प यांनी कधीही स्पष्टपणे सत्ता बदलण्याचा हेतू जाहीर केला नाही. त्यांच्या मागील कार्यकाळात (२०१८) ट्रम्प यांनी ट्विटरवर लिहिले होते की इराणी नेत्यांना इतिहासात कधीही न पाहिलेले परिणाम भोगावे लागतील.


२०२० मध्ये कासिम सुलेमानीच्या हत्येनंतर ट्रम्प यांनी असेही लिहिले की, इराणी राजवटीला युद्ध हवे असेल, तर इराणचा अंत होईल. तथापि, ट्रम्प यांनी नंतर स्पष्ट केले की, ते राजवट बदलाबद्दल बोलत नव्हते. त्यांनी वारंवार स्पष्ट केले आहे की, अमेरिकेला राजवट बदल नको आहे; परंतु सध्याच्या निदर्शनांना मिळत असलेल्या पाठिंब्यावरून अमेरिका एका अर्थाने इराणमध्ये उठाव भडकवण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. विद्यापीठातील विद्यार्थीदेखील निदर्शनांमध्ये सामील झाले आहेत. त्यांनी 'हुकूमशहा मरण पावला'सारख्या सरकारविरोधी घोषणा दिल्या. या घोषणा खामेनी यांच्याशीदेखील जोडल्या जात आहेत, कारण ते देशाचे सर्वोच्च नेते आहेत. काही निदर्शक १९७९ च्या इस्लामिक क्रांतीमध्ये पदच्युत झालेल्या दिवंगत शाह मोहम्मद रेझा पहलवी यांच्या मुलाच्या समर्थनार्थ घोषणा देतानाही ऐकले गेले. त्यात 'शाह चिरंजीव होवो'सारख्या घोषणांचाही समावेश आहे. प्रत्युत्तरादाखल अमेरिकेत निर्वासित जीवन जगणारे रेझा पहलवी यांनी इन्स्टाग्रामवर लिहिले की, मी तुमच्यासोबत आहे. आपण जिंकू, कारण आपले ध्येय बरोबर आहे आणि आम्ही एक आहोत. ते पुढे म्हणाले की, ही राजवट सत्तेत राहील, तोपर्यंत देशाची आर्थिक परिस्थिती बिघडतच राहील. यावरून इराणमधील संघर्ष कोणत्या थराला गेला आहे आणि तिथल्या सत्ताधीशांविरोधात नाराजी किती वाढली आहे, हे लक्षात येते.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

# 'नेते जमीन'पर...

एरव्ही सेलिब्रेटीप्रमाणे वागणारे, सामान्यांना प्रत्यक्ष भेटणे तर दूरच पण कधी तरी कार्यक्रमांद्वारे दिसणारे अन् ज्यांचे दर्शन केवळ टेलिव्हिजनवरुनच होणारे विविध राजकीय पक्षांचे नेते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनिमित्त मात्र रस्त्यावर उतरुन प्रचार करताना दिसत आहेत. चारचाकी वाहनातून, दुचाकी वाहनावरुन रोड शो आणि पदयात्रेत सहभागी होणारे बडे राजकीय नेते मत मागणीसाठी का होईना; पण हात जोडून सामान्यांसमोर येत असल्याने लोक देखील म्हणत आहेत की, लोकशाहीत घटनेने दिलेल्या मतदानाच्या अधिकारामुळे का होईना. पण बडे नेते, उमेदवार, कायकर्ते केवळ दिसत नाहीत तर हात जोडून समोर उभारतात, घरापर्यंत येवून दंडवत घालत आहेत. हेच मतदार असे देखील म्हणत आहेत की, पाच वर्षांतून किमान आठ ते दहा दिवस तरी राजकीय नेते जमिनीवर असतात. अन्यथा उर्वरित पाच वर्षे आपल्याला ओळखतो तरी कोण?

राज्याचे विधानसभेचे सभापती, उपसभापती, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, चाळीस मंत्री, ४८ खासदार, २८८ आमदारांसह ९० च्या आसपास विधानपरिषदेचे आमदार या बड्या राजकीय हस्ती महापालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी मैदानात उतरल्या आहेत. आपल्या पक्षाची सत्ता यावी यासाठी या नेत्यांची तळमळ, धडपड पाहून लोकदेखील तोंडात बोट घालत आहेत. प्रचाराच्या भाषणातून विविध प्रकारची गाजरे दाखवणारे हे नेते निवडणुका संपल्यानंतर कधी तरी सामान्य जनतेला विश्वासात घेताना दिसतात का? लोकांच्या हितासाठी मोठे निर्णय घेणारे राज्यकर्ते असोत की लोकांसाठीच आम्ही सरकारच्या विरोधात उभारतो, असे सांगणारे विरोधक असोत कधी तरी निर्णय घेताना लोकांच्या मतांचा विचार करतात का? लोक म्हणत आहेत की, मतदान करताना आम्ही आपल्या विचारांच्या राजकीय पक्षांना करतो पण सत्तेसाठी अनेक राजकीय पक्ष आपले विचार कमरेला गुंडाळून कधीही कोणत्याही पक्षाशी हातमिळवणी करीत आहेत. मग आमच्या मतांचा अनादर होतो आणि तो अधिकार यांना कोणी दिला? स्वार्थ आणि सत्तेसाठी तसेच आपली भ्रष्टाचाराची पापे लपविण्यासाठी अनेक पक्षाचे राजकीय नेते विचारधारेला मूठमाती देत पक्षांतर करतात हे राजकारण पुरोगामी महाराष्ट्राला अशोभनीय असल्याचेही लोक बोलत आहेत. केवळ सत्तेसाठी कधी युती-आघाड्या करायच्या तर निवडणुका आल्या की स्वार्थासाठी आणि मतांच्या राजकारणासाठी कोण, कोणत्याही पक्षाबरोबर जाताना दिसतो आहे. नेतेच स्वैर वागत असल्यामुळे आता कार्यकर्तेदेखील सोयीने पक्ष बदलताना दिसतो आहे. राजकारणी स्वार्थ आणि सत्तेसाठी अनितीने वागणार आणि पुन्हा वरुन म्हणणार जैसी प्रजा वैसा राजा... मतांच्या मागणीसाठी घरोघरी फिरणारे आणि रस्त्यावर उतरुन हात जोडणारे नेते एरव्ही मात्र मतदारांना कोलताना दिसतात. ज्या लोकांच्या मतांवर मंत्री मंत्रालयात पोहचतात त्याच लोकांना मंत्रालयात जाण्यासाठी रांगेत उभारायला लावतात. मंत्रालयात सामान्यांना प्रवेश हवा असेल तर त्याला दुपारी दोननंतरची वेळ दिली जाते. ज्यांच्या मतांवर मंत्री मंत्रालयावर राज्य करतात त्यांना राजेशाही वागणूक दिली जाते, ज्यांच्या कररुपी पैशावर चाकरमानी मंत्रालयाचे मालक बनले त्यांचा दरारा मोठा असतो. पण लोकशाहीत ज्यांच्यामुळे मंत्री व प्रशासकीय अधिकारी हा राजेशाही थाट उपभोगतात ते लोक मात्र मंत्रालयात प्रवेशासाठी रस्त्यावर रांगेत उभारुन मंत्रालयात सोडण्याची याचना करताना दिसतात; ही शोकांतिका लोकशाहीत लोकांच्या वाट्याला आलेली आहे. मंत्री आपली कामे अधिकाऱ्यांना धारेवर धरुन करुन घेतात, आप्तेष्ट आणि जवळच्या कार्यकर्त्यांची शासकीय कामे करण्यास मंत्री भाग पाडतात. पण ज्या लोकांच्या मतांवर सत्ता भोगतात त्यांची कामे मात्र होत नसल्याचे वेदनादायी चित्र आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईतील बहुतांश आमदार निवास बंद असल्याने आमदारांना राहण्यासाठी लाखो रुपयांचे भत्ते दिले जातात. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कामासाठी मुंबईत येणाऱ्या नागरिक, कार्यकर्त्यांना राहण्यासाठी खिशाला कात्री लावून हॉटेलमध्ये राहण्याशिवाय पर्याय नसल्याचे चित्र आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून दिलेल्या मताच्या अधिकारामुळे किमान निवडणुका आल्यानंतर तरी सामान्य जनतेला मतदानासाठी महत्व असते. दादा, मामा, ताई, माई, अक्का संबोधून नेते मतांसाठी पाय धरताना दिसतात. पण इतरवेळी पाच वर्षे मात्र मतदारांना कोणीही विचारत नाहीत. निवडणुका आणि मतांसाठी तरी का होईना पण नेते जमिनीवर आल्याचे पाहून लोक मनातल्या मनात तरी खूष होत आहेत, हे मात्र नक्की होय.




# धर्म, मानवता व स्वातंत्र्याचे प्रतीक श्री गुरु तेगबहादुर साहिब जी!

## प्रासंगिक

**- अलका पाटील**
**उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड**

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिब जी हे धर्म, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे महान गुरु होते. शीख इतिहासातच नव्हे तर संपूर्ण भारतीय इतिहासात त्यांना 'हिंद-दी-चादर' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचा जन्म पंजाबमधील अमृतसर येथे वैशाख कृष्ण पंचमी या पवित्र तिथीला झाला. बालपणी त्यांना त्यागमल या नावाने ओळखले जात होते. लहानपणापासूनच ते निर्भय, शूर, विचारशील व उदार स्वभावाचे होते. त्यांचे शिक्षण मीरी-पीरीचे स्वामी, गुरु-पिता श्री गुरु हरगोबिंद साहिबजी यांच्या छत्रछायेत झाले.

अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत परकीय आक्रमणाविरुद्ध लढा देत पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्याने प्रभावीत होऊन गुरु हरगोबिंद साहिबजी यांनी त्यांना 'तेगबहादुर' हे नाव दिले, ज्याचा अर्थ 'तलवारीचा धनी' असा होतो. या काळात त्यांनी गुरुबाणी, धर्मग्रंथांचे अध्ययन तसेच अस्त्र-शस्त्रविद्या व घोडेस्वारीचे शिक्षण आत्मसात केले.

शीख (सिख) धर्माचे आठवे गुरु श्री गुरु हरिकृष्णजी यांची आत्मज्योति विसर्जित झाल्या नंतर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांची नववे गुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी आपल्या गुरुपदाच्या कार्यकाळात संस्कृती रक्षक, सामाजिक समता, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्य यासाठी अखंड प्रयत्न केले. १७ व्या शतकामध्ये तत्कालिन शासन कर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुध्द आवाज उठवून मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व आध्यामिक अस्मितेचे त्यांनी रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक दृढ (मजबुत) झाली. त्यांच्या या त्यागामुळेच ते खऱ्या अर्थाने 'हिंद-दी-चादर' ठरले.



गुरु तेगबहादुर साहिब जी यांच्या शिकवणीत क्षमा, करुणा, समता, प्रेम व मानवतेचा संदेश आहे. चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास क्षमा शक्य आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी १५ रागांमध्ये रचलेले ११६ शबद (गुरुबाणी) श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संकलित असून ते आध्यात्मिक प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे. श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचे सन २०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले योगदान स्मरण होण्यासाठी नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात निशान साहिबांना चोला अर्पण करण्याची सेवा, श्री अखंडपाठ साहिब, कीर्तन, धार्मिक दीवान भरवण्यात येणार आहे. तसेच देशातील नामवंत रागी जत्थ्यांकडून शबद गायन होणार आहे.

त्यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ यावर्षी ३५० वा शहीदी समागम वर्ष साजरा होत असून त्या निमित्ताने राज्यात तीन ठिकाणी श्री तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. यापुर्वी नागपूर येथे हा कार्यक्रम ७ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. आता दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदानावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नांदेडच्या या कार्यक्रमानंतर नवी मुंबई येथे १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य आयोजन करण्यात येणार आहे. या पवित्र प्रसंगी सिख धर्मीय बांधवांसह सर्व धर्मीय भाविक गुरु घरात उपस्थित राहून मत्था टेकणार असून श्रद्धा, भक्ती व ऐक्याचे दर्शन घडणार आहे. धर्म, मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या या महान गुरूंच्या स्मरणार्थ नांदेड येथे होणारा हा शहीदी समागम समाजाला सत्य, त्याग व साहसाचा संदेश देणारा ठरणार आहे.

## वाचक पत्रे

### भोगी : निसर्गाच्या सात्त्विक अन्नाचा आणि आनंदाचा सण

मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी साजरा केला जाणारा भोगी हा सण आनंद, उत्साह आणि निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. मकरसंक्रांतीच्या उत्सवातील आदला दिवस म्हणजे भोगी. साधारणपणे दरवर्षी १३ किंवा १४ जानेवारीला हा सण येतो. भोगी या शब्दाचा अर्थ आहे उपभोग घेणे किंवा आनंद साजरा करणे. विशेषतः शेतकरी वर्गासाठी हा सण अत्यंत महत्त्वाचा असतो, कारण या काळात शेतात नवीन धान्य आणि भाज्यांचे पीक आलेले असते. पौराणिक कथेनुसार, या दिवशी देवराज इंद्राने नहुष राजाचा गर्व हरण केला होता. म्हणून इंद्राची पूजा करून हा दिवस साजरा केला जातो. थंडीच्या दिवसात शरीराला उष्णता आणि ऊर्जा देणारे पदार्थ खाण्याला या दिवशी विशेष महत्त्व आहे.

या दिवशी पहाटे उठून घर स्वच्छ केले जाते. घरासमोर सुंदर रांगोळी काढली जाते. घरातील सर्व सदस्य अंगाला तिळ लावून कोमट पाण्याने स्नान (अभ्यंगस्नान) करतात. नवीन कपडे परिधान करून आनंद साजरा केला जातो. या दिवशी घरामध्ये देवदेवतांची पूजा केली जाते. शेतात आलेल्या नवीन पिकांचा नैवेद्य देवाला दाखवला जातो. भोगीच्या दिवशी मुख्य आकर्षण म्हणजे भोगीची भाजी. हिवाळ्यात मिळणाऱ्या सर्व ताज्या भाज्या एकत्र करून ही भाजी बनवली जाते. यात प्रामुख्याने घेवडा, वालपापडी, हरभरा, गाजर, वांगी, बटाटा, ओले वाटाणे, बोरं आणि शेंगदाणे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भरपूर तिळ या घटकांचा समावेश असतो.

भोगीच्या दिवशी बाजरीची भाकरी आणि लोणी खाण्याची पद्धत आहे. बाजरी उष्ण असते आणि तिळामुळे शरीराला स्निग्धता मिळते, जी हिवाळ्याच्या ऋतूत आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. सोबतीला मुगाची डाळ घातलेली खिचडी आणि कढी देखील केली जाते. महाराष्ट्रात भोगीच्या दिवशी एकमेकांना शुभेच्छा देताना ''भोगीच्या शुभेच्छा, नांदा सुखकर!''असे म्हटले जाते. याचा अर्थ असा की, तुमच्या आयुष्यात सुख-समृद्धी नांदो आणि तुम्हाला सर्व प्रकारचे भोग (सुख) प्राप्त होवोत.

थोडक्यात सांगायचे तर, भोगी हा सण आपल्याला निसर्गाशी जोडतो. नवीन पिकांचा आस्वाद घेणे, आरोग्य जपणे आणि कुटुंबासोबत आनंदाने भोजन करणे हाच या सणामागचा मुख्य उद्देश आहे.

**वर्षा आवदे**/नागपूर

●● ●●

### मकरसंक्रांत : सूर्यदेवताप्रति कृतज्ञता!

सूर्य जेव्हा एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो, त्याला 'सूर्यसंक्रांत' असे म्हणतात. सूर्याचा हा राशिबदल साधारणपणे दर महिन्याला एकदा होत असतो. त्यामुळे वर्षभरात एकूण बारा सूर्यसंक्रांती येतात. कर्कसंक्रांतीनंतर सूर्य दक्षिणेकडे जातो या कालखंडाला 'दक्षिणायन' असे म्हणतात. मकरसंक्रांतीनंतर सूर्य उत्तरेकडे गमन करतो. या गतीला 'उत्तरायण' असे म्हणतात. मकरसंक्रांतीला विशेष महत्त्व दिले गेले आहे. कारण, पृथ्वी सूर्याच्या जवळ गेली अथवा सूर्यापासून दूर गेली, तरी सूर्याच्या तेजावर अथवा सामर्थ्यावर कोणताही परिणाम होत नाही. त्याचप्रमाणे आपल्या जीवनातील चढउतार, सुख-दुःख याकडेही साक्षीभावाने पाहावे, असा महत्त्वाचा संदेश मकरसंक्रांत आपल्याला देते. मकरसंक्रांतीचे आणखी एक महत्त्व म्हणजे कृतज्ञतेची भावना! सूर्यदेवाने तहानलेल्या अश्वांना ज्या मातीच्या घडांनी पाणी पाजले त्या घड्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण असे देखील मकरसंक्रांतीचे महत्त्व आहे. या संदर्भातील आख्यायिका अशी सांगितली जाते की, पृथ्वीवरील बर्फ वितळविण्यासाठी सूर्यदेवाने अधिकाधिक उष्णता देत कठोर तपश्चर्या केली. त्यावेळी सूर्यरथाला जुंपलेल्या अश्वांना ती उष्णता सहन न झाल्याने त्यांना तीव्र तहान लागली. तेव्हा सूर्यदेवाने मातीच्या घड्यांच्या माध्यमातून पृथ्वीवरील पाणी खेचले. जसे विहिरीतून घड्याने पाणी काढले जाते, त्याचप्रमाणे त्या अश्वांना पाणी पाजण्यात आले. या मातीच्या घड्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संक्रांतीच्या काळात त्यांची पूजा करण्याची प्रथा सुरू झाली. आजही मकरसंक्रांतीच्या काळात हळदी-कुंकवाच्या निमित्ताने पूजन केलेले मातीचे घडे (सुगडे) एकमेकींना वाण म्हणून देण्याची परंपरा आपल्याकडे आहे. सूर्यदेवतेप्रति कृतज्ञ राहून, जीवनातील चढउतारांमध्ये स्थिर आणि सकारात्मक राहण्याचा संकल्प करून मकरसंक्रांत अर्थपूर्ण रीतीने साजरी करूया.



**रेणुका हरदास**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## राजे गणपती सांस्कृतिक मंडळातर्फे जिजाऊ जयंती साजरी

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

श्री राजे गणपती सांस्कृतिक मंडळातर्फे वसंत विहार फेज ३, श्री राजे गणपती मंदिर येथे राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुरेश जगताप, परमेश्वर सावंत, राहुल परदेशी, विवेक रुपनर, मंगेश क्षिरसागर, तोडकरी, खंडागळे, नाना सुरवसे, महिला कार्यकर्त्या स्वाती रुपनर, वैजयंती भोसले, सुरेखा जगताप, पुजा परदेशी, अनुजा तोडकरी, सावंत खंडागळे, चित्रा सुरवसे, रचना पाटील, अंजली गुंड, मिटकरी, पवार उपस्थित होते.



## छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडकडून हुतात्म्यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

हुतात्मा दिनाचे औचित्य साधून देशाला स्वातंत्र्य मिळून देण्यासाठी फासावर गेलेले सोलापूरचे चार हुतात्म्यांना मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडकडून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान, जिल्हाध्यक्ष म शफीक रचभरे, राम गायकवाड, बशीर सय्यद, राजू हुंडेकरी, तन्वीर गुलजार, गफूर शेख, रिजवान शेख, रियाज पैलवान, रिझवान दंडोती, सादिक मुजावर, मुख्तार लालकोट, सरफराज शेख, मौला शेख आदी उपस्थित होते.

## राहुल कोनापुरे यांना पीएच.डी.

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**



वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील प्रा. राहुल रमाकांत कोनापुरे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केली आहे. ट्रेसएबिलिटी अँड व्हेरिफिकेशन टू प्रिव्हेंट फेक ड्रग्स थ्रू ब्लॉकचेन (ब्लॉकचेनच्या माध्यमातून बनावट औषधांचा प्रतिबंध करण्यासाठी ट्रेसिबिलिटी व पडताळणी) या विषयावरील त्यांचा संशोधन प्रबंध विद्यापीठाच्या तज्ज्ञ परीक्षक समितीने मान्य केला आहे. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी या विषयातील हे संशोधन प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले असून विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत करण्यात आलेल्या या अभ्यासातून औषध उद्योगातील वाढती बनावट औषधांची समस्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कशी रोखता येईल, याबाबत सखोल मांडणी करण्यात आली आहे. यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, प्राचार्य डॉ. विजय आठवले, विभागप्रमुख डॉ. आशा थळंगे, प्रा. डॉ. कोनापुरे यांचे अभिनंदन केले आहे.



## सुलेरजवळगे शाळेत राष्ट्रीय युवा दिन साजरा

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

जिल्हा परिषद सुलेर जवळगे मराठी शाळेत राष्ट्रीय युवा दिन राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी सुरुवातीला जिजाऊ प्रतिमेचे पूजन विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला जिजाऊ विषयी माहिती सांगितली भारतीय तत्त्वज्ञ रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य होते ज्यांनी वेदांत आणि योगाचे ज्ञान पाश्चात्य जगाला दिले शिकागो येथील जागतिक धर्म परिषदेत १८९३ साली ऐतिहासिक भाषण दिले रामकृष्ण मिशनची स्थापना करून मानवसेवा शिक्षणातून राष्ट्र उभारणीचे कार्य केले राजमाता जिजाऊ शहाजी भोसले यांचा जन्म इसवी सन १५९८ साली झाला हिंदीवी हिंदीवी साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या आई होत्या राष्ट्रमाता जिजाऊ म्हणून समजले जाते त्यांचे आईचे नाव माळसाबाई जाधव होते डिसेंबर १६०५ मध्ये जिजाबाईंच्या शहाजी राजाशी दौलताबाद येथे विवाह झाला कुशलतिने त्या तलवार चालू शकत होत्या सदृढ शौर्य आणि दूरदृष्टीसाठी ओळखले जात होत्या यावेळी सर्व विद्यार्थी ब्रम्हदेव राठोड दत्तात्रय माने प्रेमलता देशमुख धोंडप्पा रूपनुरे दानिस्ता सय्यद इत्यादी उपस्थित होते .

# मुंबईचा यश पाटील विजेता

## समृद्धी करंडक राज्य वक्तृत्व स्पर्धा : सुहास आदमाने व डॉ. ऋचा गोडगे समृद्धी युवा पुरस्काराने सन्मानीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी**

फडकुले सभागृह येथे समृद्धी कला मंचच्या वतीने झालेल्या समृद्धी करंडक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मुंबईच्या यश पाटील प्रथम क्रमांक पटकाविला. महाडचा अमोल गोळे द्वितीय आला. त्यांना तसेच उद्योजक युवक सुहास आदमाने व वैदयकिय क्षेत्रातील युवती ऋचा गोडगे यांना समृद्धी युवा पुरस्काराने मानपत्र, फेटा, शाल व बुके देऊन सन्मानीत करण्यात आले.

या स्पर्धेत राज्यातून ४७ स्पर्धकांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वकौशल्याच्या



जोरावर उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले पारितोषिक वितरण राजन सावंत, विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव शिवाजी शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी या प्रसंगी समृद्धी सोशल फाऊडेशनचे अध्यक्ष संजय सावंत, ॲड बसवराज सलगर, दीपक काळे, डॉ सुभाष कदम, कृष्णकांत चव्हाण, समचंद्र दत्तू , राजू प्याटी, सुमित फुलमामडी, चंद्रकांत होळकर , मल्हारी बनसोडे, किरण लोंढे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी राष्ट्रीय युवक दिनाचे औचित्य साधून समृद्धी परिवातील युवक युवतीचा ट्रॅकसूट देऊन सन्मान करण्यात आला. इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिससाठी निवड झालेल्या मयुरेश वाघमारे, सेपक टकरा या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय रौप्यपदक विजेत्या भक्ती घुले, नम्रता सुळकुंडे, समरजित कदम व प्रणिती नागणे यांचा गौरव करण्यात आला. समृद्धी कला मंचचे अध्यक्ष कृष्णकांत चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. समृद्धी सोशल फाऊडेशनचे अध्यक्ष मा. संजय सावंत यांनी समृद्धी परिवाराचे कार्य व उपक्रमाविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमंत कोळी यांनी केले. मल्हारी बनसोडे यांनी आभार मानले.

### राज्य वक्तृत्व स्पर्धेतील प्रथम चार व उत्तेजनार्थ

यश पाटील (मुंबई), अमोल गोळे (महाड), कार्तिक दराडे (उदगीर), अभय अळशी (मुंबई),संकेत पाटील (कोल्हापूर)

### आजची मुले 'एआय'शी बोलतात, पण आईशी बोलत नाहीत

डॉ. शिवाजी शिंदे यांनी सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकत, ''आजची मुले 'एआय'शी बोलतात, पण आईशी बोलत नाहीत,'' हे वास्तव अधोरेखित केले.व त्यांच्या भाषणाने जीवन कसे जगावे हे त्यांनी काव्यातून सांगितले. स्पर्धेचे परीक्षक प्रा. रोहित देशमुख यांनी उत्तम वक्ता होण्यासाठी उत्तम वाचनाची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले, तर प्रा. पंकज पवार यांनी स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन करत अधिक प्रगल्भ होण्याचा संदेश दिला.

### आई-वडिलांमुळेच आपण घडतो

सध्याचा तरुण वर्ग आई-वडिलांचे म्हणणं ऐकत नाही. त्याच्यापेक्षा त्यांना इतरांचं म्हणणं पटत आहे. वास्तविक पाहता आई-वडिलांमुळेच आपण घडत असतो. तेच आपले खरे गुरु असतात. त्यामुळे प्रत्येकाने आई-वडिलांचा आदर करणे गरजेचे आहे. मी आज उच्च पदापर्यंत भरारी घेतली ती केवळ आई-वडिलांच्या कृपा आशीर्वादामुळेच डॉ. ऋचा गोडगे, इंडियन मेडिकल सर्व्हिस.

# १०८ मृदंग वादकांचा वादन सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**



मृदंग महर्षी गुरुवर्य वै. ह. भ. प. अण्णाबुवा यादव यांच्या ९ व्या पुण्यस्मरणार्थ तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदायिक मृदंग वादन शिक्षण संस्था, सोलापूर यांच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त १०८ मृदंग वादक विद्यार्थ्यांचा भव्य मृदंग वादन सोहळा संपन्न झाला.

हा कार्यक्रम रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक, नवीपेठ, सोलापूर येथे संपन्न झाला . सुरुवातीला वारकरी दिंडी मध्ये पाऊल घेण्यात आला त्यानंतर १०८ मृदंग वादक विद्यार्थी यांचे मृदंग वादन झाले .या मध्ये पंचपदी, सरपटी, मुखडे, तुकडे, शास्त्रीय वादन तसेच अभंग गायन झाले .

या मध्ये मृदंग महर्षी पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावर्षी सोलापूरचे सुप्रसिद्ध मृदंग वादक कै. सन्मुख अण्णा म्हेत्रे यांच्या स्मरणार्थ मरणोत्तर विशेष मृदंगमहर्षी पुरस्कार त्यांच्या परिवाराला प्रदान करण्यात आला तसेच ह. भ. प. विलास महाराज कोकितकर व ह. भ. प. गोविंद महाराज माने यांना मृदंगमहर्षी पुरस्काराने गौरविण्यात येणार आले .

या सोहळ्यात सोलापूर जिल्ह्यातील वारकरी संप्रदायामध्ये कार्यरत असलेल्या महाराज मंडळींचा सन्मानही करण्यात येणार आला . या कार्यक्रमा मध्ये प्रमुख उपस्थिती श्रीगुरु ह. भ. प. स्वामी महाराज राशिनकर (पंढरपूर) व ह. भ. प. सुधाकर महाराज इंगळे (राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भाविक वारकरी मंडळ) व सोलापुरातील गायक वादक महाराज मंडळी यांची होती.

या कार्यक्रम आयोजन ह. भ. प. ज्योतीराम महाराज चांगभले (प्रदेश अध्यक्ष) वारकरी मंडळ यांनी केले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ह. भ. प. हनुमंत भोसले, ह. भ. प. सुरज यादव, श्री सुनील चांगभले, श्री गणेश चांगभले तसेच संगीत विशारद कु. प्रणिती चांगभले यांनी प्रयत्न केले.



## 'लोकमंगल' महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान व लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सारिका सोनवले (संवेदना प्रकल्प जिल्हा समन्वयक जिल्हा रुग्णालय, सोलापूर) व अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. प्रारंभी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे विद्यार्थी निखिल धुमाळ, ओम पवार, अभिजीत तनपुरे, भक्ती काटकर, प्रियांका वळसे, सानिका यादव, मंजुनाथ कुंभार आदींनी आपल्या मनोगतातून स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या कार्याचे महत्त्व पटवून सांगितले. प्रमुख पाहुणे सारिका सोनवले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य व आजचा युवक याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रा . निशा काटे, प्रा. आशिष सरकाळे, प्रा. सायली बडेकर, प्रा. वर्षा मानेदेशमुख, प्रा. स्मिता धायगुडे, प्रा. सुप्रिया डोके, प्रा. रोहिणी सोमवंशी, प्रा. मयुरी क्षीरसागर, प्रा. अपूर्वा पिस्के तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वैष्णवी मागाडे यांनी केले.

## जिजामाता प्रशालेत राजमाता जिजामाता माँसाहेब जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे संचालित जिजामाता प्रशाला कोंडी उत्तर सोलापूर येथे संस्थेच्या प्रेरणास्थान माजी आमदार कै. निर्मलाताई ठोकळ यांच्या प्रेरणेने आणि संस्थेचे अध्यक्ष सचिन भैय्या ठोकळ व सचिवा शिल्पाताई ठोकळ व मुख्याध्यापक उदय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजामाता माँसाहेब जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. आजच्या प्रमुख अतिथी ग्रामपंचायत सदस्य सुप्रियाताई शशिकांत भोसले होत्या.

जिजामाते च्या भूमिकेत प्राजक्ता निंबाळकर होत्या थोरल्या राणीसाहेब सईबाई म्हणून स्वाती शिंदे होत्या दुसऱ्या राणीसाहेब सोयराबाई म्हणून साक्षी फंड होत्या पुतळाबाई राणी साहेब वैष्णवी भोसले आणि सगुणाबाई राणीसाहेब म्हणून प्राजक्ता मोरकाने होत्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री सारंग पाटील यांनी परिश्रम घेतले. या जन्मोत्सवास तमाम



गावकरी ग्रामपंचायत सदस्य आजी-माजी विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रम खूप मोठ्या उत्साहाने यशस्वी झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपा निंबाळकर हिने केले तर स्नेहल शिंदे हिने आभार मानले.

## भांडण सोडविण्यासाठी आलेल्याला विटाने मारले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

शेळगी परिसरात दारूच्या नशेत शिवीगाळ करत भांडण केल्याप्रकरणी एकाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दि. ०९ जानेवारी रोजी रात्री ९.३० वाजण्याच्या सुमारास शेळगी येथे ही घटना घडली.

यातील फिर्यादी महादेव शरणप्पा नवले हे त्यांच्या सासरी असताना, घराशेजारी राहणाऱ्या कुटुंबातील जावई अमोल कस्तुरे हा दारू पिऊन येऊन शिवीगाळ करत होता. यावेळी फिर्यादीच्या सासूने बाहेर येऊन पाहणी केली असता आरोपीने त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. हा प्रकार पाहून फिर्यादीची पत्नी व सासरे समजावून सांगण्यासाठी बाहेर आले असता त्यांनाही शिवीगाळ करून सासऱ्यांना ढकलून दिले.

## नान्नज अभयारण्यालगतच्या शेतांना सौर उर्जा कुंपण

### प्रस्ताव पाठविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना अजितदादांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

नान्नज अभयारण्यालगतच्या शेतकऱ्यांना वन्य जीवांपासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन योजनेतून अनुदान देण्यासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आदेश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांना दिले आहेत.

या आदेशाची दखल घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने याबाबतचा अहवाल सात दिवसांत पाठविण्याबाबत आदेशित केले आहे. नान्नज अभयारण्यात वास्तव्यास असलेल्या रानडुकरांच्या उपद्रवामुळे नान्नजसह मार्डी, कारंबा, अकोलेकाटी, वडाळा, नरोटेवाडी, रानमसले, मोहितेवाडी, सावंतवाडी बिबीदारफळ,बाणेगाव या ११ गावातील शेती उध्वस्त होत आहे. तेव्हा अभयारण्यालगत असलेल्या शेतकऱ्यांना कुंपण मारण्यासाठी अनुदान देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका अध्यक्षा सुवर्णा झाडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे नोव्हेंबरमध्ये वडाळा येथील कार्यक्रमात केली होती

त्यांच्या मागणीची दखल घेऊन उपमुख्यमंत्री पवार यांनी जिल्हाधिकारी आशिर्वाद यांना नान्नज अभयारण्यालगतच्या शेतकऱ्यांना सौर उर्जा संरक्षण कंपाऊंडसाठी अनुदान देण्यासाठीचा प्रस्ताव देण्यासाठी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयाने उपवनसंरक्षक कार्यालयाला याबाबत सात दिवसांत स्वयंस्पष्ट अहवाल देण्याचे निर्देश दिले आहेत.

कधी अवकाळी पाऊस तर कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती पूर्णपणे बिकट झाली आहे. अशाच नान्नज अभयारण्याच्या लगत असलेल्या ११ गावातील शेतीला आतापर्यंत हरणांचा उपद्रव होता. या तीन वर्षांत रानडुक्करांचा उपद्रव आहे.त्यामुळे शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. त्यांना जगणं मुश्किल झालं आहे.वन्य जीवनापासून शेती वाचविण्यासाठी एक तर त्यांना शेती भोवती कंपाऊंड मारण्यासाठी अनुदान द्यावे किंवा संपूर्ण नान्नज अभयारण्यालाच संरक्षण भिंत बांधावी, ही मागणी आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत आपण स्वस्थ बसणार नसल्याचे सुवर्णा झाडे यांनी सांगितले.

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **Najveen Bashamiya Shaikh** has been changed to new name **Nazmeen Yakub Mujawar** Add. Fatima Heights, Somwar peth, solapur

**(Affidavit no.- 1369)**
**Date - 12/01/2026**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन :- डि।। व सब डि।। सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी, मौजे कोंडी येथील गट नं. २७८/२/१/ब/प्लॉट नं.८ पैकी यासी एकूण क्षेत्र ०.७४.३५ चौ.मी इतके असून सदरची जागा खुली आहे. यासी चतुःसिमा :- पुर्वेस - गट नं. २४२, दक्षिणेस - प्लॉट नं.९, पश्चिमेस - लेआऊट मधील रस्ता, उत्तरेस - सदर प्लॉट नंबर पैकी राहिलेली जागा.

वरील नमुद वर्णनाची जागा ही मंगल बाळासाहेब मुटकुळे यांच्या मालकी हक्काची असून ते आमचे अशिलांना खरेदीने देण्याचे ठरवून तसा व्यवहार केलेला आहे. तसेच सदरहु प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याचे आमचे अशिलास लिहून देणार यांनी तशी हमी व खात्री दिलेली आहे.

तथापि, याउपरही वर नमुद प्लॉट जागेबाबत अन्य कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोजा, टाच, भाडेपट्टा, साठेखत, खरेदी, गहाणखत, पोटगी, दान, लीज अगर इतर अन्य करार, मदार, कोर्ट वाद वगैरे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध, झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत हक्क व हितसंबंध दर्शविणारे कागदोपत्री पुराव्यासह लेखी वैध हरकत खालील नमुद पत्त्यावर कळविण्यात यावे. अगर मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून, आमचे अशिल वरील मालकांशी पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाच्याही हरकतीची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली ता. १२/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. सुनिल भ. कांबळे**
**रा. २२, शिवाजी नगर, बाळे,**
**पुणे रोड सोलापूर मो.नं. ९७६४१०६३४२**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

**बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

याद्वारे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्राचा प्राधिकृत अधिकारी असून, आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ३ सह कलम १३ च्या उप-कलम (१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १३.१०.२०२५ रोजी मागणी सूचना जारी केली होती, ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जामीनदारांना सदर सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संपूर्ण देय रक्कम परत करण्याची मागणी करण्यात आली होती.

कर्जदार रक्कम परत करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचित करण्यात येते की, अधोहस्ताक्षरीने कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियम, २००२ च्या नियम ८ अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक ०६/०१/२०२६ रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला या मालमत्तांशी कोणताही व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात येत आहे आणि या मालमत्तांशी केलेला कोणताही व्यवहार बँक ऑफ महाराष्ट्राच्या वर नमूद केलेल्या रकमेच्या भाराच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्ता सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- नवीपेठ**<br>**कर्जदार -**<br>**१. मे. अमृत कलेक्शन प्रो.प्रा. श्रीमती सपना संदिप राठी**<br>पत्ता : दुकान क्रमांक ५, तळमजला, सीटीएस क्रमांक ८५९९/ए, भगवानदास कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर<br>**जामिनदार:**<br>**२. श्री. संदिप रमेश राठी**<br>पत्ता : घर नं. ९०, पुर्व मंगळवार पेठ, शिवगंगा मंदिरजवळ, बुधले गल्ली, उत्तर सोलापूर, सोलापूर ४१३००२<br>**३. श्री. सचिन रमेश राठी**<br>पत्ता : घर नं. ९०, पुर्व मंगळवार पेठ, शिवगंगा मंदिर जवळ, बुधले गल्ली, उत्तर सोलापूर, सोलापूर ४१३००२ | दुकान मालमत्तेचे समन्यायी गहाण, दुकान क्रमांक ५, क्षेत्रफळ १९.७४ चौ.मी., तळमजला, सीटीएस क्रमांक ८५९९/ए, क्षेत्रफळ ९१५.५० चौ.मी., भगवानदास कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर<br>**चतु:सीमा खालीलप्रमाणे:**<br>पूर्व - मुलाठी ड्रेस कोडची जागा,<br>दक्षिण - दुकान क्रमांक ६,<br>पश्चिम - मोकळा मार्ग,<br>उत्तर - दुकान क्रमांक ४ | **मागणी सूचना:**<br>**दिनांक: १३/१०/२०२५.**<br>**खात्यातील शिल्लक:**<br>रु. १४,९९,१०२.९८/- + लागू न केलेले व्याज: रु. २६,०७६.००/-<br>**एकूण:** रु. १५,२५,१७८.९८/- (पंधरा लाख पंचवीस हजार एकशे अठ्ठ्याहत्तर रुपये आणि अठ्ठ्याण्णव पैसे फक्त)<br>**सांकेतिक ताबा तारीख :** ०६/०१/२०२६ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - 06/01/2026**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

Classifieds

**भाड्याने देणे आहे**

मंद्रूपमधील समर्थ नगर येथील टू बीएचके घर भाड्याने देणे आहे. कुटुंब असणाऱ्यांना प्राधान्य. लाईट, पाणी, पार्किंग, या सर्व सोयी सहित घर भाड्याने देणे आहे.

**संपर्क - सावन चव्हाण**
**९७६७३६९७८९**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्या नुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

# महाराष्ट्र व विदर्भला विजेतेपद

## वरिष्ठ गट राष्ट्रीय अजिंक्यपद शुटींग बॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १२ जानेवारी-**
पुरुष गटात महाराष्ट्र व महिला गटात विदर्भने वरिष्ठ गटाच्या ४४व्या राष्ट्रीय शुटींग बॉल अजिंक्यपद स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. महिला गटात दिल्ली व हरियाना संघाने तर पुरुष गटात पंजाब व मध्यप्रदेश संघाने अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान संपादिले.

अॅम्युचर शुटींग बॉल स्पोर्ट्स असोशिएशन महाराष्ट्र यांच्यावतीने माळशिरस येथे जिल्हा परिषद क्रीडांगणावर या स्पर्धेचे बक्षीस वितरण खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले. प्रथम तीन क्रमाकांस अनुक्रमे




३६, २१ व १२ हजार रुपये पारितोषिक देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी तुकाराम देशमुख, रणजितनाना काळे, माणिक वाघमोडे, पांडुरंग वाघमोडे, महादेव देशमुख, किरण सावंत, अस्लम मुजावर, जयंत खंडागळे, विपिन ननवरे यांच्यासह एशियन शुटींग बॉल फेडरेशन जनरल सेक्रेटरी रवींद्रसिंग तोमर, खजिनदार जे पी.कादियान, कार्यकारी सदस्य डो ओ पी.माचरा, शुटींग बॉल फेडरेशन ऑफ इंडिया जनरल सेक्रेटरी जीतराज तोमर, खजिनदार जितेन बघेल यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व खेळाडू उपस्थित होते. या स्पर्धेत देशातील विविध राज्यातील पुरुष व महिलांच्या ५० संघांनी भाग घेतला होता.

**खेळाडूंना रेल्वे प्रवासात सवलत मिळण्यासाठी प्रयत्न करणार**

खेळाडूना विविध स्पर्धेसाठी रेल्वे मधून प्रवास करावा लागतो. या खेळाडूना या प्रवासाठी कोणतीही सवलत मिळत नाही. या खेळाडूना स्पर्धेसाठी जाताना सवलत मिळावी यासाठी संसधेत प्रश्न मांडणार असल्याचे प्रतिपादन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी पारितोषिक वितरणप्रसंगी केले.





### विदर्भची जयश्री निमडे 'बेस्ट प्लेयर ऑफ ईयर'

विदर्भ संघातील जयश्री निमडे हिची बेस्ट प्लेयर ऑफ ईयर,तर पंजाबच्या रणजित कम्बोज (सिधू) याची बेस्ट प्लेयर ऑफ ईयर म्हणून निवड करण्यात आली त्यांना रोख ५१ हजार रुपये देऊन सन्मानित करण्यात आले.

## कै पांडुरंग पैकेकरी स्मृती चषक बुद्धिबळ स्पर्धा रविवारी

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**
येथील माजी पोलीस सब इन्स्पेक्टर पांडुरंग पैकेकरी यांच्या स्मरणार्थ संतोष पैकेकरी व पुनम सोनटकले यांनी रविवार १८ जानेवारीला सकाळी १० वा. सुंदर मल्टिपर्पज हॉल विजयपूर रोड सोलापूर येथे ही स्पर्धा आयोजित केली आहे. ही स्पर्धा श्री रमा जगदीश बहुउद्देशीय महिला उत्कर्ष संस्थेच्यावतीने आयोजित व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने संपन्न होणार आहे. ही स्पर्धा ८, ९, १०, १३, १९ व खुला गट या वयोगटात ही स्पर्धा आयोजित होणार असून करमाळा, धाराशिव,लातूर,बीड,बार्शी या जिल्ह्यातील खेळाडूंना प्रवेश फी मध्ये सवलत दिली जाणार आहे. या स्पर्धे साठी रोख बक्षीसे,चषक व मेडल्स मिळून ३५ हजार रूपयांची बक्षीसे विजयी खेळाडूंना वितरित केली जाणार आहेत. इच्छुकांनी शरद नाईक सचिव सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन यांना९४२३३३७३४६ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष अर्जुन कदम यांनी केले आहे.



## नातेपुतेच्या ओम शिंदेची खुडूसच्या युवराज मानेवर मात





### शंकरनगरची अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धा

**अकलूज, दि. १२ जानेवारी-**
शंकरनगरच्या ४७व्या अखिल भारतीय त्रिमूर्ती केसरी चषक कुस्ती स्पर्धेत नातेपुतेच्या ओम शिंदेने खुडूसच्या युवराज मानेवर मता केली. दुसऱ्या लढतीत बेंबळेच्या सौरभ मिश्किलने टेंभुर्णीच्या स्वप्नील भोसले यास नमविले.

सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळ शंकरनगर अकलूज यांच्यावतीने शिवतीर्थ आखाडा शंकरनगर -अकलूज येथे आयोजित केली आहे. अखिल भारतीय त्रिमूर्ती कुस्ती स्पर्धेसाठी ८०, तर वजनी २५ ते ८५ पर्यंतच्या गटा करीता ६०३ मल्लांनी भाग घेतला आहे. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या या स्पर्धे चे उद्घाटन समितीचे अध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, अकलूज नगरपरिषदेचे नूतन नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील यांचे हस्ते झाले. यावेळी समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील, मल्ल सम्राट रावसाहेब मगर, महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, संचालक रामचंद्र ठवरे, गोविंद पवार, विराज निंबाळकर, दत्ता मगर, वसंतराव जाधव, पोपट भोसले पाटील, बिभीषण जाधव,अनिल काटे आदी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी राम सारंग व त्यांचे पंच स्पर्धेसाठी कार्यरत आहेत. स्वागत वसंतराव जाधव यांनी केले. सूत्रसंचालन युवराज केचे यांनी केले. अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील म्हणाले, सहकार महर्षींनी सुरू केलेल्या या कुस्ती स्पर्धेला ४७ वर्षे झाली असून या मातीतून अनेक महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खळाडू तयार झाले आहेत.

**अशी आहेत स्पर्धेसाठीची बक्षिसे**

त्रिमुर्ती केसरी कुस्ती स्पर्धेसाठी खुल्या गटाकरिता प्रथम क्रमांकाचे बक्षिस त्रिमूर्ती केसरी चषक व दोन लाख रुपये, द्वितीयसाठी दीड लाख, तृतीयसाठी एक लाख रुपये व चतुर्थसाठी पन्नास हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आले आहे. वजनी गटानुसार विजेत्या व पराजित मल्लांनाही भव्य बक्षीस आहेत.



### विठ्ठलाच्या दर्शनासाठी दिलीप वेंगसरकर

**पंढरपूर :** भारतीय क्रिकेट टीम चे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर सोमवारी विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी येथे आले होते. त्यांनी सपत्निक श्रीविठ्ठलाचे दर्शन घेतले. त्यानंतर मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते दिलीप वेंगसरकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नाना मालक कवठेकर, शाम दिवेकर यांच्यासह मंदिर समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्राच्या दोन्ही संघाची विजयी सलामी





### ५८ वी वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

**काजीपेठ (तेलंगणा), दि. १२ जानेवारी-**
रेल्वे ग्राउंडवर खेळाडू उतरले आणि मैदानावर अक्षरशः आग ओकली गेली! वेग, चपळाई, अचूक डावपेच आणि अफाट आत्मविश्वास यांचा थरारक संगम अनुभवायला मिळालेल्या ५८ व्या वरिष्ठ राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेत पहिल्याच दिवसापासून सामन्यांनी रंगत गाठली. तेलंगना खो-खो असोसिएशनच्या वतीने आणि खो-खो फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने सुरू असलेल्या या स्पर्धेत महाराष्ट्र पुरुष व महिला संघासह महिलांमध्ये पश्चिम बंगाल, हरयाणा, पंजाब तर पुरुष गटात दिल्ली, छत्तीसगड, विदर्भ, पाँडिचेरी, उत्तरप्रदेश व गुजरात या बलाढ्य संघांनी प्रतिस्पर्ध्यांना धुळ चारत विजयी आगेकूच दिमाखात सुरू ठेवली आहे. डावाने आणि मोठ्या गुणांच्या फरकाने मिळालेले हे विजय आगामी हाय-व्होल्टेज लढतींची नांदी ठरत आहेत.

**पुरुष व महिला संघांचा डावाने पराक्रम**

महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी परंपरेला साजेसा आक्रमक खेळ सादर करत प्रतिस्पर्ध्यांना सावरण्याची संधीच दिली नाही. पुरुष गटात महाराष्ट्राने मणिपूरचा ३११६ असा १ डाव व १५ गुणांनी पराभव करत वर्चस्व सिद्ध केले. मध्यंतराला महाराष्ट्राने ३१८ अशी २३ गुणांची आघाडी, त्यात ड्रीमरनचे ५ गुण निर्णायक ठरले. महाराष्ट्राकडून शुभम थोरात (२.१० मि. संरक्षण, ४ गुण), सुयश गरगडे (१.३० व २ मि. संरक्षण), रूद्र थोपटे (१० गुण) यांनी सलग दमदार कामगिरी करत विजयावर शिक्कामोर्तब केले. मणिपूरकडून एस. रोकेसन (१ मि. संरक्षण) आणि के. एच. सचिन (६ गुण) यांनी लढत दिली.

महिला गटात महाराष्ट्राने छत्तीसगडला ३५१२ असा १ डाव राखून २३ गुणांनी पराभूत करत आपली ताकद दाखवली. विशेष म्हणजे, महाराष्ट्राचा एकही खेळाडू बाद झाला नाही. मध्यंतराला २८६ अशी २२ गुणांची आघाडी, दोन्ही डावात मिळून ड्रीमरनचे ७ गुण मिळाले. या विजयात रेश्मा राठोड (२.१० मि. संरक्षण, ४ गुण), सरीता दिवा (२.१० मि. संरक्षण), अश्विनी शिंदे (१.५० मि. संरक्षण, ६ गुण), प्रियांका इंगळे (१.४० मि. संरक्षण, ६ गुण), मैथिली पवार (१.५० मि. संरक्षण) यांनी चमकदार खेळ केला. छत्तीसगडकडून पायल पटेल (१ मि. संरक्षण) हिने झुंजार प्रतिकार केला.

**विदर्भाची उत्तराखंडवर निर्णायक मात**

पुरुष गटात विदर्भाने उत्तराखंडचा २५१६ असा १ डाव व ९ गुणांनी पराभव करत पुढील फेरीकडे दमदार पाऊल टाकले. विदर्भासाठी फैज पठाण (१.४० मि. संरक्षण, १० गुण) हा विजयाचा शिल्पकार ठरला. त्याला राहुल सहारा (३.३० व १.३० मि. संरक्षण) आणि यश सदनशिव (२.१० मि. संरक्षण) यांनी भक्कम साथ दिली. उत्तराखंडकडून कोलीशा (१ मि. संरक्षण, ४ गुण) आणि योगेश कुमार (४ गुण) यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

## लातूरच्या रोहन क्रिकेट अकादमीस विजेतेपद

### मास्टर्स क्रिकेट अकादमीची १२ वर्षांखालील क्रिकेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी**
लातूरच्या रोहन क्रिकेट अकादमीने मास्टर्स क्रिकेट अकादमीच्या १२ वर्षीखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. डोणगाव येथील पुष्प अकादमीच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत रोहन अकादमीने युनायटेड क्रिकेट अॅकॅडमीवर ८० धावांनी विजय मिळविला. रोहन क्रिकेट अकादमीने नाणेफेक



जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ८ बाद २७८ धावा केल्या. त्यांच्या वेदांत हक्केने ६९ व सौरभ भुजबळने ६५ धावा केल्या. युनायटेडकडून तनिष्क रंगरेजने ३५ धावांत ३ बळी तर हर्षदीप साठेने २७ धावांत २ बळी टिपले.२७८ धावांचा पाठलाग करताना युनायटेडचा डाव ४७.४ षटकांत १९८ धावांत आटोपला. त्यात हर्षदीप साठे ७९ धावा व पुष्कर पवार ४१ धावा केले. रोहन अॅकॅडमीकडून गोलंदाजीत सौरभ भुजबळने १६ धावांत २ गडी तर श्रीराज फुलारीने २३ धावांत २ गडी बाद केले. सौरभ भुजबळ सामन्यात मानकरी ठरला.

**स्पर्धेतील वैयक्तिक पारितोषिक विजेते**

फलंदाज- वेदांत हक्के, गोलंदाज- सम्राट बोबडे, मालिकावीर - वेदांत हक्के, क्षेत्ररक्षक- वेदांत धायगुडे.

# स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिराशिवाय सोलापूर विद्यापीठाच्या अॅथलेटिक्स संघाचा सहभाग

### विद्यापीठाच्या क्रीडा संचालकाचे दुर्लक्ष

### दाजी हुबळेची सलामी, खेलो इंडिया स्पर्धेसाठी पात्र

**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ अॅथलेटिक्स स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा संघ रवाना झाला.

राजीव गांधी विद्यापीठ बंगलेरू व अल्वाज एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोडूबिद्रे येथे या स्पर्धेस सोमवारपासून (दि.१२) सुरुवात झाली आहे. परंतु हा संघ स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरापासूनच वंचित राहिला आहे.

दरम्यान सोमवारी सुरू झालेल्या या स्पर्धेत दहा हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत दाजी हुबळे याने आठवे स्थान प्राप्त केले आहे. या कामगिरीवर तो खेलो इंडिया स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. विद्यापीठाच्या थलेटिक्स संघाचे दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर १० दिवसाचे स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर होणार असल्याचे विद्यापीठाने खेळाडूंना कळवले. परंतु प्रत्यक्षात हे शिबिर न होता कागदावरच राहिले. प्रशिक्षण शिबिराविना गेलेल्या या संघाची कामगिरी कशी सुधारणार? असा प्रश्न क्रीडाप्रेमीत आहे. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवात सोलापूर विद्यापीठाचे आठ खेळातील संघ सहभागी झाले होते. परंतु थलेटिक्स वगळता कोणत्याही खेळात विद्यापीठाचे संघ उल्लेखनीय कामगिरी करू शकले नाहीत.




खेलो इंडिया स्पर्धेसाठी पात्र ठरलेला लांब पल्ल्याचा धावपटू दाजी हुबळे व प्रशिक्षक अशोक पाटील

त्यामुळे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ थलेटिक्स स्पर्धेतही हा संघ उत्कृष्ट कामगिरी करेल, अशी आशा सोलापूर विद्यापीठास आहे. त्यानुसार दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर ३१ डिसेंबर ते ९ जानेवारीपर्यंत स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिर होणार असल्याचे सोलापूर विद्यापीठाने संबंधित खेळाडूंना कळविले होते. या प्रशिक्षण शिबिरामुळे एकत्रित सराव आणि संबंधित संघातील खेळाडूंना कामगिरी उंचावण्यासाठी प्रशिक्षकांच्या टिप्सची गरज असते. त्यामुळे विद्यापीठाचे खेळाडू आपली कामगिरी उंचावू शकतात. परंतु प्रत्यक्षात शिबिरच झाले नसल्याचे या संघातील खेळाडूंनी नाव न सांगण्याच्या अटीवर आमच्या प्रतिनिधीस सांगितले. निवड झालेल्या संबंधित खेळाडूंनी आपापल्या महाविद्यालयाच्या मैदानावरच सराव केला. मग हे सराव शिबिर फक्त कागदावरच दाखवले का? अशी शंका येते.

### स्पर्धापूर्वी प्रशिक्षण शिबिरास भेट देणे हे क्रीडा संचालकाचे कर्तव्य

प्रत्यक्षात स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिर चालू आहे का नाही याचे निरीक्षण करणे, त्याला भेट देणे हे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांचे कर्तव्य आहे. प्रशिक्षण शिबिरात निवड झालेले सर्व खेळाडू दाखल झाले का? आणि स्पर्धेसाठी नोंदणी केलेले सर्व खेळाडू जाणार आहेत का? याची कल्पना क्रीडा संचालक यांना एक दिवस अगोदरही नव्हती. माझ्यापर्यंत अंतिम यादी अद्यापपर्यंत आले नाही, असे उत्तर आमच्या प्रतिनिधीना त्यांच्याकडून मिळाले.

### प्रत्यक्षात स्पर्धेत भाग घेणारे खेळाडू

**महिला :** सुजाता बाबर (उंच उडी), आकांक्षा गावडे (२००,४०० मी.)

**पुरुष :** विनीत दिनकर (१००,२०० मी.) राहुल धोत्रे (भालाफेक ), नीरज महानोर (भालाफेक), अमोल आमुने (१० व २१ कि.मी.), दाजी हुबळे (५०००, १०००० मी.) ईश्वर झीरवळ (५००० मी.), राम लोखंडे (१० व २१ कि.मी.), हर्ष राऊत (१००,२०० मी.), श्रीराम थिटे (८०० मी.).

### पर्यायी प्रशिक्षकाची व्यवस्था?

या स्पर्धेसाठी महिलांचे प्रशिक्षक डॉ. किरण चोकाककर हे निवडणुकीच्या कामावर असल्यामुळे ते जाऊ शकले नसल्याचे समजले. त्यांच्या ठिकाणी पर्यायी प्रशिक्षकाची नियुक्ती तसेच महिला संघासाठी महिला संघ व्यवस्थापक नियुक्ती केली आहे का? याचेही उत्तर डॉ. लकडे यांनी दिले नाही.

### निवड करून न गेलेले खेळाडू

पुरुष : सौरभ चव्हाण (४०० मीटर). महिला : प्रणिता जाधव ( लांब उडी), मसल गायत्री (८०० मीटर).

**क्रीडा विभाग हस्तक्षेप करीत नाही**

निवड समिती सदस्यांच्या अंतिम अहवालानुसार खेळाडुंची निवड करुन पुढील स्पर्धेसाठी त्यांची नोंदणी केली जाते व संघ पाठविला जातो. क्रीडा विभागाकडे कुठलीही लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही. संघ व खेळाडू निवडीचा संपुर्ण अधिकार निवड समितीचा असतो.यात क्रीडा विभाग हस्तक्षेप करीत नाही.

**- डॉ. अतुल लकडे, क्रीडा संचालक**

### सर्व घटनेची चौकशी करण्यात येईल

स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिर झाले का नाही, खेळाडूवर अन्याय झाला का नाही या संदर्भात झालेल्या सर्व घटनेची चौकशी करण्यात येईल

**- डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलगुरू**

### रिले संघ रद्द करुन तीन खेळाडूंवर अन्याय

विद्यापीठाच्या ४ बाय १०० मीटर रिले संघात समावेश करा, असे संगमेश्वर महाविद्यालयाचे सचिन मायनाळे व ओम वरवडकर हे खेळाडू व त्यांचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण संबंधित खेळाचे प्रशिक्षक तथा निवड समिती सदस्य डॉ. अशोक पाटील व क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांच्याकडे समावेश करण्यासाठी प्रयत्न करीत होते. कारण विद्यापीठाच्या संघात अगोदरच महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवातील सुवर्ण व रौप्य पदक प्राप्त दोन खेळाडू आहेत. त्या व्यतिरिक्त फक्त दोन खेळाडूंचाच रिले संघात समावेश करावयाचा होता. तत्पूर्वी विद्यापीठाने जाणाऱ्या संघामधील दोघांचा समावेश करून या स्पर्धेसाठी रिले संघाची नोंदणी केली होती. परंतु स्पर्धेत भाग घेण्यासाठी पात्रता वेळ नसल्यामुळे विद्यापीठाने रिले संघच भाग घेणार नसल्याचे त्यांचे प्रशिक्षक डॉ. अशोक पाटील यांनी आमच्या प्रतिनिधीस सांगितले. परंतु प्रत्यक्षात प्रशिक्षण शिबिरच झाले नाही. तर विद्यापीठाच्या या रिले संघाचे टायमिंग त्यांनी कधी पाहिले? हा प्रश्न या खेळाडूंनी उपस्थित केला आहे. त्यामुळे या स्पर्धेसाठी नोंदणी केलेल्या सौरभ चव्हाणला वगळले तर ओम व सचिन यांचा विचार झाला नाही. निवड समिती तथा प्रशिक्षक एखादा निर्णय चुकीचा घेत असेल तर त्यात सुधारणा करून खेळाडूंना न्याय देणे हे क्रीडा संचालकाचे कर्तव्य आहे. परंतु प्रशिक्षक व क्रीडा संचालक दोघांनीही सौरभ, ओम व सचिन या तीन खेळाडूवर अन्याय केला आहे.

## महत्वाचे...



### चौडेश्वरी पतसंस्था वर्धापनदिनाच्या शिबिरात २११ जणांचे रक्तदान

**दक्षिण सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील टाकळी येथील श्री चौडेश्वरी पतसंस्थेकडून तिसऱ्या वर्धापनदिन व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून टाकळी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात २११ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन भाजपाचे तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, डॉ. संगमेश्वर पाटील, डॉ. उमेश सुरळे, नळदुर्गचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सिध्देश्वर ब्लड बँकेचे योगेश्वर कवेकर, पतसंस्थेचे चेअरमन सिध्दाराम बगले, संस्थापक संतोष मधुरे लाड, व्हाईस चेअरमन रवींद्र तावसकर, संचालक राहुल झेंडेकर, जट्यप्पा कोळी, सागर बगले, अंबाजी बगले, सतीश मधुरे, महेश मधुरे, परशुराम कोळी, अशोक बिराजदार, संगमेश्वर बगले, चिंचपूरचे सुरेश बगले, शाखाधिकारी संजय पाटील उपस्थित होते.



### बार्शीत संभाजी ब्रिगेडच्यावतीने राजमाता जिजाऊ जयंती साजरी

**बार्शी दि.१२ जानेवारी-**

संभाजी ब्रिगेडच्यावतीने बार्शीत राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. जिल्हाध्यक्ष आनंद काशीद, सामाजिक कार्यकर्त्या शितल मांजरे यांच्या हस्ते जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विक्रम बापू गायकवाड, मनोज मोरे, इमामभाई लांडगे, सय्यद, राजवीर काशीद उपस्थित होते.



### शासकीय रेखाकला परीक्षेत महात्मा फुले विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

**दक्षिण सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला परीक्षा एलिमेंटरी ग्रेड परीक्षेसाठी ३५ परीक्षार्थी होते. या परीक्षामध्ये एलिमेंटरी परीक्षार्थींचे शंभर टक्के निकाल लागला आहे. अथर्व रावत, अयान आवटे, खुशी शिकलगार, साक्षी कटकधोंड, श्रावणी कटकधोंड, वैभवी स्वामी या विद्यार्थ्यांना ए श्रेणी तर आलिया शेख, ऐश्वर्या माळी,जास्मिन लिगेवान,महेक अत्तार ,पूजा केवटे, प्रकाश राठोड, प्रतीक्षा राजमाने, समीक्षा धुळखेडे, संचिता वाघमोडे, श्रावणी साठे, स्वराली केवटे या विद्यार्थ्यांना बी श्रेणी मिळाली. इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेसाठी विद्यालयातून ४३ विद्यार्थी होते शंभर टक्के निकाल लागला असून अमरीन शेख, अनुष्का वाघमोडे,प्रगती विजापुरे, प्रियंका काळे, रूकमोद्दीन शेख, रुकसार शेख,श्रुतिका म्हेत्रे,सोनाली रावत या विद्यार्थ्यांना ए श्रेणी तर आयेशा मोमीन, आदिती पुजारी, आलिया नदाफ, अंकिता लांडगे, धानेश्वरी जोडमोटे, कौसर शेख, प्रणिती वाघमारे, ऋतुजा केवटे, सफिना शेख,साक्षी धोत्रे, सानिका कोरे, श्रावणी व्हनमाने, सृष्टी घाले, वैभवी भागवत, वैष्णवी म्हेत्रे या विद्यार्थ्यांना बी श्रेणी मिळाले. यशस्वी विद्यार्थ्यांना कलाध्यापक भालचंद्र शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

### टेंभुर्णी प्रेस क्लबच्या अध्यक्षपदी सतीश चांदगुडे, उपाध्यक्षपदी विष्णू बिचकुले






**टेंभुर्णी, दि. १२ जानेवारी-**

टेंभुर्णी प्रेस क्लबची वार्षिक सर्वसाधारण सभा उपाध्यक्ष धनंजय मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेमध्ये सन २०२६ साठी प्रेस क्लबच्या नूतन पदाधिकाऱ्यांची सर्वानुमते निवड जाहीर करण्यात आली. सभेत अध्यक्षपदी सतीश विठ्ठल चांदगुडे, उपाध्यक्षपदी विष्णू भाऊ बिचकुले, सचिवपदी राजेंद्र कांतीलाल केदार, तर खजिनदारपदी अनिल भागवत जगताप यांची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारिणीच्या निवडीचा प्रस्ताव सोपान ढगे यांनी मांडला असून त्यास सुहास साळुंखे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सर्व पत्रकार सदस्यांनी या निवडीस एकमताने पाठिंबा दिला. यावेळी नूतन उपाध्यक्ष विष्णू बिचकुले यांची आंतरराष्ट्रीय हिंदू सनातन महासभेच्या महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. सभेदरम्यान उपस्थित सदस्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सभेस डी. एस. गायकवाड, सदाशिव पवार, सोपान ढगे, सुहास साळुंखे, गणेश चौगुले, सतीश काळे, धनंजय मोरे, सचिन होदाडे, अनिल जगताप, सुरज देशमुख उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### शांताबाई खंडेलवाल



**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

दयानंद महाविद्यालयजवळील चक्रवर्ती हौसिंग सोसायटीतील शांताबाई खंडेलवाल यांचे सोमवारी १२ जानेवारी रोजी सायंकाळी निधन झाले. जगदीशप्रसाद खंडेलवाल यांच्या त्या पत्नी होत. त्यांची अंतयात्रा मंगळवारी १३ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघेल.

# मंगळवेढ्यात उपनगराध्यक्ष पदासाठी भाजपाचे गौरीशंकर बुरकुल निश्चित?

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १२ जानेवारी-**



मंगळवेढा तालुक्यातील राजकीय वातावरण तापले आहे. भाजपकडून उपनगराध्यक्षपदासाठी माजी तालुकाध्यक्ष गौरीशंकर बुरकुल यांचे नाव पुढे येत आहे. नगरपरिषद निवडणुकीत बुरकुल कमळ चिन्हावर सर्वाधिक मतांनी विजयी झाले आहेत. त्यामुळे उपनगराध्यक्षपदाची संधी मिळण्याची शक्यता बळावत आहे.

श्री.बुरकुल हे माजी भाजप तालुकाध्यक्ष म्हणून ओळखले जातात. मंगळवेढा नगरपरिषदेची निवडणुकीत त्यांनी पक्षाच्या चिन्हावर लढवली. प्रचंड मताधिक्याने ते विजयी झाले. हे यश त्यांच्या मेहनतीचे आणि मतदारांच्या प्रेमाचे प्रत्यक्ष पुरावे आहे. स्थानिक राजकारणात त्यांचा प्रभाव वाढला असून, पक्षातही त्यांना महत्त्वाचे स्थान लाभले आहे.

निवडणूक काळात भाजप जिल्हाध्यक्षांनी बुरकुल यांच्याविरोधात प्रचार केल्याची चर्चा आहे. हे प्रकरण राजकीय वर्तुळात खळबळ माजवणारे ठरले. तरीही बुरकुल यांचे यश हे त्यांच्या वैयक्तिक लोकप्रियतेचे लक्षण आहे. जिल्हाध्यक्षांच्या भूमिकेमुळे पक्षांतर्गत कलहाची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, हे प्रकरण आता शांत झाल्याचे दिसत आहे. आमदार समाधान आवताडे यांच्या ठाम भूमिकेमुळे व बसवेश्वर स्मारकाकरिता मंगळवेढ्यातील आ.आवताडे यांनी बुरकुल यांना न्याय देण्याचा निर्धार व्यक्त केल्याचे समजते. आमदार आवताडे हे पक्षाचे प्रमुख नेते असून, त्यांचा हस्तक्षेप महत्त्वाचा ठरेल. उपनगराध्यक्षपदासाठी बुरकुल यांच्या नावाला आमदारांचा पाठिंबा लाभला तर हे निश्चित होईल. स्थानिक कार्यकर्त्यांत या निर्णयाची उत्सुकता आहे.मंगळवेढा नगरपरिषदेत भाजपचे वर्चस्व असल्याने उपनगराध्यक्षपद हा पक्षाचा अंतर्गत मुद्दा आहे. भाजपाचे नऊ नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेस दोन नगरसेवक आणि तिर्थक्षेत्र विकास आघाडी नऊ नगरसेवक असे पक्षीय बलाबल आहे.बुरकुल यांचे निवडणूक यश आणि आमदारांचा पाठिंबा यामुळे त्यांचे नाव पुढे आहे. पक्षातील इतर दावेदारांना मागे टाकण्याची शक्यता आहे. हे पद कोणाला मिळेल यावर जिल्हा नेतृत्वाचा अंतिम निर्णय असेल.



### माळशिरस वकील संघटनेस विधीगंध क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १२ जानेवारी-**

विधीगंध क्रिकेट असोसिएशन सोलापूर आणि सोलापूर जिल्हा वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विधीगंध क्रिकेट स्पर्धेमध्ये माळशिरस येथील वकील संघटनेने विजेतेपद पटकाविले.

त्या संघाचा माळशिरस बार असोसिएशन वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माळशिरस वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.व्ही.टी पिसाळ, सचिव ॲड. सुमित सावंत, सहसचिव ॲड. योगेश लोखंडे यांसह माळशिरस वकील संघटनेचे ज्येष्ठ विधीज्ञ व सहसदस्य उपस्थित होते.

यावेळी विजेत्या संघाचे कर्णधार ॲड. एस.इ वाघमोडे, ॲड.एन. एच पिसे, ॲड. डी. एस भोसले, ॲड. डी.एम. वाघमोडे, ॲड.आर.एस. जगदाळे व सर्व खेळाडू सदस्य यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ॲड. एस.इ वाघमोडे, ॲड.एन. एच पिसे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन ॲड. सुमित सावंत यांनी केले. ॲड. योगेश लोखंडे यांनी आभार मानले.

### शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात रक्तदान शिबीर



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १२ जानेवारी-**

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे आज दि. १२ जानेवारी रोजी रक्तदान शिबीर संपन्न झाले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन संस्थेचे सचिव पी.टी पाटील यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांच्या उपस्थिती संपन्न झाले.

शिबिरामध्ये प्रथम व द्वितीय वर्षातील छात्राध्यापकाने उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला यामध्ये मुली ११ व मुले १२ असे २३ जणांनी रक्तदान केले. कर्मचाऱ्यांमध्ये प्राचार्य डॉ. दीपक गुंड, प्रा. डॉ. चंद्रकांत उलभगत, प्रा. डॉ. रमेश साबळे व सुनील शिंदे यांनी रक्तदान केले. प्रस्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ.चंद्रकांत उलभगत यांनी केले.



### कुसमोड येथील विकास कामांचे आमदार जानकरांच्या हस्ते भूमीपूजन

#### सभा मंडपासह रस्ता कामाची सुरूवात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि १२ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथे आमदार उत्तमराव जानकर यांच्या स्थानिक विकास निधीमधून मंजूर झालेल्या कामाचे भूमीपूजन व लोकार्पण त्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यामध्ये पंढरपूर-सातारा महामार्ग ते शेंडगे वस्ती धायगुडे वस्ती लोकार्पण करण्यात आले. धायगुडे वस्ती येथील हनुमान मंदिरासमोरील सभामंडपाचे भूमिपूजन, तसेच परमेश्वर लेंगरेवस्ती ते पोपट माने वस्ती रस्ता भूमीपूजन या तिन कामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार उत्तमराव जानकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कुसमोड गावचे सरपंच शहाजी लेंगरे, माजी सरपंच महावीर धायगुडे, माळशिरस पंचायत समितीचे माजी सभापती मच्छिंद्र आबा ठवरे ,पिलीव येथील नागरी आघाडीचे अध्यक्ष आरिफखान पठाण, माजी सरपंच अमोल मदने, राजेंद्र जामदार, उमेश सरवदे, कुसमोडचे माजी सरपंच सिताराम धायगुडे, माजी सरपंच तानाजी शेंडगे, धनाजी वाघ, मुगटराव धायगुडे, अर्जुन वाघ, पोपट कचरे, बाळकृष्ण धायगुडे, पैलवान दत्ता मगर, ॲड. अजिनाथ वाघमोडे ,अज्ञान धायगुडे, पोपट शेंडगे, प्रा. सुग्रीव लेंगरे, नबाजी मदने, विजय मदने, गणेश लेंगरे, सुग्रीव मदने, शेखर कपने यांच्यासह धायगुडे ,कचरे, शेंडगे वस्ती येथील ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कुसमोड ग्रामस्थांच्यावतीने आमदार उत्तमराव जानकर यांचा नागरी सत्कार करण्यात आला.

### रेखाकला परीक्षेत कुर्डूवाडीतील आदर्श पब्लिक स्कूलचा शंभर टक्के निकाल

**कुर्डूवाडी, दि. १२ जानेवारी-**

येथील आदर्श पब्लिक स्कूल (स्टेट बोर्ड व CBSE) या शाळेने शासकीय रेखाकला परीक्षा २०२५-२०२६ (एलिमेंटरी व इंटरमिजिएट) मध्ये शंभर टक्के निकालाची नोंद केली आहे. परीक्षेला १४१ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये ग्रेड ४४, इ ग्रेड ३७, तर उ ग्रेड ६० विद्यार्थ्यांनी मिळवले. यशाबद्दल मुख्याध्यापक तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे प्रशांत चोपडे व मंगेश लचके यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेच्या व्यवस्थापकीय संचालक पूजा सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. संस्थेचे अध्यक्ष अमोल सुरवसे यांनी शाळेच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

### गोरडवाडी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी बळीराम कर्णवर



**माळशिरस, दि. १२ जानेवारी-**

गोरडवाडी येथील शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी बळीराम कर्णवर तर उपाध्यक्षपदी दादा गोरड यांची निवड करण्यात आली.

शाळा व्यवस्थापन समितीची ही निवड सर्व पालकांमधून करण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती सदस्य अध्यक्ष. बळीराम कर्णवर, मुख्याध्यापक सचिव हरि खरात, उपाध्यक्ष दादा गोरड, शाळा व्यवस्थापन सदस्य माया गाढवे, अजिनाथ कोकरे, रूपाली पिंगळे, सुरेश कोकरे, सरस्वती गोरड, महादेव गोरड, कोमल आवळे, रूपाली कोकरे ,बाबू कोळेकर, आयेशा शिकलगार, संजय कर्णवर, जयश्री कळसुले, शिक्षक तंज्ञ संजय हुलगे, शिक्षक प्रतिनिधी धनाजी वाघमोडे यांची निवड करण्यात आली. यावेळी सरपंच पांडुरंग पिसे, माजी सरपंच विजय गोरड, माजी अध्यक्ष आबासाहेब गोरड, पोलीस पाटील नानासाहेब, अंकुश गोरड, रामराव गोरड, आप्पा आवळे, बिरा गोरड, सचिन पिंगळे, दादा कोळेकर, ज्ञानदेव कोकरे, भारत गोरड, आबाजी कर्णवर, बिरा कर्णवर ,दशरथ गोरड, बापू होनवार, बाळु गोरड, अमीर सिकलगार, रज्जाक शिकलगार, मुख्याध्यापक सचिव हरी खरात उपस्थित होते.

### राज्याची योग्य व्यवस्था ही लेखणीच्या माध्यमातूनच करता येते : डॉ. घोडके

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ जानेवारी-**

माँसाहेब जिजाऊ यांनी आपल्या स्वप्नातील स्वराज्य निर्माण करण्यासाठी शिवबाला धडे दिले. तलवारीपेक्षा लेखणी श्रेष्ठ असते. तलवारीच्या बळावर राज्य निर्माण करता येते. मात्र व्यवस्था ही योग्य लेखणीच्या माध्यमातूनच करता येते, असे प्रतिपादन शिव व्याख्याते प्रा. डॉ. अरुण घोडके यांनी केले.



येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. समाधान माने उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. गोवर्धन दिकोंडा यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. भारती सुडके यांनी केले. या कार्यक्रमात इतिहास विषयातून पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल प्रा. डॉ. सुवर्णा हजारे-डांगे यांचा सत्कार करण्यात आला. समारंभ समितीच्या वतीने माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास समारंभ समिती प्रमुख प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे, प्रा. डॉ. उमेश साळुंखे, प्रा. सुमन केंद्रे, प्रा. कल्याण वाटाणे, प्रा. बाळासाहेब गायकवाड, प्रा. विनोद आखाडे उपस्थित होते. इतिहास विभागप्रमुख डॉ. दत्तात्रय चौधरी यांनी आभार मानले.

### संक्रांतीचे खण खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी

#### मंगळवेढ्यातील आठवडा बाजारात महिलांची लगबग

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि. १२ जानेवारी-**

हिंदू संस्कृतीत महिलांचा मोठा सण मकर संक्रांत ही बुधवारी असून या सणासाठी महिलांना लागणारे खण, बांगड्यांची दुकाने व इतर साहित्यांची दुकाने सज्ज झाली आहेत. मकर संक्रांतीच्या सणाला लागणाऱ्या सुगड आणि बोळक्यांच्या खरेदीसाठी मंगळवेढा येथे आठवडा बाजारात महिलांची मोठी लगबग पाहायला मिळत आहे.

उद्या मकर संक्रांत असल्याने महिलांनी सणासाठी साहित्य खरेदीसाठी बाजारात गर्दी केली आहे. मातीच्या साहित्याचे दर यावर्षी बाजारात पाच बोळक्यांचा संच ३० ते ४० रुपयांस मिळत आहे. लोटकी ४० ते ६० रुपये तर दोन सुगडांचा संच १०० ते १२० रुपयापर्यंत विकला जात असल्याची माहिती अमोल कुंभार यांनी दिली. मातीची भांडी आणि सणाचे साहित्य तयार करणारे मोजकेच कारागीर उरले आहेत. मकर संक्रांतीनिमित्त सुवासिनीचे वाण, नवीन जोडवी करतात. ती बनविण्यासाठी सोनार, सराफांच्या दुकानात महिलांची गर्दी दिसून येत आहे. प्रत्येक कासरांच्या दुकानांमध्ये ही महिलांची बांगड्या भरण्यासाठी गर्दी आहे.



भोगीसाठी लागणाऱ्या भाज्या तसेच चालू हंगामात आलेली धान्याची कणसे, हरभरा ढाळा, बोरे तसेच ऊसाचे तुकडे आधी खरेदीसाठी बाजारपेठेत महिलांची गर्दी दिसून येत आहे. मकर संक्रातीचे ग्राम दैवतास व श्री संत दामाजी पंताच्या मंदिरात अनेक महिला वाणवसा करण्यास जाण्याची परंपरा आहे.





### संक्रातीसाठीचे खण अन् भोगीच्या भाजीने भरला बाजार; खरेदीसाठी होतेय गर्दी

**तभा वृतसेवा,**
**अकलूज,दि.१२ जानेवारी-**

मकर संक्रातीच्या सणा निमित्ताने अकलूज बाजारपेठेत ग्राहकांनी मोठी गर्दी केली आहे. संक्रातीसाठी लागणारे मातीचे खण विजय चौक येथे मोठ्या प्रमाणावर विक्री झाल्याचे दिसत आहेत. तालुक्यातील कुंभार समाजाने एकच भाव काढल्याने वाणाचे भाव टिकून आहेत. कुंभार समाजाच्या नेत्या ज्योती कुंभार यांनी सर्वांची एकी करुन एकच भावाने खण विक्रीसाठी ठेवले आहेत. ५० ते १०० रुपयेपर्यंत त्याची किंमत आहे.

रात्री उशिरापर्यंत व उद्या सकाळपर्यंत हा बाजार चालणार आहे. त्याचबरोबर भोगीसाठी लागणाऱ्या भाज्या मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आहेत. जुने बस स्थानक, मंडई पासून ते जुने पोलीस स्टेशन पर्यंत विक्रेते रस्त्याच्या दुतर्फा बसले आहेत. त्याचबरोबर शंकरनगर रोडवरही मोठ्या प्रमाणावर भाजीपाल्याचा बाजार भरला आहे. आठवडा बाजारामध्ये बाजार तळावरही मोठ्या प्रमाणावर भाजी विक्रीस आली आहे.

भोगीसाठी लागणारे वाण, गाजर, घेवडा, वांगी, हरभरा, हिरवी, मिरची, भुईमूग शेंगा आणि मुख्य म्हणजे चाकवताची भाजी, बोरे मोठ्या प्रमाणावर विक्रीस येऊनही बोरे शंभर रुपये पाव किलो, भाजी दहा ते पंधरा रुपये व कोणतीही भाजी वीस रुपये, २५० ग्रॅम ज्वारीचे कणीस वीस रुपयाला एक, त्याचबरोबर विड्याची पाने ८० ते १०० रुपयाला २५ नग विकली जात होती. त्याचबरोबर वानासाठी लागणारे तिळगुळ, सुपारी, हळकुंड,राळेचे तांदूळ आदी सणासाठी लागणाऱ्या वाणास मोठ्या प्रमाणावर मागणी होती. रात्री उशिरापर्यंत हा बाजार चालूच होता. शिवशंकर बाजार येथे संक्रातीनिमित्त लुटल्या जाणाऱ्या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर उलाढाल झालेली आहे तसेच बाजारपेठेतील किराणा दुकानांमध्ये महिलांची खरेदीसाठी झुंबड उडाली होती. सुवासिनीचे वाण, बांगड्यासाठी विजय चौक येथे वेगळा बाजार भरला होता.

# 'यण्णीमज्जन'ने ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महायात्रेस प्रारंभ

### ६८ शिवलिंगांना घालण्यात आली प्रदक्षणा

### मानकऱ्यांना करण्यात आला 'सरकारी आहेर'

### नंदीध्वज मिरवणूक मार्गावर अलोट गर्दी




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

सुमारे ९२५ वर्षांची परंपरा असलेल्या सोलापूरचे ग्रामदैवत श्रीसिध्देश्वर महायात्रेस सोमवार, दि.१२ जानेवारी २०२६ रोजी ६८ शिवलिंगांना यण्णीमज्जन अर्थात तैलाभिषेकने प्रारंभ करण्यात आला.

कसब्यातील हिरेहब्बू वाड्यात सकाळी ८ वाजता मानकरी राजशेखर हिरेहब्बू, राजशेखर देशमुख यांच्या हस्ते मानाच्या पहिल्या व दुसऱ्या नंदीध्वजांची विधीवत पूजा करण्यात आली. यावेळी काशीपीठाचे जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन महास्वामी, खा.प्रणिती शिंदे, आ.विजयकुमार देशमुख, पोलिस आयुक्त एम.राजकुमार, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबासे उपस्थित होते. सकाळी ९.३० वाजता 'यण्णीमज्जन'साठी नंदीध्वज मार्गस्थ झाले. भक्तगणांनी ''एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र... सिध्देश्वर महाराज की जय...'' असा जयघोष करत ६८ शिवलिंगांना प्रदक्षणा घातली. दरम्यान, जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या गेटजवळ नंदीध्वज आल्यानंतर मानकरी देशमुख यांच्याकडून मानकरी हिरेहब्बू यांना सरकारी आहेर करण्यात आला.

दुपारी १.३० वाजता श्रीसिध्दरामेश्वर यांच्या हातातील योगदंडसह योगदंडधारक मानकरी हिरेहब्बू व अन्य मानकरी श्री सिध्देरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ शिवलिंगांपैकी पहिले शिवलिंग असलेले अमृतलिंग येथे आल्यावर तेथे तैलाभिषेक करण्यात आला. यावेळी मानकरी देशमुख यांच्याकडून मानकऱ्यांना विडा देण्यात आला.

अमृतलिंग येथील धार्मिक विधी झाल्यानंतर श्रीसिध्देश्वर मंदिरातील गदगीस मानकरी हिरेहब्बू यांच्याकडून विधिवत पूजा करण्यात आली. याठिकाणी काही काळ विश्रांती घेऊन दुपारी २०३० वाजण्याच्या सुमारास उर्वरित शिवलिंगांना तैलाभिषेक करण्यासाठी नंदीध्वज मार्गस्थ झाले. मिरवणुकीच्या मार्गावर भक्तांची अलोट गर्दी झाली होती. ६८ शिवलिंगाना तैलाभिषेक करत रात्री उशिरा नंदीध्वज हिरेहब्बू वाड्यात पोहोचले.


सर्व छायाचित्र : नागेश दंतकाळे



# अजितदादांच्या राष्ट्रवादीला 'जक्का' यांचा 'धक्का'

### प्रभाग क्रमांक ९ मधील राष्ट्रवादीचे उमेदवार तुषार जक्का यांचा चक्क भाजपमध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत मतदानाला अवघे तीन दिवस शिल्लक असताना भाजपने मोठी खेळी खेळली आहे. प्रभाग क्रमांक ९ ड मधील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे अधिकृत उमेदवार तुषार जक्का यांनी थेट भाजपमध्ये प्रवेश केल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

तुषार जक्का यांचा पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत प्रवेश पार पडला. ऐन निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या प्रवेशामुळे प्रभाग क्रमांक ९ ड मधील राजकीय गणिते पूर्णपणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रभागात भाजपचे उमेदवार मेघनाथ येमूल, राष्ट्रवादी काँग्रेसचे तुषार जक्का आणि शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार सुरेश गायकवाड यांच्यात तिरंगी लढत रंगणार होती. मात्र राष्ट्रवादीच्या अधिकृत उमेदवाराने भाजपमध्ये प्रवेश केल्याने ही लढत आता एकतर्फी होण्याची चर्चा सुरु झाली आहे. भाजपने राष्ट्रवादीचा उमेदवार आपल्या गोटात घेतल्या मुळे राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला असून, विरोधकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. तर भाजप समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. रणधुमाळी चर्चेचा विषय ठरत आहे.

एकीकडे भाजपमध्ये अंतर्गत बंडखोरीचे सूर स्थानिक आमदारांकडून ऐकू येत आहेत, तर दुसरीकडे महाविकास आघाडीत जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर झाल्यानंतर इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजी पसरली आहे.

# मुस्लिम बांधवांच्यावतीने नंदीध्वजांवर पुष्पवृष्टी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

सिध्देश्वर महायात्रा अंतर्गत काढण्यात आलेल्या नंदीध्वज मिरवणुकीवर मराठा सेवा संघप्रणित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडच्यावतीने विजापूर वेस येथे पुष्पवृष्टी करण्यात आली. हिंदू-मुस्लिम एकता टिकावी, जातीय तेढ वाढू नये, समतेचा संदेश जावा; या उद्देशाने हा उपक्रम राबविला जातो.सोमवारी ६८ लिंगाच्या तैलाभिषेकसाठी मानाचे सातही नंदीध्वज हिरेहबू वाड्यातून मार्गस्थ करण्यात आले. विजापूर वेस नंदीध्वजांचे आगमन होताच पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच श्रीसिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे पदाधिकारी, सदस्य आणि हिरेहब्बूंचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शहराध्यक्ष मतीन बागवान, शफीक रचभरे, राजू हुंडेकरी, बशीर सय्यद, तन्वीर गुलजार, गफूर शेख, रिजवान शेख, रियाज पैलवान, सादिक मुजावर, अनिल उकिरडे, मुख्तार लालकोट, सरफराज शेख, मौला शेख आदी उपस्थित होते.



# ६८ लिंग प्रदक्षिणा; भाविकांना पी.बी. ग्रुपतर्फे दूध वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिध्दरामेश्वर महाराजांच्या यात्रेनिमित्त होणाऱ्या तैलाभिषेक निमित्ताने ६८ लिंग पायी प्रदक्षिणा करणाऱ्या भाविकांना पी.बी.ग्रुपच्या वतीने दूध वाटप करण्यात आले.

ग्रामदैवत श्री सिध्देरामेश्वर स्थापित पाचवे गणपती मंदिर, (६८ लिंगांपैकी ३१ वे श्री पशुपती लिंग, देशमुख मळा) येथे हा उपक्रम पार पाडण्यात आला. याप्रसंगी पी.बी. ग्रुपचे प्रमुख मार्गदर्शक तथा माजी गटनेते आनंद चंदनशिवे, गणेश पुजारी, सुशील बंदपट्टे, विश्वनाथ बिडवे, कविता चंदनशिवे, सारिका फुटाणे, प्रतीक चंदनशिवे यांच्यासह अन्य मान्यवरांनी मानाच्या नंदीध्वजाचे दर्शन घेतले.

भाविकांची सेवा ही महत्वाची असल्याची भावना या उपक्रमातून दिसून आली.



# प्रभाग २४ मध्ये धनुष्यबाण फडकवणार; राजेश काळे यांची भीष्म प्रतिज्ञा

### ॲड.राजशेखर शिवशरणअण्णा पाटील यांचा शिंदे शिवसेनेत जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २४ च्या राजकारणात आज मोठा राजकीय भूकंप झाला असून माजी आमदार शिवशरणअण्णा पाटील यांचे चिरंजीव ॲड.राजशेखर शिवशरणअण्णा पाटील यांनी आपल्या असंख्य समर्थक व कार्यकर्त्यांसह शिंदे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.

ॲड.राजशेखर पाटील याप्रसंगी बोलताना म्हणाले, प्रभाग क्रमांक २४ हा पूर्वीपासून शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. येत्या निवडणुकीत पुन्हा एकदा धनुष्यबाण हे चिन्ह या प्रभागातून प्रचंड बहुमताने निवडून आणणारच ही माझी भीष्म प्रतिज्ञा आहे. ॲड. राजशेखर पाटील हे स्वतः भारतीय जनता पार्टीकडून प्रभाग २४ मधून सर्वसाधारण गटात इच्छुक उमेदवार होते. प्रभागात लिंगायत समाजाची मोठी संख्या असून, 'लिंगायत समाजाला प्रतिनिधित्व मिळावे' अशी तीव्र व स्पष्ट जनभावना होती. मात्र, भाजपाने ओबीसी प्रवर्गातील उमेदवाराला सर्वसाधारण गटात उमेदवारी दिली.लिंगायत समाजावर मोठा अन्याय झाल्याचे सांगत समाजातील प्रतिष्ठित, ज्येष्ठ व तरुण वर्गात एकवटला आहे. आपल्या भावना गंभीरपणे दुखावल्या गेल्या आहेत. त्याचा मोठा राजकीय उद्रेक येत्या काळात प्रभाग २४ मध्ये पाहायला मिळणार, असे यावेळी सांगण्यात आले.मागील दोन निवडणुकांमध्ये राजशेखर बिराजदार यांचा अत्यंत कमी मतांनी पराभव झाला होता. यावेळी लिंगायत समाजाची मजबूत साथ, अनुभवी नेतृत्व आणि संघटित कार्यकर्ते यांच्या जोरावर ती संधी भाजपाकडे चालून आली होती. मात्र चुकीच्या उमेदवार निवडीमुळे भाजपाने ही सुवर्णसंधी गमावली असल्याची चर्चा जोरात सुरु आहे.यावेळी आमदार संजय कदम, माजी आमदार शिवशरणअण्णा पाटील, माजी जिल्हाध्यक्ष लक्ष्मीकांत ठोंगे-पाटील, मनीष काळजे, शहरप्रमुख अमर पाटील, प्रदीप साठे, पॅनल प्रमुख तथा माजी उपमहापौर राजेश काळे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**पॅनल प्रमुख, माजी उपमहापौर राजेश काळे यांची यशस्वी शिष्टाई**

लिंगायत समाजातील प्रतिष्ठित ॲड.राजशेखर पाटील यांच्या प्रवेशामुळे शिंदे शिवसेनेला मोठी ताकद मिळाली आहे. प्रभाग २४ मध्ये मोठे संघटनात्मक बळ मिळाले आहे. त्यांच्यासोबत मोठ्या संख्येने कार्यकर्ते, युवक आणि समाजातील प्रभावी घटक शिंदे शिवसेनेत दाखल झाल्याने प्रभाग २४ मध्ये शिवसेनेची स्थिती अत्यंत मजबूत झाली आहे. हा प्रवेश प्रभाग २४ च्या निवडणूक गणितात निर्णायक ठरणार असून, धनुष्यबाण पुन्हा एकदा या प्रभागावर आपला झेंडा रोवेल, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरु आहे.



# प्रभाग क्र. ७ मधील भाजपचे उमेदवार 'होम टू होम' प्रचारात आघाडीवर

### राघवेंद्र नगर परिसरातील मतदारांकडून भाजपच्या उमेदवारांचे जोरदार स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत लक्षवेधी असलेल्या प्रभाग क्रमांक ७ मध्ये भाजपाच्यावतीने होम टू होम प्रचारावर प्रारंभापासून ते प्रचाराच्या अंतिम टप्प्यातही अधिक भर दिल्या मुळे भाजप उमेदवार प्रत्येक दारी जाऊन आशीर्वाद घेण्यात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.

दररोज सकाळ अन् संध्याकाळच्या सत्रात प्रभाग क्रमांक ७ चा परिसर पिंजून काढण्यासाठी भाजपचे सर्व उमेदवार शर्थीचे प्रयत्न करत आहेत. आज सोमवारीही प्रभाग क्रमांक ७ मधील राघवेंद्र नगर, हजरत खान चाळ, दूध पंढरी परिसर, संग्राम चाळ, जुनी पोलीस लाईन आदी परिसरात प्रभाग क्रमांक ७ चे उमेदवार पद्माकर काळे, उत्तरा बरडे - बचुटे, श्रद्धा पवार, आनंद कोलारकर यांच्यासह कार्यकर्त्यांनी नागरिकांच्या भेटी घेत होम टू होम प्रचार केला. यावेळी मायबाप मतदारांनी आमच्या नगरांसह दारातही भाजपाने विकास केल्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांनी आमच्या दारी येऊन मत मागायची आवश्यकताही नाही; तरीही आपण आशिर्वादासाठी आलात आपणांस आमचा मतदानरुपी आशीर्वाद निश्चित राहणार असल्याची ग्वाही दिली.

या पदयात्रेत प्रभाग क्रमांक ७ चे उमेदवार पद्माकर काळे, उत्तरा बरडे - बचुटे, श्रद्धा पवार, आनंद कोलारकर यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

सोलापूर महापालिका निवडणूक तयारी अंतिम टप्प्यात

# मतदान यंत्र वितरण, स्ट्राँग रुम, मतमोजणी केंद्रांची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ११ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक अंतिम टप्प्यात आली असून, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, सुरक्षित व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे. महापालिका आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सचिन ओम्बासे यांनी मतदान यंत्र वितरण केंद्र, स्ट्राँग रुम, मतमोजणी केंद्रांची पाहणी केली.

मतदान यंत्रांचे वितरण ऑन-कॅमेरा पद्धतीने व कडक पोलीस बंदोबस्तात होत असल्याची खातरजमा करण्यात आली. स्ट्राँग रूममधील सीसीटीव्ही निगराणी, सीलिंग प्रक्रिया, प्रवेश-निर्गमन नियंत्रण व २४ तास सुरक्षा व्यवस्था याबाबत त्यांनी सविस्तर माहिती घेतली. मतमोजणी केंद्रांवरील बैठक व्यवस्था, वीजपुरवठा, अग्निसुरक्षा, सीसीटीव्ही यंत्रणा व कर्मचाऱ्यांची नियुक्ती यांचाही आढावा घेण्यात आला. निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा नियमानुसार, दक्षतेने



व पारदर्शकपणे राबविण्याचे निर्देश देत डॉ.ओम्बासे यांनी सुरक्षा व्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य देण्यावर भर दिला.

भारत व राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले.सोलापूर महानगरपालिका निवडणूक शांततेत, निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याचा विश्वास आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी व्यक्त केला. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी, महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी व पोलीस प्रशासन उपस्थित होते.

## मतदानाच्या दिवशी पाणीपुरवठा बंद

**सोलापूर :** पालिका निवडणूक, सिध्देश्वर यात्रेनिमित्त शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत.

गुरुवार दि.१५ जानेवारी रोजी मतदान दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संपूर्ण सोलापूर शहराचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. तर दि.१३ जानेवारी रोजी अक्षता सोहळा पार पडणार आहे. यानिमित्ताने नंदीध्वज मिरवणूक मार्गावर रांगोळी काढण्यात येणार असल्यामुळे, पाणीपुरवठा दुपारनंतर सुरू केला जाणार आहे.

# प्रभाग क्र.१३ मधील भाजपच्या उमेदवारांचा विजयी संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ जानेवारी**

सोलापूर महानगरपालिका पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीची रंगत वाढली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्यानंतर शहरात भाजपने वातावरण झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. १३ मधील भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार अ) सुनिता सुनिल कामाठी, ब) अंबिका हनुमंत चौगुले, क) सत्यनारायण रामय्या गुर्रम व ड) विजय भुमय्या चिप्पा यांनी सोमवारी होम टू होम प्रचार केला. दरम्यान, प्रभागातील हॉटेल सत्यम, ७० फूट रोड भाजी मंडई, गेंट्याल चौक, संत तुकाराम चौक, बापूजी नगर परिसर, विद्यानगर, पाथरूट चौक, खड्डा चौक, अशोक चौक, पोलिस चौकी, क्रांती झोपडपट्टी, कमटम नगर, श्रीकृष्ण मंदिर, भावनाऋषी पेठ दवाखाना मार्गे जाऊन पंचमुखी मंदिर होम टू होम प्रचार करण्यात आला.

यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह प्रभागातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग




मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाला. यावेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जयप्रकाशमध्ये राजमाता जिजाऊ व विवेकानंद यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**



जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे राजमाता जिजाऊ व राष्ट्रपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व राष्ट्रपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार व श्रीफळ अर्पण करण्यात आले. विद्यालयाचे लिपिक अथर्व क्षीरसागर यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या कार्याचा इतिहास भाषण रूपाने मांडला. लिटल चॅम्पची आरोही काकडे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेतील शरण्या पवार, तेजश्री कोळगे यांनीही याप्रसंगी भाषण केले. याप्रसंगी अध्यक्ष डॉ आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी सुभाषदादा कोळगे, राजनारायण कोळगे, पर्यवेक्षक डोंगरे के.ए., शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित घोळवे यांनी तर आभार प्रा. प्रशांत कोळगे यांनी मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### ‘एकलव्य’मध्ये राष्ट्रमाता जिजाऊ व विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

एकलव्य विद्या संकुल मंगरूळ यमगरवाडी येथे माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे वक्ते अण्णासाहेब मगर हे होते. प्रारंभी जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. विद्यार्थिनी मानसी मोहिते, पार्वती मारकड, अबोली माने, साक्षी धुरपडे, तेजस्विनी भोसले यांनी भाषण केले. दत्तात्रय खराडे या विद्यार्थ्याने जिजाऊ वरती कविता सादर केली. या कार्यक्रमास खंडू काळे, कोंडिबा देवकर, रमाकांत पवार, संतोष बनसोडे, मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, प्रणिता शेटकार, सुनिता राठोड, निर्मला हुग्गे, लक्ष्मी पवार, दैवशाला राजपूत, भीम कुंभार तसेच सर्व कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी अस्मिता भोजने, रूपाली गिरी यांनी केले. तर आभार अस्मिता भोजने हिने मानले.



### संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**परंडा, दि.१२ जानेवारी -**

परंडा येथील संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये स्वराज्याच्या जननी राजमाता जिजाऊ व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व जिजाऊ वंदनेने झाली. यावेळी मुख्याध्यापक व शिक्षकांनी जिजाऊंचे संस्कारशील मातृत्व व स्वामी विवेकानंदांचे आत्मविश्वास व चारित्र्यनिर्मितीचे विचार मांडले. विद्यार्थ्यांसाठी वेशभूषा स्पर्धा, संवाद, भाषणे व जीवनकार्यावर आधारित सादरीकरण झाले. अनेक विद्यार्थी विविध थोर व्यक्तिमत्त्वांच्या वेशात सहभागी झाले. प्रमुख पाहुणे संदीप दैन, मुन्ना शेख, कोमल दैन, अल्मास शेख उपस्थित होते. समारोपप्रसंगी मुख्याध्यापक संतोष भांडवलकर यांनी विद्यार्थ्यांना आदर्शांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

### उमग्यात जुगारविरोधी कारवाईत

**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

उमरगा पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुगारविरोधी कारवाई दरम्यान पोलिसांनी दि. ११ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २.१० वाजता याटे कॉम्प्लेक्ससमोर, उमरगा येथे छापा टाकला. या कारवाईत आरोपी नामे रवि संभाजी



राठोड (वय २९ वर्षे, रा. बलसूर, ता. उमरगा, जि. धाराशिव) हा ऑनलाईन फन टारगेट टाइमर मटका जुगार खेळण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य व १०,००० रुपये रोख रक्कम स्वतःच्या ताब्यात बाळगून असल्याचे उमरगा पोलीस ठाण्याच्या पथकास आढळून आले. पोलिसांनी जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करून संबंधित आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास उमरगा पोलीस करीत आहेत.

# श्री खंडोबाचे अणदूरमध्ये वाजत-गाजत आगमन



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१२ जानेवारी -**

अणदूर-मैलारपूर (नळदुर्ग) येथील पावणे दोन महिन्याचे वास्तव्य संपल्यानंतर श्री खंडोबाचे शनिवारी पहाटे अणदूरमध्ये वाजत गाजत आगमन झाले.आता खंडोबाचे सव्वा दहा महिने वास्तव्य अणदूरमध्ये राहणार आहे.

अणदूर आणि नळदुर्गच्या खंडोबाची मूर्ती चल असून, अणदूरमध्ये सव्वा दहा महिने आणि नळदुर्गमध्ये पावणे दोन महिने असा मूर्ती ठेवण्याबाबत लेखी करार आहे. नळदुर्गची पौष पौर्णिमा महायात्रा संपल्यानंतर अष्टमी करून नवमीच्या पूजेला श्री खंडोबा अणदूरमध्ये येतो, त्याप्रमाणे शुक्रवारी मध्यरात्री श्री खंडोबा नळदुर्गहून मार्गस्थ झाला होता. मैलारपूरच्या श्री खंडोबा मंदिरात शुक्रवार रात्री ११ वाजता अणदूर आणि नळदुर्गच्या मानकऱ्याचे आगमन झाले, त्यानंतर सहभोजन झाल्यानंतर मंदिराच्या गाभाऱ्यात मानकऱ्याचा मानपान आणि सत्कार करण्यात आला, त्यानंतर मूर्ती नेण्याबाबत आणि आणण्याबाबत लेखी करार करण्यात आला. त्यानंतर म्हाळसा, हेगडी प्रधान, मार्तंड भेरव यांच्या मुर्त्या अणदूरकडे मार्गस्थ झाल्या, त्यानंतर श्री खंडोबाची मुख्य मूर्ती पालखीत घालून हलगीच्या तालावर वारू नाचवत अणदूरकडे मार्गस्थ झाली.

शनिवारी पहाटे चार वाजता पालखीचे वेशीत आगमन झाले, डॉल्बीच्या आवाजात श्री खंडोबाची गाणी, हलगीचा दणदणाट आणि बँडबाजा लावुन मिरवणूक निघाली, समोर फटाक्यांची आतषबाजी आणि वारूचे फटकारे यामुळे वातावरण भक्तिमय आणि प्रसन्नमय झाले होते.. देव परत येणार म्हणून समस्त अणदूरकरांनी भल्या पहाटे उठून आपल्या घरासमोर सडा टाकून रांगोळी काढली होती, तसेच गावातील सुवासिनी महिलांनी पंचारती ओवाळून देवाचे औक्षण केले.

मिरवणूक जवळपास दोन तास चालली, पालखी पूर्व महाव्दारसमोर येतात गावातील महिलांनी पंचारती ओवाळून देवाचे औक्षण केले, सकाळी पाच वाजता सर्व मूर्तीची अणदूरच्या मंदिरात प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर उपस्थित



सर्व भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आले.

## घराला आग लावून तब्बल १० हजार रुपयांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

योगेश सुग्रीव कुटे, रा. सोनगिरी ता. भुम जि. धाराशिव यांच्या घरात अज्ञात व्यक्तीने दि. ०९ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ७.१५




वाजता आग लावून नुकसान केले. या घटनेत दोन ताडपत्री, फवारणीचे औषध, सोफ्यासह दोन गाद्या, अंथरण्याचे व वापरण्याचे कपडे यासह सुमारे १०,००० रुपये किंमतीची वस्तू जाळली गेली.

फिर्यादी योगेश कुटे यांनी दि. ११ जानेवारी रोजी प्रथम तक्रार दिल्यानंतर भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. पोलीस तपास सुरू आहेत आणि आरोपींचा शोध घेतला जात आहे.

# मंगरुळ (हंगरगा) पाटी ते मंगरुळ रस्त्याची दुरावस्था

**स्थानिकासह भाविकांना करावा लागतोय जीव मुठीत घेऊन प्रवास... खासदार, आमदारांचेही दुर्लक्ष...**

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१२ जानेवारी -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी व श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या तुळजापूर-मंगरुळ-इटकळ-अक्कलकोट मार्गावर मंगरुळ पाटी ते मंगरुळ या सुमारे ७-८ किलोमीटर रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर खड्डे पडल्याने दर्शनार्थी व स्थानिक नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असून लहान-मोठ्या अपघातांचे धोकादायक प्रमाण वाढले आहे.



स्थानिकांनी सातत्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, खासदार, आमदार व इतर स्थानिक लोकप्रतिनिधींना तक्रारी दिल्या असूनही रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या मार्गावर दररोज हजारो वाहने चालतात आणि महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेशसह संपूर्ण देशातील भाविक मोठ्या संख्येने या मार्गे दर्शनासाठी येतात.

तसेच या मार्गावर दोन साखर कारखाने आणि एक गूळ फॅक्टरी असल्याने शेतकऱ्यांना ऊस वाहतुकीतही प्रचंड अडचणी येत आहेत.

स्थानिक नागरिकांनी मागणी केली आहे की, रस्त्यावर दिशादर्शक फलक, अपघात सूचनांचे फलक, किलोमीटर अंतराचे फलक, पांढरे पट्टे, शाळा व दवाखाना असल्याचे फलक व गतिरोधक पांढरे पट्टे लावण्यात यावेत. तसेच रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, नाहीतर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, अशी सूचना स्थानिकांनी दिली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, दुर्दैवाने अपघात होऊन जीवित हानी झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, हा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, खासदार व आमदारांनी तात्काळ पाठपुरावा करून भाविकांसह स्थानिकांची गैरसोय दूर करावी, ही मागणी जोर धरत आहे.

## पोदार जम्बो किड्समधील चिमुकल्यांनी घेतले क्षेत्रभेटीतून प्रत्यक्ष शिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१२ जानेवारी -**

पोदार जम्बो किड्स, उमरगा येथील नर्सरी, ज्युनिअर व सिनिअर केजीच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार, दि. ०९ जानेवारी २०२६ रोजी एधऋड अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून उमरगा पोलीस स्टेशन येथे शैक्षणिक क्षेत्रभेट दिली. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळावे, त्यांच्या मनात कुतूहल निर्माण व्हावे, असा असून शाळेमार्फत दरवर्षी अशा प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

या भेटीदरम्यान उमरगा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आपुलकीने स्वागत केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराटे, झख तायवडे व झडख पुजारवाड यांनी पोलीस स्टेशनमधील दैनंदिन कामकाज, विविध विभागांची भूमिका तसेच पोलिसांचे सामाजिक कर्तव्य याबाबत विद्यार्थ्यांना सोप्या व समजण्याजोग्या शब्दांत माहिती दिली. महिला पोलीस शिपाई पल्लवी काटे व स्वाती कौरव यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांना प्रोत्साहन दिले.

यावेळी विद्यार्थ्यांना समाजातील पोलिसांची भूमिका, नागरिकांच्या सुरक्षेसाठी केले जाणारे प्रयत्न, शिस्त तसेच कवायतींबाबत माहिती देण्यात आली. या प्रत्यक्ष अनुभवातून चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने नवनवीन गोष्टी आत्मसात केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी पोलीस शिपाई वादे व निसार यांनी विशेष मेहनत घेतली.

ही क्षेत्रभेट यशस्वी होण्यासाठी उमरगा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी व सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराटे यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच लोटस पोदार लर्न स्कूलचे मुख्याध्यापक बी.पी. सिंग, उपमुख्याध्यापक अतुल फावडे, पोदार जम्बो किड्सच्या प्रमुख मंजिरी सूर्यवंशी यांच्यासह रागिणी जावळे, अनुसया शिंदे, ज्योती काळे, अश्विनी दूधभाते, नितीप्रिया पांचाळ, अश्विनी पाटील, रेणुका हिरमुखे, विजयालक्ष्मी अंबुसे, प्रतिभा महामुनी, अंजली क्षीरसागर, प्रज्ञा ढोसे व सरस्वती भालके यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शेतकरी कुटुंबातील तरुणाला औषध संशोधन क्षेत्रातील पीएचडीने गौरव

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१२ जानेवारी -**

कठोर परिश्रम, जिद्द आणि अपार चिकाटीच्या जोरावर शेतकरी कुटुंबातील हनुमंत पांडुरंग गंभिरे यांनी औषध निर्माण क्षेत्रात (फार्मसी) पीएचडी मिळवून आपल्या कुटुंबासह संपूर्ण गावाचा मान उंचावला आहे. मर्यादित आर्थिक परिस्थिती, शेतीवरील अवलंबित्व आणि अनेक अडचणींवर मात करत इटकूर येथील डॉ. गंभिरे यांनी औषध संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत जगभर मान मिळवला आहे.



पंजाब विद्यापीठाच्या १२ व्या वार्षिक दीक्षांत समारंभात शुक्रवार (ता. ९) उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंजाबचे राज्यपाल गुलाबचंद कटारिया आणि ब्रिटनच्या माजी पंतप्रधान मेरी एलिझाबेथ ट्रस यांच्या उपस्थितीत डॉ. गंभिरे यांना ‘फार्मास्युटिकल रिसर्च’ या विषयातील संशोधनासाठी पीएचडी प्रदान करण्यात आली.

उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनी भारतीय संशोधक जागतिक नियामक प्रणाली समजून आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभाव पाडत असल्याचे गौरवोद्गार काढले, तर मेरी एलिझाबेथ ट्रस यांनी फार्मास्युटिकल संशोधन जागतिक आरोग्यासाठी निर्णायक असल्याचे सांगितले.

# तुळजाई नगरीतील शब्दयज्ञ : १७ वर्षांची वक्तृत्व चळवळ

**विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी, चिंतनशील दृष्टी देणारी स्पर्धा नव्हे तर ही संस्कारशाळाचं**

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

तुळजापूर ही केवळ धार्मिक नव्हे तर सांस्कृतिक नगरी म्हणूनही ओळखली जाते. या पवित्र भूमीत शालेय जीवनापासूनच सक्षम, विचारवंत आणि निर्भीड वक्ते घडवण्याचे कार्य अत्यंत प्रामाणिकपणे व अविरतपणे सुरू आहे. शब्दांच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व घडवण्याची ही परंपरा तुळजापूरच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारी ठरत आहे.




स्पर्धा तुळजाभवानीची, वक्ता महाराष्ट्राचा हे केवळ ब्रीदवाक्य नसून, तुळजापूरच्या पवित्र भूमीतून उभी राहिलेली एक वैचारिक चळवळ आहे. गेली १७ वर्षे सातत्याने आयोजित होत असलेली ही राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आज महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा एक मजबूत पाया बनली आहे.

शब्दांची साधना, संस्कारांची जोपासण्याकरिता आई तुळजाभवानी मातेच्या शाकंभरी महोत्सवानिमित्त तुळजाई नगरीतील युवा स्पंदन सामाजिक संस्था व मराठवाडा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. शालेय वयातच विद्यार्थ्यांमध्ये विचार मांडण्याची क्षमता, आत्मविश्वास, निर्भीडता आणि सामाजिक भान निर्माण व्हावे, या उद्देशाने ही स्पर्धा सुरू करण्यात आली.

### घडवलेले नेतृत्व : उद्याचे महाराष्ट्र...

या स्पर्धेतून घडलेले अनेक विद्यार्थी आज प्रशासकीय सेवा, कायदा, शिक्षण, पत्रकारिता, सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. त्यांच्या मते, या वक्तृत्व स्पर्धेमुळेच स्वतःचे मत मांडण्याची हिंमत आणि समाजाकडे पाहण्याची दृष्टी मिळत आहे.

### राज्यभरातून सहभाग : विचारांची महासभा...

या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे तिचा व्यापक सहभाग. दरवर्षी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांतून कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खान्देश अशा सर्व विभागांतील ५,००० हून अधिक शालेय विद्यार्थी या मंचावर आपले विचार मांडतात. ग्रामीण भागातील विद्यार्थी असो किंवा शहरी शाळांमधील, प्रत्येकाला येथे समान संधी दिली जाते.

विद्यार्थी आणि शिक्षक दोघेही या वक्तृत्व स्पर्धेची वर्षभर आतुरतेने वाट पाहत असतात. राज्यातील ज्वलंत, समकालीन आणि अभ्यासपूर्ण विषयांच्या माध्यमातून दरवर्षी येथे मराठी भाषेचा आणि विचारांचा ‘जागर’ घडतो. हा केवळ स्पर्धेचा कार्यक्रम नसून, मराठी भाषेच्या वैभवाचा आणि बौद्धिक आनंदाचा उत्सव ठरतो.

ही स्पर्धा केवळ विजेते-पराभूत ठरवणारी नाही, तर विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी, चिंतनशील दृष्टी आणि समाजाशी नातं जोडून देणारी आहे. विषयांची निवड अत्यंत अभ्यासपूर्ण असते.

राष्ट्रनिर्माण, संविधान मूल्ये, पर्यावरण संरक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान, स्त्री-सशक्तीकरण, सामाजिक समता, लोकशाही मूल्ये - अशा विषयांवर विद्यार्थ्यांचे भाषण ऐकताना प्रेक्षकही भारावून जातात.

स्पर्धेचे परीक्षण अनुभवी प्राध्यापक, विचारवंत व वक्तृत्व क्षेत्रातील जाणकार करतात.

केवळ भाषेचा ओघ नव्हे, तर विषयाची समज, आशय, सादरीकरण आणि आत्मविश्वास या सर्व बाबींचा समतोल विचार करून गुणांकन केले जाते. अनेक परीक्षक विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर सूचनाही देतात, ज्यामुळे स्पर्धक अधिक परिपक्व होतात.



तुळजापूरसारख्या ऐतिहासिक व धार्मिक नगरीतून उभी राहिलेली ही वक्तृत्व परंपरा आज महाराष्ट्राच्या वैचारिक संस्कृतीचा एक भाग बनली आहे. आई तुळजाभवानी मातेच्या कृपाशीर्वादाने ही शब्दयात्रा अशीच अखंड सुरू राहो, आणि भविष्यातही महाराष्ट्राला विचारवंत, संवेदनशील व सक्षम पिढी मिळत राहो हीच अपेक्षा.

या उपक्रमामागे महेंद्र कावरे, प्रा. प्रशांत भागवत आणि अमर हंगरगेकर यांची अथक मेहनत आहे. सुरुवातीला मर्यादित साधनसंपत्तीमध्ये सुरू झालेली ही स्पर्धा आज राज्यस्तरावरील एक विश्वासार्ह व्यासपीठ बनली आहे. प्रशासन, शिक्षक, पालक आणि समाज यांचा वाढता प्रतिसाद या स्पर्धेच्या यशाची साक्ष देतो. तुळजापूर शहरातील हजारो नागरिकांचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य या विशेष वक्तृत्व स्पर्धेच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. समाजातील विविध घटक, पालक, शिक्षक, संस्था आणि स्वयंसेवक यांच्या मदतीमुळेच ही स्पर्धा दरवर्षी अधिक व्यापक आणि भव्य स्वरूपात साकार होत आहे.

या संपूर्ण उपक्रमाचा केंद्रबिंदू म्हणजे एक ध्येयवेडा नगरपालिका शिक्षक महेंद्र कावरे असून आपल्या सहकारी टीमसोबत ते महिन्यांआधीपासून सूक्ष्म नियोजन, संयोजन आणि अंमलबजावणी करत असतात. कोणतीही प्रसिद्धी नको, केवळ विद्यार्थ्यांच्या भविष्याची जडणघडण व्हावी, या एकाच उद्देशाने ते आणि त्यांची टीम अविरत कार्यरत असते.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ढोकी पोलीस ठाण्यात बेकायदेशीर शस्त्रसाठा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

ज्ञानेश्वर धनाजी पवार, रा. क. तडवळे (ता. धाराशिव) यांना दि. १० जानेवारी २०२६ रोजी रात्री ११.४५ वाजता तडवळे शिवारातील पेट्रोल पंपाजवळ, रॉयल हॉटेल बारजवळ लोकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकणारी लोखंडी गावठी कट्टा व तीन लोखंडी फायटर बेकायदेशीररीत्या बाळगताना ढोकी पोलिसांच्या ताब्यात आले.




पोलीस पथकाने लोखंडी गावठी कट्टा व तीन फायटर जप्त करून फिर्यादी सचिन श्रीकृष्ण ढेकणे यांच्या तक्रारीवरुन शस्त्र कायदा कलम ४, २५ तसेच भा.न्या. सं. कलम १३५ नुसार गुन्हा नोंदवला आहे.



## संक्षिप्त वृत्त...

### संजीवनी विद्यालयाचा शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेत घवघवीत यश

**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

चिलवडी येथील संजीवनी विद्यालयाने माहे सप्टेंबर २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला ग्रेड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इलेमेंटरी ग्रेड परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण १८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १२ विद्यार्थ्यांनी ग्रेड तर ६ विद्यार्थ्यांनी इ ग्रेड मिळवून यश संपादन केले असून या परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. तसेच इंटरमिडीएट ग्रेड परीक्षेत विद्यालयातून एकूण ३४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. या सर्व ३४ विद्यार्थ्यांनी ग्रेड प्राप्त करून घवघवीत यश मिळवले असून या परीक्षेचाही निकाल १०० टक्के लागला आहे. या यशासाठी कलाध्यापक नानासाहेब बोराडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती रेखा शिंदे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

### राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात दंतचिकित्सा शिबिर संपन्न

**नळदुर्ग, दि.१२ जानेवारी -**

चिकुंद्रा (ता. तुळजापूर) येथे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक शिबिरात दंतचिकित्सा शिबिर संपन्न झाले. या शिबिरात दंतचिकित्सक डॉ. माधुरी बाबरे यांच्या उपस्थितीत सुमारे ६० विद्यार्थी व ग्रामस्थांची मोफत दंत तपासणी करण्यात आली. यावेळी त्यांनी दंतरोग, मुखआरोग्य तसेच गुटखा-तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. मोहन बाबरे होते. शिबिर यशस्वी होण्यासाठी प्राध्यापकवर्ग, कर्मचारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

### जिजाऊ जयंतीचे सत्कार व सामाजिक उपक्रमांनी साजरी

**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समिती, धाराशिव यांच्या वतीने जिजाऊ जयंतीचा ४२९ वा वर्षोत्सव विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने नगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेविकांचा सत्कार शुक्रवार, ९ जानेवारी रोजी कोट गल्ली येथील जंगम मठ येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुरेखा जगदाळे, सुरेखा जाधव, डॉ. वैशाली बलवंडे, ॲड. स्मिता कोल्हे, ॲड. अमिता देशमुख व सुनीता साळुंके होते. यावेळी नगराध्यक्षा नेहा काकडे, नगरसेविका कुरेशी निसाबी, अलका पारवे, राणी पवार, उबरे सोनाली, गायत्री दंडनाईक, आकांक्षा वाघमारे, आंबेकर रूपाली, राजकन्या पवार, दिपाली पाटील, संगीता अकोसकर, वैशाली मुंडे, केशवबाई करवर, देवकते शकुंतला, सोनाली वाघमारे, ज्ञानेश्वरी निकम व पवार वंदना यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समिती अध्यक्षा प्रणिता पाटील यांनी केले, सूत्रसंचालन आनंदी पाटील यांनी केले. यावेळी जन्मोत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य व महिलांचा मोठा सहभाग या कार्यक्रमास लाभला.

### नेत्र तपासणी शिबिरातून वाहन चालकांची दृष्टी सुधारण्यावर भर

**येरमाळा, दि.१२ जानेवारी -**

रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या अनुषंगाने आज, ११ जानेवारी २०२६ रोजी धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग येथील येडशी टोलनाका येथे वाहन चालकांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर महाराष्ट्र पोलीस केंद्र धाराशिव व उपप्रादेशिक परिवहन कार्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आले. शिबिरात महामार्गावरील जड व हलक्या वाहनांचे चालक मोठ्या संख्येने सहभागी झाले. रोटरी नेत्र रुग्णालय धाराशिवच्या डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी करण्यात आली. ज्या चालकांना चष्म्याची गरज असल्याचे आढळले, त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. शिबिरासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक निशिकांत शिंदे, पोलीस उपनिरीक्षक नारायण डप्पडवाड, मोटार वाहन निरीक्षक सुशांत धुमाळे, सहाय्यक निरीक्षक सिद्धेश्वर मस्के, कार्यालय अधीक्षक नरसिंह कुलकर्णी आणि रोटरी नेत्र रुग्णालयाचे डॉ. इसाके व सहकारी उपस्थित होते.

### प्रियंका पासले यांना 'नारी शक्ती पुरस्कार' प्रदान

**मंगरूळ, दि.१२ जानेवारी -**

तुळजापुर तालुक्यातील तीर्थ बुद्रुक येथील प्रियंका पासले यांना इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने 'नारी शक्ती पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. हा सत्कार रविवार, ११ जानेवारी रोजा दिनदर्शिका प्रकाशन कार्यक्रमात करण्यात आला. प्रियंका पासले यांना हा पुरस्कार त्यांच्या सामाजिक कार्यासाठी दिला गेला. त्यांनी हलाखीच्या परिस्थितीतून मार्ग काढत उमेद बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण, संघटन आणि विविध प्रश्न सोडवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांसाठी हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांना सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि पेन देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण होते, तर प्रमुख उपस्थितींमध्ये जिल्हा परिषदेचे माजी सभापती मुकुंद दादा डोंगरे, वसंत वडगावे आणि हभप. दिंडेगावकर महाराज यांचा समावेश होता. प्रियंका पासले यांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# अनुष्का हत्येप्रकरणी न्यायासाठी भूम शहर बंद!

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१२ जानेवारी -**



धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील सकल मातंग समाजाने ४ जानेवारी रोजी लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीत शिकणारी अनुष्का पाटोळे हिच्या छळानंतर झालेल्या थंड डोक्याच्या हत्येच्या प्रकरणावर तीव्र निषेध व्यक्त केला. आंदोलकांचा आरोप आहे की, ही हत्या आत्महत्येचा बनाव करून झाकण्यात आली असून, पुरावे अत्यंत चतुराईने नष्ट केले गेले आहेत.

आंदोलनकर्त्यांनी डखढ चौकशी करून प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात पाठवावे, तसेच लातूर जिल्हाधिकाऱ्यांना सहआरोपी केले जावे अशी ठाम मागणी केली. समाजाच्या मते, या मागण्या मान्य केल्याशिवाय या चिमुकलीला खरा न्याय मिळणार नाही.

महाराष्ट्र सरकारने तत्काळ कारवाई न केल्याने १२ जानेवारी रोजी भूम तालुका बंद करण्यात आला. गोलाई चौकात रास्ता रोको आंदोलन, निषेध मोर्चा आणि चक्काजाम करण्यात आले. मोर्चा अण्णाभाऊ साठेनगर, गांधी चौक, नागोबा चौक, ओंकार चौक, गोलाई चौक या मार्गाने काढला गेला व नंतर उपविभागीय अधिकारी कार्यालय, भूम येथे धडक देण्यात आली. चारही बाजूंचे रस्ते बंद करून चक्काजाम करण्यात आले. आंदोलकांनी इशारा दिला की, आमच्या मागण्या मान्य न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

या आंदोलनासंदर्भातील निवेदन महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व गृहमंत्रालयाला उपविभागीय अधिकारी कार्यालय, भूम यांच्या मार्फत दिले गेले.

## वाशी तालुक्यात पारगाव येथे साऊ-जिजाऊ महोत्सव भावनिक वातावरणात संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१२ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील पारगाव येथे सावित्रीबाई फुले, माँ साहेब जिजाऊ आणि फातिमा शेख यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त दि.१२ जानेवारी रोजी साऊ-जिजाऊ महोत्सव भावनिक वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ, सावित्रीबाई व फातिमा शेख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच ध्वजारोहण करून करण्यात आली. या वेळी हालाखीच्या परिस्थितीतून संघर्ष करत आपल्या मुलाला डॉक्टर व मुलीला पोलीस अधिकारी घडविणाऱ्या शालन बिरु पवार यांना साऊ-जिजाऊ पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले.

पतीच्या निधनानंतर आयुष्याच्या प्रत्येक कठीण टप्प्यावर त्यांनी कष्ट, संयम व आत्मविश्वास दाखवत संसार सावरण्याची प्रेरणा दिली. सन्मान स्वीकारताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आणि उपस्थित वातावरण भावुक झाले.

कार्यक्रमात सुजाता चव्हाण यांनी साऊ-जिजाऊ यांना लिहिलेल्या पत्राचे वाचन करून सर्वांचे लक्ष वेधले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारगाव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती देशपांडे उपस्थित होत्या, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून धाराशिव जिल्हा अभियान व्यवस्थापक (उमेद) वनिता डोंगरे यांनी महिलांना संघर्षातून यशाकडे जाण्याची प्रेरणा दिली.

या कार्यक्रमास सरपंच महेश कोळी, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालय व साऊ-जिजाऊ फाउंडेशन, पारगाव यांच्या वतीने करण्यात आले.

## भुम पोलीस ठाण्यात मद्यधुंद वाहन चालवण्याची कारवाई

**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता आरोपी ज्योतीराम कल्याण भोसले (वय ३४, रा. ईट, ता. भुम, जि. धाराशिव) याने आपल्या ताब्यातील रिक्षा क्र. एमएच १४ केयु ८५८१ ओंकार चौक, भुम येथून गोलाई चौककडे जाणाऱ्या रस्त्यावर मद्यधुंद अवस्थेत चालवली.

यामुळे कलम १८५ (मोटार वाहतूक कायदा) चे उल्लंघन झाले असल्याचे नोंदविण्यात आले.

पोलीसांनी सरकारतर्फे प्राप्त झालेल्या पहिल्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध भुम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

## व्यंकटेश महाजन महाविद्यालयात मॅटलॅब प्रोग्रामिंगवर एकदिवसीय कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात गणित विभागाच्या वतीने तसेच प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (RUS) अंतर्गत मॅटलॅब प्रोग्रामिंग या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य कमलाकर पाटील होते, तर कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून गणित अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. जगदीश ननावरे उपस्थित होते.

कार्यक्रमास राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य देवीदास पाठक, गणेश मिलिंद पाटील, डॉ. मनीष देशपांडे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी तसेच गणित विभागप्रमुख डॉ. सुहास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना मॅटलॅब सॉफ्टवेअरचा वापर, त्याची उपयुक्तता तसेच शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेत प्रा. डॉ. महेश वावरे व प्रा. डॉ. योगेश मुळे हे प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांनी प्रत्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मॅटलॅब सॉफ्टवेअरची सखोल माहिती दिली.

प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांनी कार्यशाळा आयोजित करण्यामागील भूमिका स्पष्ट करत, विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यशाळेत एकूण ९५ विद्यार्थी व कर्मचारी यांनी प्रशिक्षण घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मिलिंद माने, प्रा.डॉ. लक्ष्मण चिखले व प्रा.डॉ. बनाळे ए.आर. यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. सुहास पाटील यांनी मानले.

ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी प्राचार्य प्रा.डॉ. प्रशांत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ. सुहास पाटील, प्रा. रूपल डोंगरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## उमरगा पोलीस ठाण्यात जुगार विरोधी कारवाई

**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

जुगार प्रतिबंधक कारवाईत उमरगा पोलीसांनी ११ जानेवारी २०२६ रोजी उमरगा पोलीस ठाणे हद्दीतील याटे कॉम्प्लेक्स समोर छापा टाकला.

या छाप्यामध्ये आरोपी रवि संभाजी राठोड (वय २९, रा. बलसुर, ता. उमरगा, जि. धाराशिव) याच्याकडून ऑनलाईन फन टारगेट टाइमर मटका जुगाराचे साहित्य आणि रु. १०,००० रक्कम स्वतःच्या ताब्यात ठेवलेली आढळली.

पोलीसांनी जुगार साहित्य आणि रक्कम जप्त केली असून, आरोपीविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा, कलम १२(अ) अंतर्गत उमरगा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

## जि.प. हायस्कूल, उमरगा येथे रोटरी क्लबतर्फे साने गुरुजी कथामाला




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१२ जानेवारी -**

येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये रोटरी क्लब उमरगा यांच्या वतीने साने गुरुजी कथामालेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक पद्माकर मोरे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब उमरगाचे अध्यक्ष डॉ.प्रा. धनंजय मेनकुदळे, आदर्श कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य शिवशंकर महाजन तसेच क्लबचे सचिव प्रा. राजेंद्र जोशी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. मान्यवरांच्या सत्कारानंतर प्रास्ताविक करताना रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. धनंजय मेनकुदळे यांनी एक हृदयस्पर्शी कथा सांगत विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. शिवशंकर महाजन यांनी समाजात उद्भवणाऱ्या अनेक समस्यांचे मूळ संस्कारहीनतेत असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री पंडित यांनी केले. यानंतर विद्यार्थ्यांना साने गुरुजींवरील लघुपट दाखवण्यात आला. आभार प्रदर्शन सोनाली मुसळे यांनी केले.

## इनोव्हेटिव्ह जॅगरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनची मासिक बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील गुळ पावडर उत्पादक कारखान्यांची संघटना इनोव्हेटिव्ह जॅगरी मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (IJM) यांची मासिक बैठक धाराशिव येथील अँपल हॉटेल येथे यशस्वीपणे पार पडली.



या बैठकीत चालू ऊस गाळप हंगामाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गुळ पावडर उत्पादक कारखान्यांची सद्यस्थिती, उपलब्ध ऊस, उत्पादन खर्च तसेच बाजारातील मागणी-पुरवठा यावर सखोल चर्चा करण्यात आली. तसेच येत्या काळातील ऊस गाळपाचे नियोजन, गुळ पावडर विक्रीसाठी किमान व योग्य दर निश्चिती, आर्थिक शिस्त, बाजारातील स्पर्धा, वाहतूक व साठवणूक व्यवस्थापन, कामगार सुरक्षितता आदी विषयांवर महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.

या बैठकीस इजमाचे कार्यकारी अध्यक्ष तथा रुपामाता उद्योग समूहाचे संस्थापक ॲड. व्यंकटराव गुंड-पाटील, श्री सिद्धीविनायक समूहाचे संस्थापक व सचिव दत्ता कुलकर्णी, उपाध्यक्ष तथा डी.डी.एन. समूहाचे चेअरमन विजय नाडे, कोषाध्यक्ष तथा एस.एम.डी. समूहाचे चेअरमन हणुमंत मडके, तज्ज्ञ संचालक प्रविण प्रजापती, कुलस्वामिनीचे संस्थापक मधुकर तावडे, चेअरमन आकाश तावडे, तुळजाभवानी शुगरचे चेअरमन अनिल काळे, हणुमान खांडसरीचे चेअरमन रामनिवास अग्रवाल, रुपामाता पॉवरचे कार्यकारी संचालक ॲड. अजित गुंड-पाटील, दत्तकृपाचे चेअरमन शरद पाटील, निमजाईचे चेअरमन मकरंदराजे राजेनिंबाळकर, साईप्रसाद शुगरचे चेअरमन बबनराव गवते, गुलमेश्वर शुगरचे व्हाइस-चेअरमन सिद्धेश्वर वायकर, बळीराजा ॲग्रोचे चेअरमन एकनाथ चाळक, शिवाजीराव ॲग्रोचे चेअरमन रविंद्र काळे, आशापुरक ॲग्रोचे संचालक वरद चरखा, गोपाळबुवा शुगरचे संचालक राजेश कराड, युके फार्म्सचे चेअरमन ओंकार खुर्पे, सोनाई ॲग्रोचे चेअरमन प्रा.टी.पी. मुंडे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## अधिकारी,कर्मचारी क्रीडा स्पर्धेत परंडाचा दमदार ठसा ; दुहेरी बॅडमिंटनमध्ये उपविजेतेपद, एकेरीत तृतीय क्रमांक



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१२ जानेवारी -**

श्री तुळजाभवानी क्रीडा संकुल, धाराशिव येथे दिनांक ८ ते १० जानेवारी दरम्यान अधिकारी व कर्मचारी यांच्यातील क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक रितू खोकर व उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम भालके यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

तीन दिवस चाललेल्या या स्पर्धांमध्ये वैयक्तिक तसेच सांघिक क्रीडा प्रकारांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग दाखवून आपली क्रीडाक्षमता सिद्ध केली. परंडा तालुक्याच्या वतीने दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेत विनोद सुरवसे व आनंद गायकवाड यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. प्राथमिक फेरीत कळंब व मुख्यालय संघांवर मात करत परंडा संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला. परंडा विरुद्ध उमरगा संघांमध्ये झालेला अंतिम सामना अत्यंत रोमहर्षक ठरला. या सामन्यात उमरगा संघाने बाजी मारत सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावले, तर परंडा संघ उपविजेतेपद मिळवून तालुक्याचा मान उंचावला. तसेच एकेरी बॅडमिंटन स्पर्धेत आनंद गायकवाड यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तृतीय क्रमांक मिळवला.

स्पर्धेतील वैयक्तिक व सांघिक क्रमांक मिळविणाऱ्या खेळाडू व संघांचा दिनांक १० जानेवारी रोजी धाराशिव येथील नगरपरिषद नाट्यगृहात मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

ही स्पर्धा क्रीडाभावना, संघभावना व आरोग्यसंपन्नतेचा संदेश देणारी ठरली असून उपस्थितांची मने जिंकण्यात यशस्वी ठरली.

## सुधाकर दत्तात्रय महाजन लिखित तिमिरातून तेजाकडे आत्मचरित्राचे गौरवपूर्ण प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

येथील सेवानिवृत्त तहसीलदार सुधाकर दत्तात्रय महाजन लिखित तिमिरातून तेजाकडे या आत्मचरित्रात्मक पुस्तकाचा प्रकाशन सोहळा नुकताच अत्यंत गौरवपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

आ. कैलास पाटील तसेच व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिवचे प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांच्या हस्ते धाराशिव येथे या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकामधून सुधाकर महाजन यांचे बालपण, जीवनातील संघर्ष, प्रशासकीय सेवाकाळातील अनुभव, प्रशासनातील जबाबदाऱ्या तसेच माणुसकीवर आधारित जीवनदृष्टी प्रभावीपणे उलगडण्यात आली आहे, असे प्रतिपादन यावेळी आ. पाटील यांनी केले. साधेपणा, प्रामाणिकपणा, संयम आणि संवेदनशीलता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख असून, त्याच मूल्यांचा ठसा या पुस्तकाच्या प्रत्येक पानावर जाणवतो, अशी भावना प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांनी व्यक्त केली.

## महात्मा बसवेश्वरमध्ये विवेकानंद, जिजाऊ माँ जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१२ जानेवारी -**

उमरगा येथील श्री महात्मा बसवेश्वर विद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी भारत पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



यावेळी मार्गदर्शन करताना भारत पाटील यांनी स्वामी विवेकानंदांच्या विचारांवर प्रकाश टाकत युवकांनी कसे असावे याबाबत सखोल मार्गदर्शन केले. स्वामी विवेकानंदांनी युवकांसाठी घालून दिलेला आदर्श आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून, युवक सुसंस्कृत, राष्ट्रप्रेमी व चारित्र्यसंपन्न असावेत, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय खोतकर यांनी केले.

# पाठपुराव्याला यश; अपघातात मृत ऊसतोड कामगाराच्या कुटुंबाला २३ लाखांची मदत



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील डोंगरवाडी येथील ऊसतोड कामगार गणेश डोंगरे यांच्या अपघाती मृत्यूनंतर सुरुवातीला प्रशासन व संबंधित साखर कारखान्यांकडून दुर्लक्ष करण्यात येत होते. मात्र मानवी हक्क अभियानाने आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी, धाराशिव यांना निवेदन दिल्यानंतर अखेर या प्रकरणाला गती मिळाली. संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे संबंधित यश साखर कारखान्याकडून मृत कामगाराच्या कुटुंबाला एकूण २३ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली असून, हा न्यायसंघर्षाचा विजय मानवी हक्क अभियानालाच श्रेयस्कर असल्याचे बोलले जात आहे.

कामाच्या ठिकाणी झालेल्या अपघातात गणेश डोंगरे यांचा मृत्यू झाल्यानंतर पत्नी व तीन लहान मुलांचे भवितव्य अंधारात गेले होते. शासन, प्रशासन आणि साखर कारखाने गप्प असताना मानवी हक्क अभियानाने पुढाकार घेत जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. मृत कामगाराच्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी शासन व कारखान्यांनी घ्यावी, तसेच किमान ५० लाख रुपयांची मदत द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली होती.

या निवेदनानंतर संबंधित यश साखर कारखान्याला हालचाल करावी लागली. संघटनेच्या दबावामुळे १९ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला, तसेच ऊसतोड कामगार महेश याने घेतलेली ४ लाख रुपयांची उचल पूर्णतः माफ करण्यात आली. त्यामुळे मृत कामगाराच्या कुटुंबाला एकूण २३ लाख रुपयांची मदत मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

मानवी हक्क अभियानाने ही मदत प्राथमिक असल्याचे स्पष्ट करत, मृत कामगाराच्या कुटुंबाला पूर्ण न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, अशी भूमिका घेतली आहे. संघटना नसती तर हे प्रकरण दडपले गेले असते, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत असून, या यशाचे सर्व श्रेय मानवी हक्क अभियानाच्या लढाऊ भूमिकेला व प्रशासनावर टाकलेल्या दबावालाच जाते, असे स्पष्ट मत व्यक्त होत आहे.

या निवेदनावर मानवी हक्क अभियानाचे जिल्हाध्यक्ष कैलास पवार, जिल्हा सचिव माहन ताटे, समन्वयक अरुणकुमार माने, सय्यद रझाक, सुग्रीव कांबळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# धाराशिव शहरात राजमाता जिजाऊ यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी



### नवजात कन्यांचा सन्मान, वृक्षारोपण, रक्तदान...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

शहरामध्ये राजमाता जिजाऊ यांची जयंती विविध सामाजिक उपक्रम राबववून मोठ्या उत्साहात दि.१२ जानेवारी रोजी साजरा करण्यात आली. सकाळपासूनच जिजाऊ चौकात जिजाऊ प्रेमींनी जिजाऊंना अभिवादन करण्यासाठी गर्दी केली होती. जिजाऊ उत्सव पारंपारिक पद्धतीने मात्र मोठ्या जल्लोषात साजरा केल्याने संपूर्ण परिसर जिजाऊंच्या जयघोष यांनी दणाणून गेला होता.

धाराशिव येथील जिजाऊ चौकामध्ये मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समिती अध्यक्ष प्रणिता पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मान्यवरांच्या हस्ते जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजीतसिंह पाटील, नगराध्यक्ष नेहा काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. तर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, नागरिक आणि विविध संस्थांनी भाग घेऊन जिजाऊंच्या विचारांना अभिवादन केले.

या उत्सवांमध्ये जिजाऊंच्या कार्याचा गौरव करण्यात आला आणि त्यांच्या विचारांवर आधारित सामाजिक उपक्रम राबवले गेले. यामध्ये रक्तदान आणि वृक्षारोपण याचा समावेश आहे. जिजाऊ चौकात जिजाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. तर मध्यवर्ती जिजाऊ जन्मोत्सव समितीच्यावतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे आज जन्मलेल्या मुलींना कपडे व मातांना साडी चोळी आदींचे वाटप करण्यात आले.

तसेच नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेविका यांचा सत्कार करण्यात आला. तर विद्यार्थ्यांनी वेशभूषा काढून शोभायात्रा व वाहन रॅली काढण्यात आली. या कार्यक्रमास जिजाऊ प्रेमी, शिवप्रेमी यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### न.प. शाळा क्र. ३ मध्ये जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१२ जानेवारी -**

तुळजापूर खुर्द येथील नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ३ मध्ये राष्ट्रमाता-राजमाता जिजाऊ माँसाहेब व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभी मुख्याध्यापक तुकाराम मोटे यांच्या हस्ते माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याच कार्यक्रमात ३७ व्या 'ओपन टू ऑल' ऑनलाईन अबॅकस स्पर्धेत 'चॅम्पियन ऑफ चॅम्पियन' ठरल्याबद्दल स्वरा अमित परमशेट्टी व विराज रेणुकादास बारगजे या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

## शेतकरी, शेतमजूर व निराधारांच्या मागण्यांसाठी वाशी तहसीलवर जाणीव संघटनेचा सोमवारी मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१२ जानेवारी -**

तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर, गायरानधारक व निराधार नागरिकांच्या विविध मागण्यांसाठी जाणीव संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त वाशी तहसील कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येणार आहे.

या मोर्चामधील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. दिव्यांगांप्रमाणेच संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ पेन्शन योजना, एकल महिला व निराधार लाभार्थ्यांना दरमहा किमान २,५०० रुपये पेन्शन मंजूर करावी. वाशी तालुक्यात १९८५ पासून दलित, भूमिहीन व आदिवासी कुटुंबांनी पडीत गायरान जमीन वहितीखाली आणून शेती करत उदरनिर्वाह केला आहे. अशा कुटुंबांच्या नावावर सातबारा करून पिकांचे पंचनामे करावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

तसेच संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना व इंदिरा गांधी वृद्धापकाळ पेन्शन योजनांसाठी असलेली वार्षिक उत्पन्नाची २१,००० रुपयांची अट रद्द करून ती ६०,००० रुपये करण्यात यावी, अशी मागणी मोर्चात करण्यात आली आहे.

यासोबतच शेतकऱ्यांचे कर्ज, वीजबिल व शैक्षणिक फी माफ करावी, मंत्रिमंडळाच्या ठरावानुसार राहिलेले शेतकरी अनुदान तात्काळ वितरित करावे, घरकुल व घरपरजरी अनुदानाचे वाटप करावे, मनरेगाअंतर्गत मोठ्या प्रमाणावर कामे सुरू करून मजुरांच्या हाताला काम द्यावे, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

या सर्व मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले आहे. या मोर्चात जनतेने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ नागडे यांनी केले आहे.


सोलापूर तरुण भारत
नियमित वाचा...

## व्ही.पी. शैक्षणिक संकुलात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

धाराशिव येथील व्ही.पी. शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड येथे डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजमाता जिजाऊ यांच्या कर्तृत्वावर तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणादायी विचारांवर सखोल मार्गदर्शन केले.



व्ही.पी. शैक्षणिक संकुलातील कृषी महाविद्यालयात जिजाऊ जयंती व राष्ट्रीय युवा दिनानिमित्त स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धाही घेण्यात आल्या.

या कार्यक्रमास व्ही.पी. शैक्षणिक संकुलाचे प्रशासकीय अधिकारी व एस.बी.एन.एम. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरज ननवरे, आर.पी. फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गाझी शेख, एस. पी. पॉलीटेक्निकचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, वेलनेस फिजिओथेरपी कॉलेजच्या प्राचार्य डॉ. पूजा आचार्य, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, डेअरी महाविद्यालयाचे प्राचार्य बालाजी वाघमारे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, आयटीआयचे व्यवस्थापक प्रा. दत्तात्रय घावटे, लेखापाल योगेश मंडलिक आदी मान्यवर उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक : जोशी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१२ जानेवारी -**

स्वामी विवेकानंद हे भारतीय संस्कृतीचे तेजस्वी प्रतीक असून त्यांच्या विचारांचा प्रभाव आजही समाजमनावर दिसून येतो. त्यांच्या विचारांमुळेच भारत देशाने जागतिक पटलावर आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. ही सांस्कृतिक परंपरा आपण जतन केल्यामुळेच आपली शिक्षणव्यवस्था अधिक दर्जेदार व समृद्ध होत आहे, असे प्रतिपादन सहशिक्षक अविनाश जोशी गुरुजी यांनी केले.



स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर येथे राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी जोशी गुरुजी प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार होत्या. याप्रसंगी गोपाळ आष्टे गुरुजी, संगीता भावसार, जैतूनबी मेंडके यांच्यासह सर्व शिक्षकवृंद उपस्थित होता. यावेळी बोलताना संगीता भावसार म्हणाल्या की, मासाहेब जिजाऊ यांनी त्या काळातील समाजाचा सखोल अभ्यास करून छत्रपती शिवाजी महाराजांवर योग्य संस्कार केले.

त्यांनी शिवरायांना सर्वार्थाने सक्षम, कर्तबगार व प्रजाहितदक्ष नेतृत्व घडवले. त्यामुळेच शिवाजी महाराज हे रयतेचे खरे छत्रपती बनले. आजच्या मातांनी व विद्यार्थ्यांनी यापासून प्रेरणा घेऊन आदर्श समाजनिर्मितीस हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत उपस्थित राहून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने पालकही उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख समीर देशपांडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन जैतूनबी मेंडके यांनी केले.

### पोदार इंटरनॅशनल स्कूल, विज्ञान प्रदर्शन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होऊन भविष्यात सृजनशील वैज्ञानिक घडावेत या उद्देशाने पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे प्रा.डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रदर्शन यशस्वीपणे आयोजित करण्यात आले.

प्रदर्शनाचे उद्घाटन डीआरडीएस सोलापूर येथील धर्मेश टंक, सौम्या पूजार व शिवकुमार स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत रिबन कापून करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य निलेश जाधव, व्यवस्थापक जीवन कुलकर्णी व उपव्यवस्थापक प्रदीप शिंदे उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनात इयत्ता पाचवीच्या विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी विविध संशोधनात्मक प्रकल्पांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे नियोजन मयुरी उंबरजे यांनी केले होते.

## जगदाळे महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिनानिमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१२ जानेवारी -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी येथे राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जिल्हा धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती तथा राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ. श्रीराम मुळीक (उपमुख्याध्यापक, संस्कार प्रबोधिनी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, सरमकुंडी) उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक कदम होते. यावेळी ग्रामीण रुग्णालय वाशी येथील आय.सी.टी.सी. समुपदेशक परमेश्वर तुंदारे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदचे जिल्हा संघटक अजय टोले तसेच कार्यक्रमाचे संयोजक प्रा.डॉ. आनंद करडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. श्रीराम मुळीक म्हणाले की, स्वामी विवेकानंदांनी अडचणींवर मात करून स्वतःमधील सुप्त प्रतिभा शोधण्याचा व ध्येयप्राप्तीसाठी अथक परिश्रम करण्याचा संदेश दिला आहे. ज्ञान, व्यायाम व संस्कार या स्वामी विवेकानंदांच्या त्रिसूत्रीचा अंगीकार करणे आजच्या युवकांसाठी आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक कदम आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, राष्ट्रमाता जिजाऊंनी दोन छत्रपती घडवले आणि त्यांच्या आदर्श संस्कारांमुळेच स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. तसेच स्वामी विवेकानंदांच्या कर्मसिद्धांत व योगसिद्धांतामुळे समाजाला प्रचंड आत्मविश्वास मिळाला असून, युवकांनी जिजामाता व विवेकानंद यांच्या विचारांतून प्रेरणा घ्यावी, असे त्यांनी सांगितले. यावेळी विज्ञान प्रदर्शनामध्ये यश संपादन केल्याबद्दल उदयसिंह देशमुख, वेदांत शिंदे व ईश्वरी डोरले यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. आनंद करडे यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ. दैवशाला रसाळ यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. महादेव उंदरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. मिलिंद शिंदे यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. कृष्णा थोरात, मुकुंद कोळी, दत्ता फुले व नरसिंग ढवळे यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला प्राध्यापकवर्ग, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिव जिल्हा अजिंक्यपद व सब-ज्युनियर निवड चाचणी स्पर्धा १९ जानेवारीला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ जानेवारी -**

महाराष्ट्र थलेटिक्स संघटनेच्या वतीने कोपरगाव (जि. अहिल्यानगर) येथे आयोजित होणाऱ्या ८, १०, १२ व १४ वर्षांखालील मुला-मुलींच्या राज्यस्तरीय सब-ज्युनियर थलेटिक्स स्पर्धेसाठी धाराशिव जिल्हा संघाची निवड करण्यात येणार आहे. यासाठी धाराशिव जिल्हा थलेटिक्स असोसिएशन व जागर फाउंडेशन, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा व जिल्हा संघ निवड चाचणी स्पर्धा श्री तुळजाभवानी क्रीडा संकुल, धाराशिव येथे दि. १९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे.

स्पर्धांचे प्रकारात ८ वर्षांखालील (मुले व मुली): ५० मी., १०० मी. धावणे, स्टँडिंग ब्रॉड जंप, १० वर्षांखालील: ५० मी., १०० मी. धावणे, स्टँडिंग ब्रॉड जंप, गोळा फेक, १२ वर्षांखालील: ६० मी., ३०० मी. धावणे, स्टँडिंग ब्रॉड जंप, गोळा फेक, १४ वर्षांखालील: ८० मी., ३०० मी. धावणे, लांब उडी, गोळा फेक. या स्पर्धांमधून निवड झालेल्या विजयी खेळाडू-खेळाडूंची धाराशिव जिल्हा संघात निवड केली जाणार आहे.

वयोगट पात्रता (जन्मतारीख) ८ वर्षे: ०९/०२/२०१८ ते ०८/०२/२०२०, १० वर्षे: ०९/०२/२०१६ ते ०८/०२/२०१८, १२ वर्षे: ०९/०२/२०१४ ते ०८/०२/२०१६, १४ वर्षे: ०९/०२/२०१२ ते ०८/०२/२०१४ असे असणार असून आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड, जन्म दाखला, (नगरपालिका/ग्रामपंचायत) आवश्यक असणार आहे. ऑनलाईन नोंदणीसाठी लिंक : https://forms.gle/QSmn78xBaZo9nvf8 या अर्ज करावा. अर्ज करण्याची अंतिम तारीख : १७ जानेवारी असणार आहे.

या अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत अधिकाधिक खेळाडूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा संघटनेचे अध्यक्ष भरत जगताप व सचिव योगेश थोरबोले यांनी केले आहे.



### खरेदीपूर्व जाहीर प्रगटन

आमचे अशिल **गणेश विश्वनाथ पुजारी, रा. तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव** यांनी दिलेल्या माहिती, दाखविलेल्या कागदपत्रावरून व दिलेल्या अधिकारपत्रावरून तमाम जनतेस विशेषतः मौजे, तुळजापूर, ता. तुळजापूर जि. धाराशिव येथील जनतेस कळविण्यात येते की, मौजे. तुळजापूर (रुरल), ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथील **जमीन गट नं. २००/१** यापैकी महादेव बसवन्ना बणजगोळे व महालिंगप्पा महादेवप्पा माशाळकर यांच्या सामाईक मालकीचे **क्षेत्र ०० हे. ४० आर.** आकार ०१ रु. ३९ पैसे, ज्याची चतुः सिमा पूर्व श्रीकांत कुलकर्णी यांची प्लॉटींग, पश्चिम धट यांची प्लॉटींग, दक्षिण- मस्के यांची प्लॉटींग, उत्तर पेंदे यांची शेतजमीन, सदर जमीन आमचे आशिल हे कायम खुष खरेदी करण्याच्या दृष्टीने जमीनमालक यांना इसार रक्कम अदा केलेली आहे, तरी आमचे आशिल वर नमुद जमीनमालक यांना सदर जमीनीची उर्वरीत रक्कम अदा करुन सदरची जमीन रजिष्टर्ड खरेदीखता अधारे कायमखुष खरेदी घेणार आहेत.
तरी आमचे आशिल हे सदर मिळकत खरेदी घेणार असून, सदर मिळकतींवर जर कोणाचे काही हक्क, हित, दान, गहाण, कर्ज, पोटगी, बोजा तसेच इतर कोणत्याही प्रकारचा व्यवहार असल्यास आमचे आशिलास १५ दिवसांच्या आत लेखी कळवावे, अन्यथा सदर जमीन मिळकत ही निजखमी व बोजारहीत असल्याचे समजून आमचे आशिल नोंदणीकृत खरेदीखत करून घेतील, त्यानंतर येणारे हरकत व आक्षेप आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. तरी कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून सदरचे जाहीर प्रगटन दिले आहे.
**सबब हे जाहीर प्रगटन दिले असे.**
**दिनांकः- १२/०१/२०२६.**

**तर्फे,**
**ॲड. शुभम रत्नाकर खोले**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय, तुळजापूर)**

**जाहीर प्रगटन देणार**
**गणेश विश्वनाथ पुजारी**

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बंडखोरांचे भाजपामधून सहा वर्षांसाठी निलंबन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ जानेवारी :** पक्षशिस्तीचा भंग करून संघटनात्मक शिस्तीला बाधा निर्माण होत असल्याचे निदर्शनास आल्याने पक्षातील १८ जणांना भाजपातून ६ वर्षांसाठी निलंबित करण्यात आले असल्याची माहिती शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी दिली.

लातूर मनपाच्या सार्वत्रिक निवडणुकीत पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून पक्षशिस्त, धोरणे व निर्णय यांचे पालन होणे अपेक्षित होते.तथापि काहीजणांच्या कार्यपद्धतीमुळे पक्षाच्या शिस्तीला बाधा निर्माण झाली.या संदर्भात पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर या १८ जणांचे प्राथमिक सदस्यत्व रद्द करून त्यांना पक्षातून ६ वर्षांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे कार्यकर्ते जी पदे भूषवित होते ती पदेही समाप्त केली जात असल्याचे पक्षाने जाहीर केले आहे.

पक्षहित व संघटनात्मक शिस्त लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आलेला असल्याचेही शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी या बाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे.



# लातुरात एका मताची किंमत दोन हजार रुपये?


### समाजमाध्यमांवरील चर्चेने मतदार संभ्रमात । लोकशाहीची क्रूर चेष्टा सुरु असल्याचा मतदारांचा आरोप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ जानेवारी :** सध्यस्थितीत कोणतीही निवडणूक म्हटले की उमेदवारांकडून मतांसाठी मतदारांना सर्रास पैसे वाटप केले जात असल्याची चर्चा रंगते. याबाबत पैसे देणारा आणि घेणारा दोघांचीही 'चिडीचूप' असल्याने कोणावरही ठामपणे आरोप करता येत नाही. कारण यासंदर्भात कोणीही छातीठोकपणे बोलायला पुढे येत नाही. चालू असलेल्या लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीतही एका मतांसाठी काही ठराविक राजकीय पक्षांची मंडळी चक्क दोन हजार रुपये देत असल्याची चर्चा समाजमाध्यमांवर सुरु झाली आहे. या चर्चेने मतदार संभ्रमात असून सुजाण मतदारांनी हा प्रकार लोकशाहीची क्रूर चेष्टा असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

सर्वसामान्य आणि सरळ मार्गाने चालणाऱ्या व्यक्तींना निवडणूक लढविणे आजमितीस अशक्य झाले असल्याचे बोलले जाते. आजघडीला कोणताही कार्यकर्ता इच्छुक उमेदवारांकडून काही ना काही अपेक्षा बाळगून चालताना दिसतो. तीन चार दशकापूर्वीच्या वातावरणातील नेते-कार्यकर्ते आणि आजचे नेते-कार्यकर्ते यांच्यात जमीन आस्मानाचा फरक आहे. त्यावेळी कार्यकर्ते नेत्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून चालत असत. नेताही बोलल्याप्रमाणे चालण्याला प्राधान्य देत असे. आज ना नेते तत्वाप्रमाणे चालतात ना कार्यकर्ते. सध्यस्थितीत एकही नेता तत्व, प्रामाणिकपणाच्या गोष्टी करताना आढळून येत नाही. त्यावरून राजकारणाचा दर्जा किती खालावला आहे, याची पुसटशी कल्पना येते.

आजच्या निवडणुकीत निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या आचारसंहितेच्या चौकटीत कोणताही उमेदवार वागताना दिसत नाही. याची कल्पना दस्तुरखुद्द निवडणूक आयोगालाही असते, नाही असे नाही. परंतु आयोगाच्या भीतीपोटी का होईना काही गोष्टी मर्यादेत राहून करतात, एवढेच काय ते समाधान. निवडणुकीसाठी आखून दिलेली



खर्चाची मर्यादा तर सर्रास ओलांडली जाते याची सगळ्यांनाच कल्पना आहे. साध्या ग्रामपंचायतच्या सरपंच पदाच्या निवडणुकीत एक एक कोटीपर्यंतचा खर्च करणारी मंडळी जिल्ह्याच्या राजकारणात आहेत. हा प्रकार केवळ लातूर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात-देशातही चालताना दिसतो. पण त्याबाबतीत स्पष्टपणे बोलायला कोणीही पुढे येत नाही, हा भाग वेगळा. लातूर शहर मनपा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात येऊन पोहचला आहे. मंगळवारी सायंकाळी प्रचाराच्या तोफा थंडावणार आहेत. प्रचारादरम्यान आरोप प्रत्यारोपांची मोठ्या प्रमाणात देवाण - घेवाण झाल्याचे पाहायला मिळाले. या निवडणुकीत समाज माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण ठरल्याचे निदर्शनास आले. कोणतीही गोष्ट क्षणात समाजातील सर्वस्तरीय घटकांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणूनही समाज माध्यमांकडे पाहिले जाते.

लातुरात मतदानासाठी दोन-दोन हजार रुपये देण्यात येत असल्याची चर्चा सोमवारी समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसली. काही प्रमुख राजकीय पक्षांच्या लोकांना अमुक प्रभागात पैसे वाटप करताना रंगेहाथ पकडले वगैरे चर्चा चालू असल्याचे पाहून मतदारांतही संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून आले. येत्या दोन दिवसात असे प्रकार घडल्याच्या चर्चा मोठ्या प्रमाणात कानावर आल्यास फारसे नवल वाटायला नको. कारण प्रत्येक राजकीय पक्ष यासाठी परस्परांवर कुरघोडी करण्याच्या नक्कीच प्रयत्नात असल्याचे दृष्टीपथास येत आहे. मतांसाठी पैसे देणारी मंडळी आणि मतदानासाठी त्यांच्याकडून पैसे घेणारे मतदार या दोघांच्याही या कृतीबद्दल सुजाण नागरीकातून सखेद आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आपले अमूल्य मत कोणीही, कोणत्याही उमेदवाराला, राजकीय पक्षाला विक्री करू नये असे आवाहन सुजाण मतदारांतून केले जात आहे. हा प्रकार लोकशाहीसाठी अत्यंत घातक असून अशा घातक प्रवृत्तींना मतदारांनी वेळीच ठेचून काढावे, असे आवाहनही सुजाण मतदारांनी केले आहे.

## श्री गुरु तेगबहादूर यांच्या कार्याचा शाळा, महाविद्यालयांमध्ये होणार जागर

लातूर, दि. १२ (जिमाका) : हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम



वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने मानवतेसाठी त्याग, धैर्य आणि धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक असलेल्या श्री गुरु तेग बहादूर यांचा इतिहास शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविला जाणार आहे. यासाठी शिक्षण विभागामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून यासाठी जिल्हास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

श्री गुरु तेग बहादूर यांचा गौरवशाली इतिहास, त्यांनी दिलेले

**३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त विशेष उपक्रम; शिक्षण विभागामार्फत घोषवाक्य, निबंध, वक्तृत्व स्पर्धांचेही आयोजन**

ले बलिदान आणि त्यांचे कार्य याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी सर्व शाळांमध्ये त्यांच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखविला जाणार आहे. यासोबतच चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धांचेही आयोजन करण्यात येणार आहे. तसेच नांदेड येथे होत असलेल्या कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी प्रभात फेरीचे आयोजन केले जाणार आहे. याबाबत शिक्षण विभागामार्फत सर्व गट शिक्षणाधिकारी यांची बैठक घेवून सूचना देण्यात आल्या आहेत.

## क्षयरुग्णांना फूड बास्केट वाटप



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ जानेवारी :** आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी लातूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र गंगापूर व ग्रामपंचायत पाखरसांगवी यांच्या संयुक्त विद्यमाने उपचाराखालील १५ क्षय रुग्णांना फूड बास्केट वाटप करण्यात आले. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र गंगापूर येथील डॉ. महेश दिक्षीत वैद्यकीय अधिकारी, डॉ. वाघमोडे मॅडम, समुदाय आरोग्य अधिकारी, प्रशांत शेट, आरोग्य पर्यवेक्षक काळे, श्रीमती कांबळे, ग्रामपंचायत पाखरसांगवी सरपंच भीमाशंकर लखादिवे, उपसरपंच सारीकाताई हंडरगुळे, ग्रामविकास अधिकारी चोथवे, ग्रामपंचायत कर्मचारी, सर्व उपकेंद्रातील आशाताई, गटप्रवर्तक श्रीमती लताताई वाघमारे यानी परिश्रम घेतले.

## गुन्हे शाखेच्या सतर्कतेमुळे सोयाबीनचोरी प्रकरण उघडकीस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ जानेवारी :** लातूर पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे सोयाबीनची चोरी करणाऱ्या तिघांना शिताफीने पकडण्यात आले आहे. त्यांच्याकडून १ लाख ३८ हजार ४०० रुपयांचा वजही ताब्यात घेण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यातील शेतकरी हा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतकऱ्यांच्या घामातून निर्माण होणारा शेतीमाल चोरीस जाणे ही केवळ आर्थिक हानी नसून त्यांच्या कष्टांवर झालेला अन्याय आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी लातूर पोलीस प्रशासन सदैव सज्ज आहे. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी मालमत्ते विषयक घडणाऱ्या विशेषतः शेतकऱ्यासंदर्भात घडणाऱ्या प्रत्येक गुन्ह्याचा छडा लावणे संदर्भात पोलीस प्रशासनाला सूचना दिलेल्या आहेत त्या अनुषंगाने अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने रविवार, दि. ११ जानेवारी रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास, निलंगा पोलीस स्टेशन हद्दीतील पानचिंचोली पाटी परिसरात हणुमंतवाडी ते निलंगा जाणाऱ्या रोडवरील मसलगा शेत शिवारात, ४ ते ५ इसम चोरट्या पद्धतीने, संशयितरित्या सोयाबीनचे कट्टे पांढऱ्या रंगाच्या पिकअप वाहनात भरत आहेत, ही माहिती मिळताच पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

पोलीस पथकाची चाहूल लागताच संशयित इसम पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले. मात्र, पथकातील अधिकारी व अमलदारांनी प्रसंगावधान राखत पाठलाग करून तीन इसमांना ताब्यात घेतले. एक इसम मात्र पिकअप वाहन घेऊन पसार झाला. ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींची नावे दिपक तानाजी पवार, नवनाथ छगण उर्फ अचित काळे, संतोष सखाराम काळे अशी आहेत.

तपासादरम्यान आरोपींनी कबूल केले की, त्यांनी सुमारे १५ दिवसांपूर्वी खरोसा जवळील शिंदी जवळगा गावातील शेतशिवारातून रात्रीच्या वेळी एकूण ४० कट्टे सोयाबीनची चोरी केली होती. या कारवाईत एकूण १ लाख ३८ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामध्ये चोरीचे सोयाबीनचे कट्टे तसेच गुन्ह्यात वापरलेली एम.एच. २५ ए.व्ही. ४४२७ क्रमांकाची हिरो कंपनीची काळ्या रंगाची स्प्लेंडर मोटारसायकल यांचा समावेश आहे. सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील सपोनि सदानंद भुजबळ, पोउपनि राजेश घाडगे, पोलीस अंमलदार नवनाथ हासबे, माधव बिलापटटे, राजेश कंचे, तुराब पठाण, प्रशांत स्वामी, संजय कांबळे, सुर्यकांत कलमे, प्रदीप स्वामी, तुळशीराम बरूरे, पाराजी पुठ्ठेवाड, गणेश साठे, गोविंद भोसले, अंजली गायकवाड, शैलेश सुडे, हरी पतंगे, श्रीनिवास जांभळे यांचा समावेश होता.

## लोकशाहीच्या बळकटीसाठी मतदान आपले कर्तव्य : उपायुक्त खानसोळे



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ जानेवारी :** देशाच्या उज्वल भवितव्यासाठी व लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदान ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे असे प्रतिपादन लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त पंजाबराव खानसोळे यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, समाजकार्य व क्रीडा विभागाच्यावतीने आयोजित मतदान जनजागृती कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत ते होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे हे होते तर विचारमंचावर शिक्षणाधिकारी श्वेता नागणे, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमाले, जिल्हा समन्वयक सतीश भापकर, स्वीप सदस्य पवनकुमार खोत, महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. संजय गवई, डॉ. यशवंत वळवी, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. आशिष स्वामी, प्रा. मारोती माळी आणि नामदेव बेंदरगे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर, राष्ट्रमाता माँ जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना उपायुक्त पंजाबराव खानसोळे म्हणाले की, सार्वत्रिक निवडणुका ह्या लोकशाहीचा उत्सव असतात. या उत्सवात सर्व सुजान दक्ष नागरिकांनी सहभागी झाले पाहिजे. मतदान हा मतदाराचा संवैधानिक हक्क असून ते आपले कर्तव्य देखील आहेत. तरुणांनी नि:पक्षपातीपणे मतदान केले पाहिजे आणि परिसरातील सर्वांना मतदान करण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. शंभर टक्के मतदान झाल्यास आपल्या नेतृत्वास आपण प्रश्न विचारू शकतो आणि त्यामुळे आपल्या समस्या निवारण होऊ शकतात असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. यावेळी अजय राऊत आणि यश आरेकर यांनी मतदान जनजागृतीवर आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय गवई यांनी केले, सूत्रसंचालन किसनाथ कुडके यांनी केले तर आभार डॉ. शिवप्रसाद डोंगरे यांनी मानले.

## 'केशवराज'मध्ये जिजाऊ, विवेकानंद जयंती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ जानेवारी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. १२ जानेवारी २०२६ सोमवार रोजी स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ, युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी व वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन अतिशय उत्साहात करण्यात आले.

याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, विशेष उपस्थिती माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मुरलीधर गवळी, विद्यालयाचे मुख्यध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, स्नेहसंमेलन प्रमुख शैलजा देशमुख, सहप्रमुख बाळासाहेब करपुडे तसेच राजमाता जिजाऊंच्या वेशभूषेत विद्यार्थिनी स्वरा आचार्य(आठवी अ), स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषेत सार्थक राऊत (आठवी फ) यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे मुरलीधर गवळी यांनी स्वामी विवेकानंद हे करोडो भारतीय



युवकांचे प्रेरणास्थान आहेत असे सांगून त्यांच्या बालपणीच्या प्रसंगाचे कथन केले. याप्रसंगी त्यांनी स्वराज्यजननी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला तसेच 'मानव सेवा हीच ईश्र्वर सेवा' हे ब्रीदवाक्य घेऊन स्थापन झालेल्या रामकृष्ण मिशनची माहिती सांगितली. अध्यक्षीय समारोपात धनंजय तुंगीकर यांनी थोर महापुरुषांच्या चरित्रांचे वाचन करावे, त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्यातील एकतरी गुण अंगीकारावा. विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे सादरीकरण वर्गात करावे, असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले.

याप्रसंगी भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त लोकसेवा समिती, धाराशिव यांच्यावतीने लातूरच्या मातोश्री वृद्धाश्रमास मराठवाडा स्तरीय निरपेक्ष सेवेचा लोकसेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल मातोश्री वृद्धाश्रमाचे कार्यवाह तथा माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर यांचा सत्कार करण्यात आला तसेच रोटरी क्लब ऑफ लातूर मीडटाउनच्या वतीने देण्यात येणारा 'राष्ट्र निर्माता पुरस्कार' विद्यालयाचे पर्यवेक्षक धनंजय कुलकर्णी यांना प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी राजमाता जिजाऊंच्या वेशभूषेत उपस्थित विद्यार्थिनी स्वरा आचार्य हिने तसेच स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषेतील सार्थक राऊत या विद्यार्थ्यांनी स्वगत सादर केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत सुलक्षणा गंगथडे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रज्ञा नाईक यांनी केले तर शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कलोपासक मंडळाच्या वतीने संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली रेणुका गिरी, शैला सांगवीकर, शैलजा देशमुख, शिक्षक, कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## बसवेश्वर महाविद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ जानेवारी :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात तत्वज्ञान विभाग आणि मराठी विभाग यांच्यावतीने राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मराठी विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. शितल येरुळे, प्रो. डॉ. संजय गवई, डॉ. गीता गिरवलकर, डॉ. भाग्यश्री दाणे, प्रा. अलका चिखुर्डेकर, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, डॉ. पी. एन. सराफे, प्रा. डी. व्ही. फड, प्रा. सिद्धेश्वर घोडके, प्रा. दयानंद बोयने, प्रा. ज्ञानेश्वर ठाकूर, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनी यांची उपस्थित होती. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले, प्रास्ताविक डॉ. रत्नाकर बेडगे, यांनी तर आभार डॉ. शितल येरूळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी अजय गायकवाड, गुरुप्रसाद बिराजदार आणि रंगनाथ लांडगे यांनी सहकार्य केले.